
# माणूस

सोळा मे एकोणीसशें सत्तर
चालीस पैसे




चीनने अंतराळात उपग्रह सोडला
म्हणून भिण्याचे कारण नाही.
या उपग्रहाच्या
कक्षेतच आमचा
निषेध-खलिताही
सोडण्याची व्यवस्था
लवकरच
केली जात आहे



बरोबर शंभर वर्षांपूर्वीची गोष्ट. शेजारच्या समर्थ राष्ट्राच्या धक्क्यासरशी कोलमडलेले राष्ट्र पुन्हा उभे ठाकले. उदात्त तत्त्वत्रयीचा वारसा या राष्ट्राला लाभला होता. त्याच्या आधारेच नवी वाटचाल सुरू झाली.

परंतु—

या तत्त्वांचा सांभाळ करू शकणारे सामर्थ्य त्या राष्ट्रापाशी नव्हते. कारण अगदी साधे होते. एका आदर्श स्वप्नरंजनात ती राजवट दंग झाली होती. वास्तवाचे भान सुटले होते.

एके दिवशी या राजवटीला जाग आली. पण त्यापूर्वी बरेच काही घडून गेले होते.

हे 'बरेच काही' सांगणारी नवी प्रदीर्घ लेखमाला

# पराजित – अपराजित

'माणूस' मधून लवकरच क्रमशः सुरू होत आहे.

१६ मे १९७०

समग्र साप्ताहिक
माणूस

वर्ष नववे : अंक पन्नासावा
संपादक : श्री. ग. माजगावकर
सहाय्यक : दिलीप माजगावकर । सौ. निर्मला पुरंदरे
१०२५ सदाशिव, पुणे ३०   दूरध्वनी : ५७३५९

किंमत : ४० पैसे   वार्षिक वर्गणी : वीस रुपये   परदेशची वर्गणी : चाळीस रुपये

# राजकीय समानत्व, सांस्कृतिक विविधता

भिवंडी–दंगलीने हे पुन्हा एकदा स्पष्ट केले की हिंदु-मुस्लिम प्रश्न हा मुख्यतः 'राजकीय' प्रश्न आहे. जातीय नाही.

मुसलमान समाज बहुसंख्येने अद्याप राजकीय प्रभुत्वाची आकांक्षा बाळगून आहे. एकेकाळी आपण या देशावर राज्य केले ही जाणीव या समाजाला स्वस्थ बसू देत नाही. पुन्हा ती परिस्थिती निर्माण करण्यासाठी दंगली, चळवळी करण्यास त्याला ती सतत प्रवृत्त करीत राहते.

या समाजाचे हे 'ऐतिहासिक विष' उतरल्याशिवाय हिंदु–मुस्लिम प्रश्नाच्या सुटकेचा मार्ग मोकळा होऊ शकणार नाही.

जोपर्यंत या दंगली एकतर्फीच होत्या, मुसलमानांनी आगळिकी करायच्या आणि हिंदूनी मार खायचा–तोपर्यंत हे विष चढतच गेले. आता हिंदूही मार खाण्याच्या मन:स्थितीत व परिस्थितीत नाहीत. शासन कुठलेही असो परस्पर हिशोब चुकते करण्याची हिंदूची वृत्ती बळावत आहे. अहमदाबादने हे दाखवून दिले.

ही साखळी प्रक्रिया पुढे चालूच राहते. अहमदाबादचे हिशोब भिवंडीत उकरले जातात, भिवंडीचे आणखी कुठेतरी, केव्हातरी.

निमित्ते सापडत राहतातच. पूर्वी गणपती विसर्जनाच्या मिरवणुकी होत्या. आता शिवजयंती आहे.

हे थांबवायचे असेल आणि हे थांबलेच पाहिजे, तर प्रक्रिया जेथून निर्माण होते तेथे ती रोखली पाहिजे. वर्चस्ववादाची वृत्ती मोडून काढली पाहिजे. नागरिकत्वाचा समानभाव प्रयत्नपूर्वक जोपासला पाहिजे.

हे साधत असता, आजच्या परिस्थितीत अल्पसंख्यसमाजाचा काही सांस्कृतिक

[पृष्ठ ६ वर]

मुखपृष्ठ कल्पना : चंद्रकांत कुलकर्णी, पुणे

प्रकाशित लेख, चित्र इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मताशी 'माणूस' साप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. ललित साहित्यातील पात्रे काल्पनिक

# कंबोडिया – प्रश्नचिन्ह !

राजे नारदोम सिहनौक, ह्याच्या त्यांच्या गैरहजेरीतील पदच्युतीनंतर जवळ जवळ महिन्याने कबोडियातील परिस्थिती आज अतिशय स्फोटक बनली आहे. घरच्या-दारच्या लोकक्षोभाची तमा न बाळगता अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष निक्सन ह्यानी विएतनाममधील आपल्या फौजाना कबोडियात आगेकूच करायला सागितले. विएतकाँग व कबोडियन कम्युनिस्ट फौजा, कबोडियातल्या सध्याच्या जनरल नॉल सरकारला चारी बाजूनी घेरत आहेत. अशा परिस्थितीत, ह्या फौजा हुसकून लावण्यासाठी, आज अमेरिकेनं हस्तक्षेप केला आहे, असा अमेरिकेचा आणि तिच्या पाठीराख्यांचा युक्तिवाद आहे. तर अगोदरच, जनरल नॉल सरकार उलथून टाकण्यासाठी प्रयत्नशील असणाऱ्या विएतकाँग फौजाना उघड मदत देणं पेकिंग-मॉस्कोला शक्य झालं आहे. सिहनौक – पदच्युतीनंतर विएतकाँग फौजानी नवीन शासनाविरुद्ध, कंबोडियन-कम्युनिस्टांच्या मदतीने आघाडी उघडली, तेव्हा यादवीची परिस्थिती निर्माण झाली. परतु आज बडया शक्ती ह्या विभागात उतरल्याने वातावरण अधिक तापले आहे. निव्वळ आग्नेय आशियाच नव्हे तर सबंध आशिया, कदाचित् संपूर्ण जगही युद्धाच्या खाईत ओढलं जाण्याची भीती आज उभी ठाकली आहे. अशावेळी कोण आक्रमक, कोणाच्या फौजा त्या देशात आहेत, वगैरे चर्चा निष्फळ आहे. आपल्या हस्तक्षेपाने, कबोडियाचं शात वातावरण ढवळून काढून, परिस्थिती चिघळविण्याची जबाबदारी, म्हणूनच अमेरिकेइतकीच पेकिंग-हनोई-वरही आहे. राजे सिहनौक ह्यांनी पेकिंगची मदत घेतली आहे, तर नॉल सरकारनं अमेरिकेची. दोघांच्यामध्ये, कालपर्यंत खऱ्या अर्थाने कम्युनिझम किंवा भांडवलशाही साम्राज्यवाद म्हणजे काय ह्याची कल्पना नसणाऱ्या शाततािप्रय सामान्य कबोडियन जनतेची मात्र ससेहोलपट चालू आहे.

कबोडिया – आग्नेय आशियातल एक छोटसं राष्ट्र ! चारी बाजूंनी शत्रू-राष्ट्रांनी वेढलेलं. नुकतेच पदच्युत झालेले राजे सिहनौक ह्यांनी सत्ता हातात घेतल्यानतर कंबोडियाची परिस्थिती सुधारू पहात होती. बाजूला विएतनाम युद्ध गेली कित्येक वर्षे चालू आहे. अशा परिस्थितीत त्या युद्धापासून आणि त्यात गुतलेल्या बडया राष्ट्रापासून कबोडियाला अलिप्त ठेवणे ही खरोखरच तारेवरची कसरत होती. आणि ही कसरत राजे सिहनौक मोठ्या कुशलतेनं, गेली काही वर्षे करीत होते. त्यासाठी त्याना कधी कधी चमत्कारिक कोलांटया उडयाही माराव्या

लागल्या. परंतु कंबोडियासारख्या नाजुक परिस्थितीत सापडलेल्या राष्ट्राला कुठलही सैनिकी धाडस परवडायच नाही ही त्यांची धारणा होती. नि म्हणूनच, वेळप्रसगी बड्यांना काही सवलती देऊनही त्यानी त्यांना आणि पर्यायानं युद्धाला कंबोडियापासून दोन पावलं दूरच ठेवलं आहे. त्यांनी, उदारमतवादी, पश्चिमेकडे झुकलेल्या जनरल नॉल सारख्याला आपला पतप्रधान बनवल, ज. नॉलना बँकांचं, आयात-निर्यात व्यापाराच राष्ट्रियीकरण रद्द करायला परवानगी दिली. त्याचवेळी, हनोई व विएतकाँग फौजांना कंबोडियाच्या प्रदेशातून ये-जा करण्यास परवानगी दिली.

परतु ह्यामुळेच कंबोडियावर आजची परिस्थिती लादली गेली. विएतकाँग व उ. विएतनाम फौजा द. विएतनामवर हल्ले करून कंबोडियात आश्रय घेतात. कंबोडियातून जा-ये करण्यास ह्या फौजाना मनाई करण्यात आली असती तर विएतनाम युद्धाचा केव्हाच निकाल लागला असता, अशी अमेरिकेची धारणा आहे, नि काही अशी ती खरीही आहे. ह्यामुळेच सिहनौक ह्यांनी अमेरिकेचा रोष ओढवून घेतला. त्यांच्या पदच्युतीत, अमेरिकेचा हात असावा असा संशय घेतला जातो त्याचंही हेच कारण आहे. कंबोडियन सत्ताधीशाच्या पदच्युतिबाबत विविध कारण दाखवण्यात येतात. काहींच्या मते, राजे सिहनौक ह्यांच्या विएतनामी पत्नीच्या राजकारणातल्या लुडबुडीमुळे जी नाराजी निर्माण झाली, तिच्यातून ह्या पदच्युतीचं राजकारण शिजलं. पदच्युतीचं दुसरं कारण युवराज सिरीक माताक ह्याच्या महत्त्वाकाक्षेत व सिरीक माताक आणि सिहनौक ह्यांच्यातल्या झगड्यात शोधलं जातं. तर उ. विएतनामचे पतप्रधान फाय व्हान डाँग ह्यांच्या बरोबरच त्याचं वाढतं सख्य, त्याच्याबरोबर त्यांनी शिजवलेले कट आणि समाजवादी-समाजरचनेच्या अगीकृत तत्त्वाशी त्यानी घेतलेली फारकत, इ. कारणं त्यांच्या पदच्युतीमागे आहेत, अस शासनाने जाहीर केलं आहे. कसं का असेना, त्यांच्या पदच्युतीनतर कंबोडियातली शातता पार ढासळली आहे. राजकीय व आर्थिक परिस्थिती झपाट्याने खालावत आहे. राजे सिहनौक ह्यांच्या तारेवरच्या कसरतीची आवश्यकता, कदाचित नव्या शासनाला आता जाणवू लागली असेल.

राजे सिहनौक ह्यांनी आता कंबोडियाचे परागदा सरकार घोषित केले असून, पेकीगने ह्या सरकारला मान्यता दिली आहे व कंबोडियातल्या नॉल-सरकारची राजनतिक मान्यता काढून घेतली आहे. ह्याचा अर्थ उघड आहे. पेटलेल्या ज्वाला अधिक भडकणार असल्याचं हे चिन्ह आहे. ह्यावेळी जागतिक लोकमताचं आणि दोन्ही गटाशी मैत्री असलेल्या राष्ट्रांचं दडपणच कंबोडियाला वाचवू शकेल. तिसरा प्रबल अलिप्त गट असणं आज छोट्या राष्ट्रांच्या दृष्टीने आवश्यक आहे. कारण अमेरिकेचा भांडवलवाद असो किंवा रशिया-चीनचा कम्युनिझम असो, ह्या दोन्ही बड्या शक्ति एकाच दिशेने वाटचाल करीत आहेत, नि ती म्हणजे साम्राज्य-

वादाची दिशा ! त्यांच्या परस्परपूरक महत्त्वाकांक्षी धोरणांचे बळी मात्र ठरतात, हंगेरी, झेकोस्लावाकिया, विएतनाम, कोरिया, कबोडियासारखी राष्ट्रे ! आंतरराष्ट्रीय निरीक्षण मंडळाचा अध्यक्ष ह्या नात्यानं भारतावर ह्या दृष्टीने आज मोठी जबाबदारी आहे. दोन्ही बाजूना खणखणावून सागणं आणि अन्य अलिप्त राष्ट्रांची मदत व युनोचं सहकार्य घेऊन ही साम्राज्यशाही ठेचली गेली नाही तर छोटया राष्ट्राचं भवितव्य सुरक्षित नाही — मग अमेरिकन भांडवलशाही येवो किंवा रशियन कम्युनिझम् ! ◻

# सरकारला धक्के

सनदी (I. C. S.) अधिकाऱ्यांचे खास हक्क रद्द करण्यासंबंधीचे खा. मधु लिमये ह्यांचे विधेयक, सरकार पक्षाचा पाठिंबा मिळूनही, परवा लोकसभेने फेटाळून लावले. त्याच वेळी झालेल्या विविध समित्याच्या निवडणूकांतही सत्ताधारी पक्षाला पराभव सहन करावे लागले. ताज्या निवडणूका झालेल्या सर्व समित्यावरील बहुमत इंदिरा-कॉंग्रेसला गमवावे लागले आहे. ह्या उलट संघटना कॉंग्रेसने आपल्या सर्व जागा कायम राखण्यात यश मिळवले आहे. त्यापूर्वी राज्यसभांच्या निवडणुकातही सरकार-पक्षाला बरेच पराभव सोसावे लागले आहेत—अगदी त्याचा बालेकिल्ला समजल्या गेलेल्या महाराष्ट्रातूनही सत्तारूढ कॉंग्रेसला बसलेले हे धक्के फार जबरदस्त आहेत. नि त्यामुळे कदाचित फार दूरगामी परिणाम घडून येण्याची शक्यता आहे. नव-कॉंग्रेस ससदीय पक्षाच्या बैठकीत त्यामुळेच परवा चिंतेचा सूर निघाला; परंतु त्याचबरोबर यंग टर्क्स व इतर ह्यांच्यातल्या, त्याचप्रमाणे इतर अनेक गटांतल्या परस्पर विरोधी भूमिकांवरही प्रकाश पडला. हे मतभेद नवे नाहीत. अविभक्त कॉंग्रेसमध्येही हे मतभेद होते, व आजच्या सघटना कॉंग्रेसमध्येही ते आहेत. कॉंग्रेसचे दोन तुकडे झाले ते समाजवादाचे नारे लावून. सद्सद्विवेक बुद्धिची साक्ष ठेवून ! आज हे सारं वार विरलं आहे. उरलं आहे केवळ स्वार्थांध, सत्तेचं राजकारण. तो स्वार्थ टिकविण्यासाठी कुणाची सरकारे उलथ, कुणाला पैशांचं आमिष दाखवून फोड असले प्रकार सर्रास सुरू झाले. पक्षांतरे व मतांतरे तर भारतीय राजकारणाच एक महत्त्वाच अग बनू पाहात आहे. सुधारणा खऱ्या केल्या जात नाहीतच, पण काही करण्याचा बहाणा करून जनतेच्या डोळ्यात मात्र धूळ फेकण्याचा प्रयत्न केला जातो.

वास्तविक जे बील लोकसभेनं आज फेटाळलं ते बील ससदेत आता आणण्याची

खरोखरच काही आवश्यकता नव्हती. आज सारे मिळून जेमतेम नव्वद-शंभर I. C. S. अधिकारी भारतात असतील. त्यांचे काही खास अधिकार ते आणखी फार तर चार-पाच वर्षे वापरू शकतील. ह्या सर्व अधिकाऱ्यांच्या खास अधिकारां-मुळे फार तर काही हजारांचा चुराडा होत असेल. त्यासाठी घटना-बदला एवढे द्राविडी प्राणायम करायची खरोखरच काही आवश्यकता नव्हती. त्या ऐवजी पब्लिक अकौंट्स् कमिटीने उजेडात आणलेल्या, सरकारी उद्योगांमधल्या गलथान कारभाराची चौकशी व्हायला हवी होती, गंभीर चर्चा व्हायला हवी होती, निश्चित उपाय-योजना व्हायला हवी होती. ह्या उद्योगामधल्या (फक्त दोन-तीन शासकीय कारखाने वगळता बाकी सर्व कारखाने आज तोटयात चालू आहेत.) कारभारा-मुळे काही हजारो नव्हे, तर कित्येक कोटयावधी रुपयाचा चुराडा आज होत आहे नि त्याचा भुर्दंड जनतेला सहन करावा लागत आहे. त्याची चर्चा करायला पंत-प्रधान श्रीमती गांधी तयार नाहीत. कारण त्यामुळे त्यांच्या तथाकथित बेगडी समाजवादावर टीका ओढवून घेण्यास आणि पर्यायानं त्याचं सरकार टिकवून धरणाऱ्या डाव्यांचा रोष स्वीकारण्यास त्या तयार नाहीत. सरकारी कारखा-न्यातली कारभारातली अनागोंदी, तिथली उधळपट्टी, तिथे फार मोठया प्रमाणावर करता येण्याजोगी असलेली काटकसर वगैरे प्रश्नांवरील चर्चेमुळे, त्यावरील निश्चित निर्णयांमुळे देशाचा, जनतेचा मोठा फायदा होण्यासारखा असला तरी तिकडे दुर्लक्ष केले जाते. जनतेच्या भावना भडकावता येतील असे प्रश्न घेऊन त्यांची दिशाभूल करत राहता येईल असे मार्ग निदान शासनाने तरी हाताळू नयेत. मंत्र्यांना वर्षा-नुवर्षे हजारो रुपये कर बुडविला तरी तिकडे कानाडोळा करणाऱ्यांनी, रशिया-अमेरिका देशाला कोटयावधी रुपयांनी लुबाडत असता तिकडे कानाडोळा कर-णाऱ्यांनी, सनदी नोकरांच्या व संस्थानिकांच्या तनख्यांवर तुटून पडावं, त्यावर संसदेचा, देशाचा अमूल्य वेळ खर्च करावा—तेही नक्षलवादी, चिनी उपग्रह, त्यांची वाढती मुजुखगिरी, दारिद्र्य हे विषय चारी बाजूंनी देशाला ग्रासत असताना-ह्याच खरोखरच आश्चर्य वाटते. भारताच्या बेगडी समाजवादाचा हा एक उत्कृष्ट नमुना आहे! ◻

---

# शाब्बास !

---

सर्व महत्वाच्या राजकीय, आर्थिक, शासकीय बातम्या बाजूला सारून भारतीय आकाशवाणीनं ५ मेच्या मध्याकाळच्या आपल्या सर्व बातमीपत्रांतुन एका क्रीडा-विषयक बातमीला अनपेक्षितपण प्राधान्य दिलं आणि त्यावरूनच पूर्व विभागीय

डेव्हिस चषक टेनिस स्पर्धेच्या अंतिम सामन्यात भारतानं ऑस्ट्रेलियाविरुद्ध मिळव-लेल्या विजयाचं अनन्य साधारण महत्त्व कुणालाही कळून यावं! ऑस्ट्रेलिया टेनिस जगतांतला एक मातबर संघ! डेव्हिस चषक स्पर्धेच्या नियमांनुसार व्याव-सायिक क्रीडापटूंना ह्या सामन्यात भाग घेता येत नसल्यामुळे ऑस्ट्रेलियाचा हा संघ काहीसा दुय्यम प्रतीचा असला तरी त्यामुळे भारतीय विजयाचं महत्त्व कमी होत नाही. तो सघ तरीही बलवान होताच आणि म्हणूनच सामन्यापूर्वी भारत उत्तम लढत देईल असेच सूर काढले जात होते. क्वचित कुणी चाचरत भारताच्या विजयाची कुंडली माडलीच तर ती केवळ प्रेमजित लालवर भरवसा ठेवून आणि दुहेरीतल्या विजयाची आशा बाळगून. पण रे स्फेल्सविरुद्धचा सामना प्रेमजित लालनं फार मोठ्या लढतीनतर जिंकला तर दुहेरी सामना ऑस्ट्रेलियानं लीलया जिंकला. भारताच्या विजयाची वाट खरी मोकळी करून दिली ती जयदीप मुख-र्जीच्या डीक क्रीलीविरुद्धच्या चिवट लढतीनं आणि त्याच्या अनपेक्षित पण सुखद विजयान! ह्या लढतीत कप्तान रामनाथन् कृष्णन्‌चाही वाटा मोठा आहे. स्वत चा फॉर्म नीट नाही हे पाहून तो सामन्यापासून दूर राहिला, नवोदितांना त्यानं सधी दिली! भारतातल्या कित्येक क्रीडापटूंनी आणि राजकारण्यानी हा कित्ता गिरवला तर–? ऑस्ट्रेलियन संघनायकानंदेखील पराभवानिमित्त लंगड्या सबबी पुढे करण्या-ऐवजी 'उत्तम संघास विजयश्रीनं माळ घातली!' एवढीच प्रतिक्रिया व्यक्त करून एक नवा आदर्श घालून दिला आहे!

भारतीय सघाचं त्रिवार अभिनंदन आणि त्यांच्या पुढच्या लढतीत शुभेच्छाच आज प्रत्येक भारतीय करीत असणार!

— सु. ल. सोमण

---

## राजकीय समानत्व, सांस्कृतिक विविधता... पृष्ठ १ वरून

वेगळेपणा बहुसंख्य समाजानेही उदारपणे मान्य करायला हवा. सहजीवनाला आड न येणारी श्रद्धास्थाने त्या त्या समाजाला जपू देण्याचा समजसपणाही दाखवला गेला पाहिजे.

राजकीय समानत्व, सांस्कृतिक विविधता या कणखर पण व्यापक वृत्तीने या प्रश्ना-कडे पाहिले तरच अहमदाबाद–भिवंडी–जळगाव यांची पुनरावृत्ती होणार नाही. हे घडवून आणण्याची जबाबदारी सर्वांची आहे. मुस्लीम सत्यशोधकाची आहे, सर-कारची आहे, भारतीयकरणवाद्यांचीही आहे. आप पहिले, हम पीछे ही टाळा-टाळही येथे असू नये. जेथे जेथे विवेकाचा स्वर व तदनुरूप कृती व्यक्त झाली असेल तेथे तेथे ती उचलून धरली पाहिजे. — संपादक

# विचार धारे

समीर

## ◻ चुटक्यांच्या शोधात

'पंच' या जगप्रसिद्ध व १३० वर्षे चाललेल्या विनोदी ब्रिटिश साप्ताहिकाचे नवीन व तरूण संपादक विल्यम डेव्हिस् हे चुटक्याच्या शोधात नुकतेच भारत व जपानचा दौरा करून गेले. त्यांनी दिल्लीच्या मुक्कामात आंतरराष्ट्रीय विनोद-बुद्धीवर प्रकट केलेली काही गंभीर मते :

'पंच' हे गेली कित्येक वर्षे एक प्रकारचे साहित्यिक साप्ताहिक झाले आहे, ते आता संपूर्णपणे विनोदी करण्याचा इरादा आहे. विनोदाला विषय भरपूर आहेत, पण चांगल्या विनोदी लेखकांचा व व्यंगचित्रकारांचा–विशेषतः व्यंगचित्रकाराचा–तुटवडा आहे. काही दिवसांपूर्वी पंचने एक विनोदी स्पर्धा ठेवली होती, तिच्यात पाच हजार जणानी भाग घेतला, पण एकही चांगला नव्हता. 'पच साप्ताहिक डेंटिस्टच्या वेटिंग रूममध्ये पहायला मिळते' असे कोणी म्हटले की माझ्या विनोद-बुद्धीला विशष धक्का बसतो. पण आता पच डेंटिस्टच्या वेटिंग रूमपुरता मर्यादित राहिला नसून अधिक 'टॉपिकल' झाला आहे. विनोदाच्या दृष्टीने आता इंग्लड-मध्ये भूतपूर्व संपादक माल्कम मगरिज् यांच्या वेळेपेक्षा खूपच अनुकूल वातावरण आहे. लोक आता स्वतःवर केलेले विनोद सहन करायला बरेच शिकले आहेत. पंचचा सर्वसाधारण वाचक आता क्लबमध्ये जाणारा म्हतारा राहिला नसून चाळीस वर्षांच्या खालचा आहे.

जर्मन लोकाना विनोदबुद्धी नसते हा सर्वमान्य इंग्लिश समज कितपत खरा आहे ? उत्तर : प्रत्येकाला वाटते विनोदबुद्धी आपल्यालाच आहे. इतराना नाही. ब्रिटिशांना वाटते जर्मनांना विनोदबुद्धी नाही. अमेरिकनाना वाटते रशियनांना विनोदबुद्धी नाही. उलट स्वित्झर्लंडमध्ये एक उत्कृष्ट विनोदी मासिक गेली तीस वर्षे प्रकाशित होत आहे, तसे एकही मासिक अमेरिकेत नाही. अमेरिकनाना चुटके आवडतात, पण स्वतःला हसण्याची त्यांची क्षमता कमी कमी होत चालली आहे. आम्ही अमेरिकनांच्या बद्दल काही छापले की आम्हाला त्यांची रागाने भरलेली पत्रे येतात. एका गृहस्थाने नुकतेच पत्रात लिहिले : "अॅग्न्यूची टिंगल करण्यापर्यंत तुमची मजल जावी ? आधी अमेरिकेने ब्रिटनला दिलेले कर्ज फेडा, अन् मग आमच्यावर टीका करा." पुष्कळ अमेरिकनांना असे वाटते की आधीच अमेरिकन जीवनावर निग्रोनी हल्ला चढविला आहे, त्यात आणखी विनोदकरांनी कशाला हातभार लावायला हवा ?

जपानी लोकांना विनोदबुद्धी नसते असे समजले जाते, पण तसे नाही. त्यांना फाजील चुटके विशेष आवडतात–त्यांना ते 'गुलाबी' विनोद म्हणतात. रशियन लोक

खालच्या नोकरशाहीवर फार चांगले विनोद करतात—अर्थात् क्रेमलिनमधल्या बड्या धेंडांबद्दल नव्हे. अमेरिकन लोकांचे वैशिष्ट्य म्हणजे वंशविषयक चुटके, तर ब्रिटिश विनोदबद्धी निदान परवा—परवांपर्यंत तरी दुसऱ्याला हसण्यावर अवलंबून होती, स्वतःला नव्हे. उदाहरणार्थ, चर्चिलचे विनोद नेहमी दुसऱ्याच्या टिंगलीवर आधारलेले होते. त्याने स्वतःवर कधीही विनोद केला नाही.

भारतीयांना चांगली विनोदबुद्धी आहे. भारतात राजकारणावर व शिखांवर चांगले चुटके ऐकायला मिळाले. येथे बँकेत काम करणारी मंडळीही विनोदबुद्धीची आहेत. आवडता भारतीय चुटका कोणता? मद्यपान—निषेध मंडळाचा एक सदस्य व्हिस्की पीत असताना त्याला विचारण्यात आले, 'हे कसे काय?' तो उत्तरतो: 'मी ही दारू व्यक्तिगत स्वरूपात पीत आहे.'

भारत सरकारला विनोदपूर्ण टिंगल केलेली फार बोचते असे म्हणतात. असे असेल तर भारत सरकारला आत्मविश्वास वाटत नाही हे नक्की. विनोद हे एक फार प्रभावी शस्त्र आहे व सरकार जर राजकीय विनोदावर हसू शकले तर ते सुरक्षित व आत्मविश्वासपूर्ण आहे असे समजावे. इंग्लंडमध्ये राजकीय विनोदबुद्धी फारच खालावली आहे. मजूर पक्षात काही फार विनोदी मंडळी आहेत, पण हुजूर पक्षात मुळीच नाहीत. उदाहरणार्थ, एडवर्ड हीथ यांना अजिबात विनोदबुद्धी नाही.

साधारणपणे पाच प्रकारचे विनोद प्रत्येक देशात आवडतात. निर्जन बेटाचे चुटके जगात सर्वात अधिक लोकप्रिय असावेत. त्याच्या खालोखाल चुटक्यांचे आवडते विषय म्हणजे उडती सतरंजी, घाणेरडे म्हातारे, गुहेत राहणारा रानटी मानव, अन् इजिप्तची प्राचीन चित्रलिपी.

शेवटी एक गंभीर सूचना: "जगातल्या सगळ्या लढाया विनोदाच्या शस्त्राने लढल्या जाव्यात. म्हणजे ज्या बाजूचे हसे होईल ती नामोहरम तरी होईल नाही तर हसून हसूनच तिची वाट लागेल."

□ □ □



# मुलाखती

## □ टेलस्टार ओव्हर चायना

२५ एप्रिल १९७० ! लालचीनचा उपग्रह पृथ्वीभोवती घिरट्या मारू लागला !! १९६४ साली दुष्ट माओने अण्वस्त्र पैदा केले. पाच-सहा वर्षांच्या आत अण्वस्त्रतपश्चर्या करून, ३८० पौंडाचा उपग्रह त्याने आता सोडला आहे. अमेरिकेच्या आकाशात 'माओचे गाणे' दिवसातून पाच वेळा वाजवण्याची तरतूद माओने केली आहे. 'टुंग फँग हुंग'—ईस्ट इज् रेड...पूर्वेला रक्तिमा चढत आहे...असे या उपग्रहाचे गाणे ऐकून पाश्चिमात्य हादरले आहेत. लेनिनच्या जन्म-शताब्दीच्या मुहूर्तावर माओने आकाशात निर्माण केलेले हे लेनिनचे स्मारक बघून, अमेरिकेतील अणुशास्त्रज्ञ सावरून बसले आहेत. याचा अर्थ पेकिंगमधून वॉशिंग्टन-वर अण्वस्त्र फोडण्याची ताकद चीनला प्राप्त झाली आहे असा होतो. आतापर्यंत बॉम्बर विमानातून अणुबॉम्ब टाकणेच फक्त चीनला शक्य होते. जसे अमेरिकनांनी, नागासाकी व हिरोशिमावर अणूबॉम्ब फोडले. परंतु आता एकही वैमानिकाचा जीव धोक्यात न घालता, लालचीन वॉशिंग्टन व न्यूयॉर्कमधील लक्षावधी माणसांना यमसदनाला धाडू शकेल. मॉस्को लंडन किंवा दिल्ली भस्मसात करू शकेल.

ज्यांचा यामुळे भीतीने थरकाप होतो आहे त्यांची आम्हाला कीव येते ! घाबरट आणि भेकड कुठचे ! रावणाने उग्र तपश्चर्या करून मोठमोठे राजे धुळीला मिळवले. परंतु वानरे आनंदात होती ना ? सीता पळवली.. रामाला निष्कारण त्याने मनस्ताप दिला हे सोडून द्या. यामुळे रामाला रावणाची दखल घ्यावी लागली. परंतु जर रावणाने सीता पळवण्याची चूक केली नसती, तर रामराज्य – कुंभकर्णासहवर्तमान आणि समस्त वानर कंपनीसह डाराडर झोपूनच राहिले असते याबद्दल आम्हाला मुळीच शंका नाही.

दिल्लीतील रामराजे शांत आहेत. जनसंघवाले, पी. एस. पी. वाले...आणि संयुक्त समाजवादी लोकसभेत आणि राज्यसभेत उगाचच शंख करीत आहेत. स्वर्णसिंग, दिनेशसिंग, सुरेंद्रपालसिंग – हे सिंग अँड सिंग कंपनीचे प्रमुख भागीदार, त्यांचा योग्य मुकाबला करीत आहे. गेले तीन महिने ही मंडळी सारखी विचारणा करीत आहेत—

'अणूबॉम्ब केवढ्याला मिळतो ?'

सोंधी, कन्वरलाल गुप्ता, नाथ पै, समर गुहा, रविचंद्र झा, मधू लिमये यांना वाटते की अणूबॉम्ब म्हणजे दुध्याभोपळ्यासारखा मंडईत मिळतो! थोडासा भाव करायचा...हुज्जत घालायची आणि पिशवीतून सायकलला अडकवून घरी आणायचा.

प्रो. स्वामी या हावर्ड विद्यापीठातून शिकून आलेल्या अर्थतज्ञाने सांगितले आहे की अण्वस्त्रांसाठी भारताला ७५० कोटी ते १८००० कोटी रुपये २० वर्षांत खर्च करावे लागतील. हजामांनी दर वाढवले नव्हते, तेव्हापासून ज्यानी हजामतीचा खर्च केलेला नाही, ती चिक्कू मडळी एवढा खर्च एकदम कसा काय बुवा करतील? स्वर्णसिंगानी दाढीवरून हात फिरवीत आश्वासन दिले--

'ज्या देशाजवळ अण्वस्त्र नाही अशा देशावर अण्वस्त्रधारी देशांपैकी कुणी अण्वस्त्र हल्ला करतील असा मुळीच सभव नाही. जर हल्ला केलाच तर जग काय स्वस्थ बसणार आहे?'–World is not going to be a silent spectator!'

आम्ही तेच म्हणतो. समजा भारताने चीनने गिळंकृत केलेल्या प्रदेशाची मागणी केली, युद्ध पेटवले आणि चीनने अण्वस्त्र टाकले तर आपली खूप माणसे मरतील. लक्षावधी मरतील, रडारड होईल हे सगळे खरे असले, तरी जग मदतीला आले नाही तरी आपल्या 'मयती'ला आल्यावाचून राहील काय? सर्व प्रेतांची अगदी हिंदूपद्धतीने राजघाटावर विल्हेवाट लावण्यासाठी, लडनहून, युनोतून, मास्कोहून लोक धावत येतील. देशोदेशीचे लोक विमानाने गोवऱ्या-बाबू पाठवतील. पाकिस्तानातून तयार 'ताटया' बांधून येतील. दलाई लामा जिवंत राहिला तर मृतात्म्यांना सद्गती लाभण्यासाठी तो प्रार्थना करील! नवी राजधानी बांधण्यासाठी 'वर्ल्ड बँक' कर्ज देईल. आपल्याला भिती वाटण्याचे कारण काय? जग आपल्या पाठीशी आहे. चीनने हल्ला केला तेव्हा ते पाठीशी होते. पाकिस्तानने काश्मीरचा लचका तोडला तेव्हा नव्हते का पाठीशीच?

एका संस्थानिकाची अशी गोष्ट सांगतात की राजधानीत आग लागली की लोक राजवाड्यावर धावत येत – 'सरकार आग लागली!'

सरकारस्वारीची झोपमोड होण्याचे प्रसग यामुळे वारंवार येऊ लागले. सरकारस्वारीच्या पदरी दिनकरशास्त्री ढेरे व मौलवी फक्रू नावाचे दोन विद्वान होते. त्यांनी सल्ला दिला–

– महाराजांनी एक उंच मनोरा बांधावा! तिथे बसून सरकारी माणूस हे पाहील की आग कुठे लागली आहे की काय? प्रजाजनांना यामुळे त्रास होणार नाही. आग कुठेही लागली तरी मनोऱ्यावरून ती दिसणारच!

महाराजानी दवडी दिली–

'यापुढे राज्यात आग लागली तरी महाराजाची झोपमोड नागरिकांनी करू नये. आग लागली रे लागली की मौलवी फक्रू मनोऱ्यावरून बांग देतील. आणि

लगेच दिनकरशास्त्री गणपती पाण्यात घालून त्यावर अभिषेक करतील. काळजीचे कारण नाही !'

अरे खुशाल फोडू द्या चिन्यांना ॲटमबॉम्ब ! कुठेही कुणीही अणुस्फोट केला तर ते दिल्लीश्वरांना यापुढे कळल्याशिवाय रहाणार नाही. जगात कोण कोण अणू चाचणी करीत आहे ते चि. दिनूला लगेच कळणार आहे. जनसंघवाल्यांना वाटते की महाराज झोपलेले आहेत. मूर्ख कुठले ! अरे सिंग ॲंड सिंग कंपनी, मौलवी फक्रू सगळ्यांचे बारसे जेवून बसलेले आहेत.

आता ऑगस्ट १९६३ साली अण्वस्त्र चाचणीबंदी करार झाला. झाला ना ? तेव्हापासून तो मार्च १९७० पर्यंत सोविएट रशियाने ५८ चाचण्या केल्या. अमेरिकेने १४८ केल्या, इंग्लंडने २ केल्या, चीनने १० केल्या, फ्रेंचांनी १५ केल्या. सगळे चोरून चोरून चालले होते. पण बंगलोरजवळील आपल्या गौरीबिडनूर केंद्राने सगळे काही गौडबंगाल पाहिलेले आहे.

एडगर स्नो या अमेरिकन लेखकाने 'रेडस्टार ओव्हर चायना' हे पुस्तक १९३८ साली लिहिले. १९४८ साली पंडित नेहरूंनी ते पुनः काळजीपूर्वक वाचले. मग १९६२ पर्यंत चाऊ एन लाय जे जे करीत होता, ते बारकाईने पहाण्याचे काम त्यांनी केले. आणि जेव्हा चाऊने भारताची खोडी काढली, तेव्हा मात्र नेहरू रागावले ! माणसाने लगेच डोक्यात राख घालण्यात अर्थ नसतो. प्रथम राख होऊ द्यावी मग ती डोक्यात घालावी ! १९७० साली 'टेलस्टार ओव्हर चायना' आत्ता तर कुठे दाखल झाला आहे. भारतातील चालू रामराजे पुढची २५–३० वर्षे बारकाईने सगळे पाहतील आणि मग काय करायचे ते करतील ! अल्ला करो आणि दिल्ली–कलकत्ता–मुंबई वगैरे शहरे अण्वस्त्रांनी उध्वस्त केली गेली तरी ती राख पहाण्यासाठी समस्त सत्ताधारी कॉंग्रेसवाल्यांना दीर्घायुष्य लाभो, अशी आमची ईशचरणी प्रार्थना आहे.

'सबको सन्मती' या आशेवर परराष्ट्रराजकारण करणारे जोपर्यंत गादीवर आहेत, तोपर्यंत तुम्ही आम्ही रोज सकाळ-सायकाळ उच्चरवाने निदान सद्‌गतीसाठी प्रार्थना करू या—

ईश्वर अल्ला तेरा नाम
सबको 'सद्‌गति' दे भगवान

— ग्यानबा

# रसगुल्ले आणि बॉम्ब

## दादूमिया

### तीन

बंगालचे शिक्षणक्षेत्र आज लाचलुचपतीने बरबटून गेले आहे. शहाण्या माणसाने आपली पोरे कलकत्त्याच्या शाळा कॉलेजात धाडू नयेत. निराळेच शिक्षण मिळते येथे ! मुली शर्मिला टागोर होऊन यवनांची प्रॉपर्टी होतात व पोरे सी. पी. आय. मार्क्सिस्टांचे चेले बनतात. म्हणजे रेग्युलर करीक्युलममधील शिक्षणाच्या नावाने शून्यच.

एके काळी कलकत्त्याचे शिक्षण नावाजलेले होते. स्वस्तही असे. कोठून कोठून लोक येत व येथे शिकत. डॉ. हेडगेवार नागपूरहून येथे येत तर इंदिरा गांधीस खास अलाहाबादहून शांतिनिकेतन येथे शिक्षणासाठी आणले जाई.

दुसऱ्या महायुद्धापासून शिक्षणक्षेत्रात जी पडतीची सुरुवात झाली आहे ती चालूच आहे. लढाईच्या काळी मास्तर लोकाना इतर क्षेत्रात तिप्पट पगार मिळत असे. त्यामुळे हे सारे चागले व अभ्यासू मास्तर पटापट शाळा–कॉलेजे सोडून कारखान्यात लागले. कारखान्यात लढाईसाठी भरमसाट उत्पादन होत असल्याने धंदा तेजीत होता. त्यामुळे चांगले पगार द्यायला मालकांना विशेष जड जात नसे. हा व्हॅक्यूम कोणी भरला ?

ज्यांना इतरत्र कोठेच नोकऱ्या मिळू शकत नव्हत्या, जे इतर क्षेत्रात अयशस्वी

ठरले, जे लढाईवरही जाऊ शकत नव्हते–थोडक्यात तिसऱ्या दर्जाचे, भेकड व तोंड-पुजे. पूर्वी कलकत्त्याच्या शिक्षकात पुणेरी शिक्षकाप्रमाणे दोन सद्गुण मोठ्या प्रमाणात पहावयास मिळत: मुलाविषयी सद्भावना व आदर्शवाद. खरा शिक्षक म्हणजे आदर्शवादी मिशनरी असतो. हे जे नवीन रिक्रूट शिक्षणक्षेत्रात शिरले त्यांच्याजवळ यांच्यापैकी काहीच गुण नव्हते. अशा लोकाजवळ असलेला सर्वांत मोठा सद्गुण म्हणजे राजकारण ! त्याच्या बळावर इतर क्षेत्रातील आपल्या फलींग्जप्रमाणे पैसा, प्रतिष्ठा व कीर्ती संपादन करण्याचा या नवशिक्षकांनी चंग बांधला.

ते यशस्वीही झाले.

त्याचे कारण कम्युनिस्ट राजकारणी मंडळींनी त्यांना हाताशी धरले.

दुसऱ्या महायुद्धाच्या काळी महागाई रोज वाढत होती. पूर्वेस सुभाषबाबूंचा जोर असल्याकारणाने कलकत्ता आज ना उद्या पडणारच, अशी असुरक्षिततेची भावना तेथे होती. युद्धाच्या काळी मास्तर लोकांना कोण भाव देणार ?

असुरक्षिततेची भावना आली की 'युनियन' निर्माण झालीच. कम्युनिस्टांना दुसऱ्या महायुद्धाच्या उत्तरार्धात चांगले दिवस आले होते. त्यांनी हळू हळू या सर्व बंगाली युनियन्सचा कबजा घ्यावयास सुरुवात केली. नुसत्या शिक्षकांच्याच नाही, साऱ्या व्यावसायिक युनियन चळवळी त्यांनी आपल्या ताब्यात घेतल्या. विद्यार्थ्यांचीही युनियन कम्युनिस्टांनी गिळंकृत केली.

कलकत्त्याच्या शिक्षणक्षेत्रात पूर्वी त्यागाची भावना दिसे. उद्याच्या नेतृत्वाची बीजे आजच्या तरुण पिढीत आहेत, त्यांची नैतिक मूल्ये टिकवून धरायची असल्यास त्यांना उत्तम शिक्षण दिले पाहिजे वगैरे आदर्शवादी कल्पतेने भारून जाऊन पुष्कळ चांगले लोक जाणूनबुजून कमी पगारावर शिक्षणक्षेत्रात शिरत.

या नवशिक्षकांजवळ ही उदात्त भावना कोठून असणार ?

जुने शिक्षक क्रांतीचे धडे मुलाना देत. त्याचबरोबर मारून ठोकून मुलांकडून अभ्यासही करून घेत. त्यामुळे नवीन पिढी आपोआप राष्ट्रीय विचारानी प्रेरित बनत असे. ज्यास cream of youth म्हणता येईल अशा मुलावर वरील आदर्शवादी शिक्षकांचा खास लोभ होता.

दुसऱ्या महायुद्धात मूल्येच बदलली. त्याचे श्रेय (?) कम्युनिस्टांना.

त्यानी All-India Students Federation काढली. विद्यार्थ्यांचे हित हे तिचे कधी ध्येयच नव्हते. काँग्रेस–विरोध हा तर तिचा पाया होता. पूर्वी काँग्रेसमध्ये आजच्याएवढे संधिसाधू नसत. सधी साधायला होतेच काय ? फक्त त्यागास वाव होता. काँग्रेसविरोधातून राष्ट्रविरोधी भावना हळहळू जोपासल्या गेल्या.

पाटणा अधिवेशनाच्या वेळी या A I S F चे खरे स्वरूप ध्यानी आले. १९४२ च्या चळवळींत बंगाली विद्यार्थ्यांनी या A I S F च्या नादी लागून बिलकूल भाग घेतला नाही.

१८५७ प्रमाणे १९४२ मध्ये पंजाब व बंगाल यानी राष्ट्रास पुन्हा 'धोका' दिला

हे सत्य विसरणे राष्ट्रवादी लोकांना कसे शक्य आहे ?

म्हणून तर 'इतिहास विसरा' ही मोहीम या मार्क्सच्या चेल्यानी सुरू केली असावी !

युद्ध सपले. त्या सुमारास विद्यार्थी एकदम भलतेच ब्रिटीश-विरोधी झाले. कदाचित इंग्रजांवर चिडलेल्या मॉस्कोने वरून आदेश दिला असेल.

विद्यार्थ्यात हिंसाचाराची सुरुवात तेव्हापासून झाली.

गेल्या दोन वर्षात विद्यार्थीवर्गात हिंसाचाराचे प्रमाण वाढले आहे. याचे कारण नक्सलाईटांनी विद्यार्थ्यांच्या मनावर केलेली जादू !

'कलकत्त्याचे विद्यार्थी वाईट नाहीत. ते स्वप्नाळू व आदर्शवादी आहेत,' मला एका राष्ट्रवादी जनसंघी पुढाऱ्याने सांगितले.

'काय म्हणता ?'

'फक्त त्यांना चुकीची शिकवणूक मिळत गेली आहे.'

'म्हणजे ?'

'मुलांची सहज साहसी प्रवृत्ती असते. त्यास जो कोणी खतपाणी घालेल तो पुढारी जिंकतो. मुलांचा उत्साह, साहसी प्रवृत्ती, त्यागभावना, आदर्शवाद, अन्यायाच्या विरुद्ध बंड करण्याची दुर्दम्य शक्ती—ह्या साऱ्यांना उत्तेजन पाहिजे असते. मार्गदर्शन नीट मिळाले की त्यातून चांगली पिढी तयार होते. मार्गदर्शन स्वार्थी असले तर पक्षीय राजकारणासाठी मुलाना खोटा हिंसाचाराचा मार्ग दाखविला जातो.'

'समाजवादी, काँग्रेस व कम्युनिस्ट सारे याबाबतीत सारखे आहेत.'

'कारण सर्वांनी परिस्थितीशी मिळतेजुळते घेण्यासाठी आपल्या मूल्याच्या व्याख्या पार बदलून टाकल्या आहेत.'

'साऱ्यांचा चार्वाक हाच आदर्श झाला आहे.'

'पण चार्वाकाचा भर वैचारिक सामर्थ्यावर होता, आचारावर नाही. आज विचारांवर भर कोणीच देत नाहीत.'

१९६७ सालच्या मध्यभागी नक्सलाईट चळवळ वाढली. त्या सुमारास कलकत्त्यात विद्यार्थ्यांचे एक कन्हवेन्शन भरले होते. नक्सलाईट चळवळीपासून प्रेरणा घेऊन विद्यार्थ्यांनी त्याच वेळी कलकत्ता विश्वविद्यालयाच्या उपकुलपतीस 'घेराव' केले. बॉम्स् त्यावेळी उपलब्ध नव्हते म्हणून 'अॅटम् बॉम्स्' नावाचे फटाके वापरले गेले. कॉलेज स्ट्रीटवरील ही धमाल थंड करण्यासाठी सरकारने बरेच प्रयत्न केले. संयुक्त आघाडीचे सरकार होते त्यावेळी. त्यातील कम्युनिस्टांना भीती वाटली, विद्यार्थी आपल्याला सोडून नक्सलाईटाच्या मागे गेले तर आपले कसे होईल ?

सुरुवातीला नक्सलाईट पुढाऱ्याची जिरविण्याची संधी सत्तारूढ कम्युनिस्टाना मिळाली हे मी मान्य करतो. प्रेसीडेन्सी कॉलेज, हॉस्टेल व कॉफी हाऊस येथे नक्सलाईटांना पाहिजे तशा 'क्रांतिकारक' चळवळी सुरू झाल्या नाहीत. नक्सलाईटांनी

मिड्टर्म निवडणुकांवर बहिष्कार घातला. पण हा बहिष्कार यशस्वी झाला नाही. फार काय, उत्तर बंगालमध्ये नक्सलबारी असूनदेखील तेथे कॉंग्रेसचाच उमेदवार जिकून आला.

कम्युनिस्टानी नक्सलाईटांना सी. आय. ए. मदत करते असा प्रचार सुरू केला होता !

नक्सलाईटानी कपाळास हात लावला पण ते निरुत्साही मात्र झाले नाहीत.

बाकी सी. आय. ए. चे भूत खरे किती व खोटे किती ते कळावयास आज काहीच मार्ग नाही. रशिया व अमेरिका आज जगावर राज्य करतात. त्यांच्या-पाशी गुप्तहेर यंत्रणा कार्यक्षम नसेल तर हे राज्य करणे अशक्य आहे. पूर्वी राज्य करणे याची व्याख्या निराळी होती. मार्क्स जन्माला आल्यापासून या व्याख्येतही मोठी क्रांती झाल्यासारखी वाटते ! हल्ली राज्य करणे म्हणजे आर्थिक नाड्या हाती ठेवणे हे होय. पुणे सारे जिंकून त्याच्या शासकीय भानगडी निस्तरण्यापेक्षा ‘लक्ष्मी रोड’ आपल्या ताब्यात ठेवला की काम भागले अशी हल्लीची राज्य करण्याची व्याख्या झाली आहे. पैशाची गरज पडली की ते आपल्याकडे आपोआप येणार आहेतच, मग ती नगरपालिकेची निवडणूक असो, विधानसभेची असो नाही तर आणखी कोठली असो.

सी. आय. ए. किंवा त्याच्या रशियन वा चिनी आवृत्तीचे धोरण सोपे आहे. “भारतास वर येऊ द्यायचे नाही, म्हणजेच भारताची शेती व व्यापार, उद्योग ऊर्फ कारखानदारी कसेही करून मंद वेगाने पुढे जाईल असे करणे. ते करणे सोपे आहे. किर्लोस्करांचा पुण्यात जोर कोठवर ? जोपर्यंत त्याचे मजूर नियमित उत्पादन करीत आहेत व जोपर्यंत त्याचे पंप्स् परदेशी व परप्रांती खपत आहेत तोपर्यंत ! मजूर लोक अस्वस्थ झाले किंवा बाहेरच्या ऑर्डरी येण्याच्या बंद झाल्या की शंतनू-रावाची तब्येत बिघडलीच पाहिजे ! !

ओळखीचे म्हणून शंतनूरावाचे उदाहरण दिले.

खरे जिवंत उदाहरण पहायचे असेल तर चलो कलकत्ता !

गेल्या नोव्हेंबरात यशवतरावानी बगाल प्रांतात ‘लॉ अँड् ऑर्डर’ परिस्थिती गंभीर आहे असे म्हणताच ज्योति बसू कसले उसळले ? त्यानी गृहमंत्र्याना अहमदाबादेतील जातीय दग्यांची आठवण दिली व विचारले, गृहमंत्र्यांना तेथे काय करता आले ? तेथे का गृहखाते मूग गिळून आहे ?

यशवतराव काय म्हणणार ?

अदरकी बात ही की अशा आडवळणाने गेल्यामुळे जोति बसूची बाजू काही मजबूत होत नाही.

यशवंतरावांनी म्हणून ऑफीशअली ‘केंद्र गृहखाते टू बगाल सरकार गृहखाते’ पुढील विचारणा केली : ‘बंगालमध्ये राजकीय खुनाचा आकडा किती ?’



fanta
जमाडी जंमत,
गमाडी गंमत...
मजेमजेने
प्यालात कधी?
FANTA IS A REGISTERED TRADE MARK OF THE COCA-COLA COMP
फॅन्टा ऑरेंज....
इतके मधुर की,
तहानेतहि
गंमत.
फॅन्टा, कोका-कोला कंपनीचे उत्पादन.
CMCF-S-152

आता आली का पंचाईत ? जबाब काय द्यायचा ?

ही पंचाईत तत्त्वात विश्वास असणाऱ्यांची होते. कम्युनिस्टांची नाही. त्यांनी ठणकावून उत्तर दिले : 'खून राजकीय आहे किंवा नाही हे ठरविण्यात फार अडचणी आहेत त्यामुळे निश्चित आकडा देणे शक्य नाही.'

यशवतरावांनी केद्रीय गृहखात्याचा गुप्त अहवाल प्रसिद्ध केला तेव्हा मात्र ज्योतिबाबूना दिवसा तारे दिसले असतोल !

१९६९ मार्च ते सप्टेंबर म्हणजे सातच महिन्याचे पुढील आकडे वाचले की साध्या माणसाला सहज चक्कर येईल.

१. खून पाचशे अठ्याहत्तर, २. घायाळ व्यक्ती सहाशे त्र्यहात्तर. ३. आंतर-पक्षीय मारामाऱ्या पासष्ट. ४. क्रिमिनल केसेस् मागे घेतल्या त्याची संख्या १०१०. ५. स्ट्राईक्स् ५५१. ६. घेराव ३७६. ७. जमिनी लुटून हडप केल्या त्यांची संख्या २१८. ९. स्त्रियांवर बलात्कार झाले त्याची संख्या ८.

गांधीवधोत्तर जाळपोळ झाली त्यावर कोणी अमेरिकन मुलगी संशोधन करेल (उदा. लिंडा कॉक्स्) तेव्हा तिला महाराष्ट्रात त्या मानाने नुकसान काहीच झाले नाही असे अनुमान काढावे लागेल ! कारण वरील सहा महिन्यांचा प्रकार चालू राहिला तर साऱ्यांची मानसिक स्थिती वेड्यासारखी होते व त्यामुळे कारखान-दारीस सर्वात मोठा धोका पोचतो, उत्पादन निम्मे कमी होते, लोक बेकार होतात, व या चिडलेल्या लोकांना जास्त गरम करणे तौलनिक दृष्टया सोपे जाते. १९६५ च्या युद्धात काही कम्युनिस्ट्स् पुण्या-मुंबईत पद्धतशीर प्रचार करीत असताना मी पाहिलेले आहेत, 'पाहिले का, आपले बाधव लढत आहेत व ह्या शेठ लोकांची पोरे मजेत गाड्या उडवीत आहेत !'

गोष्ट सत्य होती. फक्त तिला थोडे विकृत स्वरूप देण्याची आवश्यकता होती. ते टेकनिक् परदेशाहून ताबडतोब या पक्षास मिळते. त्यामुळे रिझल्ट्स् गॅरंटीड् ! गुण न आल्यास माल (म्हणजे टेकनिक्) परत ! याचा अर्थ, दुसरी युक्ती. उस्से जादा स्ट्रॉंग.

बगाल चिडलेला आहे याची कारणे सरळ आहेत. बंगाल भावनाप्रधान आहे. वैष्णव व शाक्त दोन्ही विचारांचा तो भक्त आहे. बगालच्या रक्तात क्रांती आहे, बंडखोरी आहे. बगालचे साहित्य, कला, समाज, राजनीती व धर्म या साऱ्या क्षेत्रात ही बडखोरी, ही क्रांती दिसून येते. बंगालची प्रकृती शस्त्रानुरागिणी आहे माता काली त्याची देवता आहे.

'लॉर्ड कर्झन ज्या बंगालची फाळणी करू शकला नाही त्या बगालची फाळणी गाधीजी व नेहरू यानी केली; का अमचा राग नसावा त्यांच्यावर, मिस्टर ?' मला माझ्या बगाली मित्रानी विचारलेला प्रश्न आठवतो. त्याला उत्तर काही नाही.

'खर म्हणजे भारताचे नेतृत्व टिळकानतर आम्ही बगालनी करायचे, तुमच्या

गुजराथने नाही. तुमच्या गुजराथने गांधीजी देशास दिले व देशाचे वाटोळे केले. साऱ्या राजकारणाचा व्यापार केला. सारा दुटप्पीपणाचा व्यवहार शिकविला. इंग्रजाना त्यांच्या हितासाठी कोणी स्टूज् पाहिजे होता तो त्यांना आयता मिळाला. त्याना खडी फोडायला म्हणून इंग्रजाने अदमानात धाडले नाही, त्याची सारी जेलयात्रा आगाखान पॅलेसमध्ये झाली. सारे संधिसाधू एकत्र जमले व देशहिताचा खून पाडला. म्हणे बेचाळीसचे स्वातंत्र्याचे क्रांतिकारक ! अहमदनगरच्या तुरुगात कोकरीसाठी झगडत होते !! दाखवा मला, गाधीजीच्या एकाही चेल्यास कधी ब्रिटीशानी फाशी चढविले असल्यास !

मला बगाली गांधी-विरोध ठाऊक होता, पण त्याची ही धार माहीत नव्हती. गाधीविरोध फक्त सदाशिव पेठेत आहे अशी माझी ठाम समजूत होती ती कलकत्त्यात पार खोटी ठरली. मी गुर्जर म्हणजे गाधीभक्त असे गृहीत धरून माझ्यासमोर गाधीवादाचे शवच्छेदन माझ्या मित्रानी सुरू केले.

'१९१५ त गाधीजी आफ्रिकेहून जेव्हा भारतात आले त्यावेळी स्वातंत्र्यसग्रामाची सारी सूत्रे महाराष्ट्रात व बगालमध्ये होती. गांधीजीच्या दक्षिण आफ्रिकेतील सत्याग्रहात बगालने प्रथम बराच इटरेस्ट दाखविला होता. म्हणून भारतात आल्यावर फिनीक्सच्या आश्रमवासीयाना प्रथम शातिनिकेतनात आणण्यात आले'

'मग तो इटरेस्ट का आटला ?'

'बगालच्या तरुण वर्गाचा सशस्त्र क्रातीवर विश्वास होता. गांधीजीचा हा मार्ग त्याना बोगस वाटू लागला. त्यांना अहिंसा हा शब्दच पसत नव्हता. म्हणून साऱ्या भारतभर खिलाफत चळवळीसाठी गाधीजीना जबरदस्त पाठिंबा मिळाला. पण बगाल तेवढा एकमेव अपवाद ! रवीद्रनाथ टागोरानी गांधीजीना काय विशेषणे द्यावीत ? 'तानाशाह' (डिक्टेटर) व 'अधश्रद्धाळु रूढीवादी' ! टागोरानी तर गाधीजीवर एकदम कडक टीका चालू केली होती। चरख्याच्या कार्यक्रमाचा स्वीकार करण्याससुद्धा त्यानी नकार दिला होता.'

'हे मला ठाऊक नव्हते.'

'कारण गांधीजीच्या सरकारी प्रचारकांनी ही बाजू उजेडात आणलेलीच नाही. त्यानंतर गाधीजीना खरा विरोध देशबंधू सी. आर. दास व सुभाषबाबू या दोघांनीच केला. महाराष्ट्रात सावरकरांनी विरोध केला असेल पण तो शाब्दिक व वैचारिक !'

'हे थोडेफार खरे आहे !'

'देशबधू दासाची व गाधीची लढयाची सुरुवात १९१९ च्या अमृतसर कॉंग्रेस अधिवेशनात झाली. पण खरी साठमारी नागपूर येथे पहावयास मिळाली. दासांची सहानुभूती क्रातिकारकांना होती. विधानसभेवरील बहिष्कारावरील ठरावावर दासानी गांधीजीना कसून विरोध केला. गोपीनाथ सहाय या तरुण क्रातिकारकाने

फाशीवर चढायच्या आधी 'या देशात अहिंसेस एवढेही स्थान नाही' असे जेलच्या कोठीवर लिहून ठेवले होते. त्या गोपीनाथ सहायला श्रद्धांजली अर्पण करण्याचा ठराव अहमदाबादच्या अधिवेशनात तुमच्या महात्माजींनी उडवून लावला! वीर भगतसिंगास सोडविण्यासाठी दयेचा अर्ज करण्यासमुद्धा या महात्म्याने नकार दिला होता!'

'त्यास महात्माजींची स्वत:ची काही कारणे असू शकतील.'

'आम्ही बंगाली तसे नाही मानत. गांधीजी ब्रिटिशांच्या तालावर नाचत असे असे आम्हास वाटत होते व अजूनही वाटते.'

'ते परवा पद्मश्री मिळालेल्या श्री. घाटक यांच्या विधानांवरून कळलेच!'

'त्या बाबतीत बंगाली लोक निर्भीड आहेत. सुभाषबाबू भारतात पहिल्यांदा आले व तडक महात्माजींना भेटावयास गेले. पण तेथे त्यांचे समाधान होईना. कलकत्त्यास दासांना भेटल्यावरच त्यांचे खरे समाधान झाले. माझा आदर्श नेता आता मला मिळाला व त्याच्या पावलावर पावले टाकून मी जाणार आहे हे सुभाषबाबूंचे उद्‌गार प्रसिद्ध आहेत.'

'चांगलेच.'

'सुभाषबाबूंची वाढती लोकप्रियता महात्माजींच्या डोळ्यात खुपू लागली. त्यांनी नेहरूंना सुभाषबाबूंसमोर लढण्यासाठी रिंगणात उभे केले. स्वतःची सर्व प्रतिष्ठा व व्यक्तिमत्त्व पणास लावून पट्टाभि सीतारामय्या यांना गांधीजींनी सुभाषबाबूंसमोर उभे केले. सुभाषबाबूंनी सीतारामैय्यांचा पार निकाल लावला. पट्टाभींचा पराजय हा माझा पराजय आहे असे गांधीजींनी कबूल केले. नंतर परदेशी जाईस्तोपर्यंत सुभाषबाबूंना गांधीजींनी पुरते छळून काढले.'

'पण त्यांच्याच बंधूंना—शरतचंद्रांना—गांधीजींनी हाती धरले.'

'गांधीजी आणखी काय करू शकणार होते. दुर्दैवाने स्वातंत्र्यानंतर एकही चांगला पुढारी काँग्रेसच्या बाजूला फिरकलाच नाही.'

'चांगला म्हणजे?'

'खऱ्या बंगाली वृत्तीचा. संवेदनाशील, गरम माथ्याचा व खराखुरा देशभक्त.'

'डॉ. रॉयसुद्धा?'

'होय, डॉ. रॉयसुद्धा. ते प्रोग्रेसिव्ह कधीच नव्हते. बंगाली माणूस जन्माने प्रोग्रेसिव्ह असतो.'

'कम्युनिस्ट नेते बंगालचे खरे प्रतिनिधी कशावरून?'

'ते गांधीवादी नाहीत. ते भारतावर प्रेम करतात.'

'काय?'

'मग काय देशभक्तीची मोनोपोली तुम्हाला दिली आहे काय?'

'तसे नाही. पण—'

'पण काय ? ऐका माझे. ते एकजात सारे देशभक्त आहेत. मार्ग चुकलेले असतील. पण त्यांना गेले वीस वर्षे तुम्ही अस्पृश्य समजत होतात. त्यांना आता तुमच्यावर सूड घेण्याशिवाय शाती लाभणे शक्य नाही.'

'पण ते दहशतवादी आहेत.'

'तुमचे सावरकर दहशतवादी होते. याचा अर्थ ते देशभक्त नव्हते ?'

कम्युनिस्टांनी चीनमध्ये 'क्रांती' खेड्यांतून शहराकडे नेली. मात्र चिनी क्रांतीचे हे बंगाली पायिक ह्या प्रयोगासाठी शहरावरच अवलबून आहेत. १९६८ पर्यंत ही वैचारिक क्रांती शहरांपुरती मर्यादित होती. पहिल्या सयुक्त आघाडीच्या सरकारासदेखील खेड्यात प्रत्यक्ष कार्य करण्यास सधी मिळाली नाही. दुसऱ्या सयुक्त आघाडीने खेड्यातील 'सरप्लस्' जमिनी खेडुताना हजम् करावयास शिकविले व सारा घोंघळ सुरू झाला. पहिल्या आघाडीस या बाबतीत अपयश येण्याची कारणे पुढीलप्रमाणे : १ पूर्वीचे सत्ताधारी सोवळे होते. लोकाच्या फुकट जमिनी उपटणे त्याना मंजूर नव्हते. २ : गरीबाना 'सरप्लस' जमिनी मिळाल्या पाहिजेत हे तत्त्व त्याना मान्य होते. ३ : इतर पक्षाना मार्क्सिस्टांची भीड वाटत नव्हती. उलट 'नक्सलबारी' प्रकरणाची त्याच्या मनात थोडी फार चीडच होती.

दुसऱ्या सयुक्त सरकारची तऱ्हा न्यारी होती. त्यांची सुरुवातच झाली ती नक्सलाईट पद्धतीने. त्यामुळे सयुक्त आघाडीतील जो तो पक्ष आपल्या शेतकरी मतदारांसाठी जास्त जहाल मते बोलू लागला—अगदी बागला काँग्रेससुद्धा. उदा. सरप्लस जमिनीचे मालक कोर्टात जाऊन दावा लावायच्या आतच ती खेडुतांना फुकट वाटून देण्याची अहमहमिका सुरु झाली.

जागा ताब्यात घ्यायची धुंद काही विचित्रच आहे. ती डोळ्यानी पाहिली तरच समजून येऊ शकेल. तेवढीच जिद्द ती जमीन आपल्या हातातून न जाऊन देण्याची असते. दोन्ही बाजला जेवढी जिद्द तेवढी जास्त तेढ व मारामारी. आजपर्यंत जमीनदाराच्या बाजने पोलीसपाटील मडळी पडत असत, खेडुतास मारपीट होई व जागेचा न्याय Possession means nine points in law असे म्हणून जमीनदाराच्या बाजूने होई, कम्युनिस्टाच्या राजवटीत पोलीसानी जमीनदाराची बाजू घ्यायची पद्धत by order बद झाली. एकदा पोलीसांची भीती नाही एवढे कळले की पुरे. कलकत्त्यात दर चौरस मैलात ५५० पोलीस आहेत. त्याउलट खेडेगावी दर दोन चौरस मैल क्षेत्रफळात फक्त तीन पोलीस आहेत. ही माहिती मार्क्सिस्ट पक्षाच्या कार्यकर्त्यांनी लोकाना मुद्दाम समजावून दिली ! पक्षकार्य !! खेडुतही हल्ली फार हुशार झालेले आहेत. पोलीसाच्या भीतीमुळेच सहसा ते कायदेभग करत नाहीत. पण पोलीसाची भीती निघाल्यावर व सत्ताधीश पक्षाची अप्रत्यक्षपणे साथ मिळाल्यावर मग काय विचारता ?

कम्युनिस्टाच्या खास भारत-तज्ञानी महाराष्ट्राकडे फार आशाळभतपणाने पाहिले

होते; पण यशवंतरावांनी महाराष्ट्रास या सर्व हिंसेपासून दूर ठेवले. उलट, सहकारी शेतीची स्थापना करून हिरवी क्रांती घडवून आणली.

प. बंगालमध्ये ह्या हरीत क्रांतीस संधीच नाही. १९६८ साली ५७५ खून झाले व २३,८८३ चोऱ्या व दरोडे पडले. १९६९ च्या पहिल्या दहा महिन्यात (जाने–ऑक्टो.) ५७९ खून झाले व २४,४३० दरोडे पडले ! या धकाधकीच्या वातावरणात कसले कपाळाचे पीक येणार ?

३२ कलमाचा कार्यक्रम हे या संयुक्त सरकारचे एक खास आकर्षण !

संयुक्त आघाडीतील सर्वच पक्षांनी त्यावर सही केली व ते त्या डाव्या कार्यक्रमाचे बंदी झाले. अगदी बांगला कॉंग्रेसही ! मिदनापूर जिल्हा बांगला कॉंग्रेसचा बालेकिल्ला. जसा कऱ्हाड महाराष्ट्र कॉंग्रेसचा. पण तेथे पिके उभारून आली असता उभीच्या उभी कापून नेली गेली. एक दोन वेळा नाही तर एकंदर १३०० वेळा. अर्थात् निरनिराळया ठिकाणी. घाबरून जाऊन वादग्रस्त जमिनीच्या मालकांनी आपली पिके पंचायती मैदानावर जमवून ठेवली. तेथे मारामाऱ्या आजही आहेत.

एकदा 'मारामाऱ्या' हेच ऑफीशीअल धोरण ठरल्यावर काळ व स्थळ याची कोण तमा बाळगणार ? या मारामारीमुळे जुनी शेतीची व्यवस्था पार धुळीस मिळाली आहे. नवीन व्यवस्था ? छेः, त्यास 'व्यवस्था' शब्द ठीक वाटत नाही. आणि ग्रामीण भागात जे दिसते वा जे ऐकू येते त्यास आपल्या मराठी भाषेत शब्दच नाही. 'केऑस' हा इंग्रजी शब्दही फिक्का वाटतो.

पूर्वी श्रीमंत शेतकऱ्याकडे पैसे मागायला किंवा आपले धान्य विकण्यासाठी राजरोसपणे जाता येत असे. आता एक तर जायलाच भीती वाटेल, कारण होकारात्मक उत्तर मिळणे अशक्य आहे. जमीनदाराकडे तुम्हास चुकून आसरा मिळाला की मार्क्सिस्ट पुढारी म्हणणार, 'पहा, याच्याकडे सरप्लस जमीन आहे. नाहीतर हा लेकाचा पैसा कोठून आणतो बरे ? 'सरप्लस जमीन म्हणजे तो मेला ! लगेच दरोडा किंवा त्या जमिनीची वाटणी–बाय् फोर्स !

फक्त वाईट एवढेच वाटते की लुटून गोळा केलेला पिकाचा माल जास्त वेळ घरात टिकून रहात नाही.

गुंडाचे नाक सर्वत्र तीक्ष्ण असते. त्याना लुटीचा वास चटकन् येतो.

जमीनदाराच्या सरप्लस जमिनीचे वाटप कम्युनिस्ट पक्ष गुंडामार्फत करवितो. या सरप्लस जमीनी व जमीनदार याची संख्या मर्यादीतच असते. ती संख्या संपली की मला सांगा, गुंड स्वस्थ कसे बसतील ? आणि का बसावे ? त्यांनी त्याचा धंदा तर चालविला पाहिजे ना ?

बिचाऱ्या नवमालकाचे हाल जे सध्या आहेत ते त्यामुळे ! 'धम्मं शरणं गच्छामि' या तालावर ते आज असहाय्यपणे आळवीत असतील : गुंड शरणं गच्छामि । पक्षं शरणं गच्छामि । चीन शरणं गच्छामि ।'

या सर्व गुंडगिरीत मरतो कोण ?

याबाबतीत माझा लॉ पुढीलप्रमाणे : Whatever happens, the weak suffers more and more; the strong continues to enioy his privileges.

मग परचक्र असो, दुष्काळ असो, महापूर असो, काय वाटेल ते असो.

गरीब मार खायलाच जन्मास येतात. गुंड मार द्यायला, ठोकायला.

या सर्व गडबडीत एकाही जोतेदारास नुकसान पोचलेले नाही. मारामाऱ्या त्यांनी किंवा त्यांच्या पित्यांनी सुरु कराव्या. कित्येक वेळ बंदुका त्यांच्याच असत. बिचारी कुळे फुकट मार खात. जोतेदार आज मार्क्सिस्टांना पाठिंबा देत आहेत ! हा गुंड-राजकारणी-जोतेदार त्रिकोण अमर आहे. तेवढाच भयानकदेखील.

हे का व कसे ते मला कळत नाही. पण ही बडी धेंडे कॉमन् फॅक्टर्स म्हणून आढळतात सर्वत्र.

१९६५ सालची हकीगत. आमच्या शहरी नागरी संरक्षण समिती स्थापन झाली. सभासद कोण ! तेच जुने चेहरे—ज्यानी काळाबार करुन, लोकांना बनवून, ठकवून पैसा लुटला, गरीबाचे शोषण केले ते ऐटीत युद्धाच्या, संरक्षणाच्या, एकजुटीच्या, एकात्मतेच्या तत्वज्ञानाच्या गप्पा सांगत होते. राग येतो आपल्याला अशा वेळी. यांना गोळ्या घालाव्या असे वाटते. पण काहीही प्रसंग होवो, हे लोक पुन्हा


मानवाचा जागतिक विक्रम
आयुर्वेदाचा जंगी पराक्रम ।
कितीही झाला अतिसार
"मस्कीनॉल"ने होई पसार ।

" मस्कीनॉल "

आमांश ( पोटात कळ अगर मुरडा होऊन शौचास होणे ) रक्तातिसार ( शौचातून रक्त पडणे ) हगवण, जुलाब, उलटी, कॉलेरा यांवर वनस्पतीचे अनुभवसिद्ध प्रभावी औषध.

मस्कीन फार्मा, मुंबई नं. ७

आमचे अग्रगण्य पुढारी खरेच. मग ते पुणे असो, इंदोर असो, वडोदे असो का कलकत्ता असो.

बगालमध्ये भूमिहोनांना जमिनी वाटण्याचे पवित्र कार्य अयशस्वी ठरले ते या काळचा त्रिकोणामुळे. सयुक्त आघाडीच्या चिल्लर डाव्या पक्षांमध्ये एकजूट कोठे आहे ? प्रत्येक जण स्वत.स महान् पुढारी समजणार व दुसऱ्यास खाली पाडण्याची कोशीस करू पाहणार. हा वैयक्तिक (पर्सनल) फॅक्टर राजकारणात काढून टाकणे अशक्य आहे. काका-मामाचे राजकारण म्हणतात ते हेच. खेडेगावात आपली लोकप्रियता वाढावी, त्यासाठी या पक्षानी आपली माणसे व आपले जोतेदार निरनिराळ्या विभागात नेमले. भूमिहीनांना जमिनी द्यायच्या हे तत्त्व ठीक झाले, पण हे भूमिहीन 'काका-मामा' असले पाहिजेत, आपले पक्षाचे सभासद असायला पाहिजेत ! कसेल त्याची शेती हे तत्त्व ठीक आहे. पण मार्क्सिस्ट जोतेदाराने कसले नाही तरी चालते.

कसले तत्त्व नि कसली निष्ठा ?

बंगालच्या शेतकऱ्यात जी असुरक्षिततेची भावना आज दिसते तिचे मूळ या तत्त्वनिष्ठेच्या दुटप्पी धोरणात सामावलेले आहे.

तुमची संपत्ती जतन करायची आहे ना, मग सत्ताधीश पक्षाची टोपी चढवा. आजच्या बंगाली जोतेदारांच्या एकजात लाल टोप्या आहेत. कारण सत्ता लाल टोप्याची आहे. पूर्वी या पांढऱ्या टोप्या असत ! आज ही लाल टोपी नाही चढवली तर जमीन जाते, पिके कापली जातात, घर जाते, बायको व पोरे बाळेदेखील !

गावातील या खेडवळ मंडळीना राजकारण समजत नाही. पण स्वत.चा स्वार्थ नीट समजतो. त्याना शातता, सुरक्षितता व लक्ष्मी पाहिजे. जो पक्ष त्यांना ही आश्वासने देईल व त्यांच्या स्वार्थाजवळ जास्तीत जास्त नेऊन सोडेल तो त्याचा पक्ष !

माझी खात्री आहे, हे सर्वच ग्रामीण विभागाचे सर्वमान्य तत्वज्ञान आहे. पक्षीय म्होरक्यांचा गद्दारांना पायात पत्री ठोकण्याची हिंमत मात्र पाहिजे, नाहीतर आपल्यावर वेत उलटण्याचा धोका असतो !

कोणी विचारेल, या डाव्या गटाच्या राजकारणामुळे भूमिहीनाचा तर फायदा झाला ना ?

भूमिहीनानी कॉंग्रेसमध्ये प्रवेश करून कॉंग्रेस सत्तेवर असताना आपला फायदा करून घेतला होताच की. त्याचे विरोधी भूमिहीन वाटच पहात होते आपल्याला केव्हा चान्स मिळतो आहे त्याची. थोडक्यात, सामर्थ्य आहे चळवळीचे, जो जो करेल तयाचे.

(क्रमश.)

प्रत्येक गुन्ह्याच्या तपासात पोलीसांना निरनिराळे अनुभव येतात. लाचलुचपतीच्या तपासातही काही वेळा काही विलक्षण व अनपेक्षित परिस्थितीस तोंड द्यावे लागते हे कोणास खरे वाटणार नाही. लोभी सरकारी नोकर. त्याला पकडण्यात कसले चातुर्य आणि कुठली कठीण समस्या? एका आयकर अधिकाऱ्यास पकडण्याचे बाबतीत काही विचित्र व अनपेक्षित घटना निर्माण झाल्या होत्या. त्या केसमध्ये लाच म्हणून मागण्यात आलेली रक्कमही लहान सहान नव्हती. वापरण्यात आलेले लाचेचे पैसे सरकारी असल्याने आरोपीच्या ताब्यातून त्याला दिले गेलेले पैसे परत मिळेपर्यंत तपास हाती घेतलेल्या अधिकाऱ्याची त्रेधातिरपिट उडाली होती.

एका मोठ्या शहरात बिनीवाले शेट कच्चर मोत्यांचा धंदा करीत होते. सुरवातीस त मुंबईच्या व्यापाऱ्याकडून कच्चा माल घेऊन मोत्यांना वेजे पाडून विकत असत. काही दिवसानी त्यानी त्यांच्या गावच्या एका श्रीमंत मित्राबरोबर भागी-

# पूर्वपुण्याई

गो. ल. लिमये

दारीत धंदा वाढविला. हे मित्र जवळच्या एका जिल्ह्याच्या गावीं लाकडाचा धंदा करीत होते. बिनीवाले आता त्यांच्या धंद्यास लागणारा कच्चा माल जपानहून आणवू लागले. या व्यवहारात त्याना एकदोन लाखाचे भांडवल गुंतवावे लागले. धंदा नवा असल्याने सुरुवातीस धंद्यात खोट खावी लागली. हळूहळू धंद्यात चांगला फायदा मिळू लागला. हा मिळालेल्या फायदा पूर्वीची खोट भरून काढण्यास वापरावा लागला, तरी त्याना काही वर्षानी आयकर भरणे प्राप्त होते. प्रथम तुटीचे हिशेब दाखल करून शहरातल्या आयकर अधिकाऱ्यांकडून बिनीवाल्यानी करमाफी मिळवली. नवीन भागीदारी केल्यावर त्यांचे आयकर आकारणीचे काम शहरातील आयकर अधिकाऱ्यानी बिनीवाल्यांचे भागीदार राहत असलेल्या जिल्ह्याच्या आयकर अधिकाऱ्याकडे पाठविले. बिनीवाले जिल्ह्याचे ठिकाणी गेले व संबंधित अधिकाऱ्यास भेटले. सदर अधिकाऱ्यानी बिनीवाल्याना व त्यांच्या भागीदाराला त्यांच्या व्यवहाराच्या सर्व हिशोबाच्या वह्या हजर करण्यास सांगितल. काही दिवसानी बँक बुके व इतर व्यवहारासंबंधीचे कागदपत्र हजर

करण्यास आयकर अधिकाऱ्यानी बिनीवाल्याना सांगितले. बिनीवाल्याना महिन्यातून जिल्ह्याचे ठिकाणी एक दोन खेपा कराव्या लागत. अशा सात, आठ खेपा झाल्या. परंतु त्यांच्या कामाचा काहीच निकाल लागेना. नतर एका भेटीत आयकर अधिकाऱ्यानी बिनीवाल्याना आपल्या बगल्यावर बोलाविले. हे अधिकारी तरणेबाड, हुशार व सुविद्य होते त्यांचे नाव सिंग. उत्तर प्रदेशातील रहिवासी. त्यांचे सासरे केंद्र सरकारात मोठया हुद्यावर होते. घरातली राहणी व मांडणी श्रीमंतीची. साहेबांचे वागणेही कुऱ्हेबाज होते. साहेबानी बिनीवाल्याना बैठकीच्या खोलीत बसावयास सांगितले व घरातून चहा मागविला. चहा घेता घेता बिनीवाल्यानी त्यांच्या केसचा विषय काढला. केसच्या निकालास विलब होत असल्याचे साहेबांच्या नजरेस आणले. दर महिन्यास शहरातून जिल्ह्याचे ठिकाणी यावे लागल्याने धंद्यात पूर्ण लक्ष घालता येत नाही, सुरुवातीपासून धंद्यात तूट आली होती, आताही म्हणण्यासारखा फायदा होत नाही असे साहेबाना विनवून सांगितले. साहेब म्हणाले,

---

**"ऑफिसमध्ये पैसे देऊ नका.**
**माझ्या घरी जाण्याच्या**
**रस्त्यावर जाऊन उभे रहा.**
**मी येतोच" सिंग म्हणाले....**

---

तुम्ही सगळे व्यापारी एकच. मी तुमचे सगळे व्यवहार तपासून पाहिले आहेत. आतापर्यंत तुमच्या कंपनीला दोन-तीन लाखावर फायदा झालेला दिसतो. या पूर्वीच तुम्ही कर भरावयास पाहिजे होता. याबद्दल आता दंड भरावा लागेल. एकूण तुमच्यावर एक लाख वीस हजार कर आकारणी झाली आहे." हे ऐकून बिनीवाले सर्दच झाले. साहेबानी आपल्यावर मेहरबानी करावी म्हणून बिनीवाल्यानी त्याना आपली आर्थिक परिस्थिती पुन्हा समजाऊन सांगितली व साहेबानी सांगितलेला कर भरावयाचा झाल्यास आपला धंदाच बंद करावा लागेल असे सांगितले व साहेबानी आपल्या केसचा पुनः सहानुभूतीने विचार करावा अशी विनंती केली. तेव्हा सिंग म्हणाले, "तुम्ही तुमच्या पुरतेच पाहता. सरकारी अधिकाऱ्याची जबाबदारी ओळखत नाही. तुमच्या भागीदाराना बरोबर घेऊन या, विचार करता येईल" एवढे बोलून साहेबानी बिनीवाल्यांचा निरोप घेतला.

बिनीवाल्यानी आपल्या भागीदाराबरोबर याबद्दल विचारविनिमय केला. त्यांच्या ओळखीच्या आयकर वकीलांचा सल्ला घेतला. वकीलांच्या अभिप्रायाप्रमाणे सिंग-

साहेब दुसऱ्या कुणास जवळ उभेच करीत नव्हते. पक्षकाराबरोबर स्वतःच बोलणे करून आपला निकाल देण्याची त्यांची पद्धत होती. सिंगसाहेब आल्यापासून वकीलांचा धंदाच बसला होता. साहेबाना खुष केल्याशिवाय बिनीवाल्यांचे काम होणे अशक्य होते कारण त्यांचे आयकराचे प्रकरण सरळ नव्हते. वकिलानी बिनीवाल्याना साहेबाशी कसेही जमवून घेऊन सुटका करून घेण्याचा सल्ला दिला.

बिचारे बिनीवाले आपल्या भागीदाराना बरोबर घेऊन पुनः सिंग साहेबाना भेटले. साहेबानी, आपण कायदेशीर वागणारे आहोत. बिनीवाल्यानी कर बुडविला असल्याने त्याना यापूर्वी सांगितलेली, कराची रक्कम द्यावी लागेल असे निक्षून सांगितले. बिनीवाल्यांचे भागीदार म्हणाले, "साहेब, आम्ही गरीब आहोत. आमच्यावर अन्याय होत आहे. परंतु आपले कोणतेही म्हणणे आम्हाला मान्य आहे." साहेब थोडा विचार केल्यासारखे करून म्हणाले, "तुम्हाला एक लाख रुपये वाचवावयाचे असतील तर कमीतकमी पंचवीस हजार रुपये खर्च करण्याची तुमची तयारी पाहिजे. असे असेल तरच पुढचा विचार करता येईल" बिनीवाले म्हणाले, "साहेब, ही रक्कम फार होते. आमची एवढी ऐपत नाही" साहेब रागावन बोलले "तुम्ही व्यापारी लुच्चे आहात. लोण्याचा सगळाच गोळा गिळू पाहता. तुमच्यावर मेहरबानगी करण्यास गेलो तर मलाच शिकवू लागला. तुम्ही आता जाऊ शकता." असे सांगून साहेब घरात निघून गेले. मोतीवाले थोडावेळ वाट पाहून आपल्या भागीदाराबरोबर परत फिरले. त्याना पुढे काय करावे सुचेना.

बिनीवाले आपल्या शहरी परतले. दुसरे दिवशीं त्याना रस्त्यात अचानक त्यांचे एक जुने दोस्त भेटले. दोघेही पूर्वी एकाच शाळेत शिकत होते. एकमेकांच्या गप्पागोष्टी सुरू झाल्या. मित्राच्या बोलण्यावरून तो गुप्त पोलीस खात्यात नोकरी करीत असल्याचे बिनीवाल्याना कळले. हे एकून बिनीवाल्यांना देव पावल्यासारखे वाटले. मित्राला त्यांनीं घरी नेले. आपली व आयकर अधिकाऱ्याशी चालू असलेली बोलणी सविस्तर सांगितली. मित्र म्हणाला "लाचेची रक्कम फार मोठी आहे व लाच मागणारा अधिकारीही मध्यवर्ती सरकारचा बडा नोकर आहे. आमच्या साहेबाना विचारून एक-दोन दिवसात याबद्दल काय करता येईल ते कळवितो."

बिनीवाल्यांचे पोलीस मित्र दुसरे दिवशी त्यांच्या साहेबाना भेटले. आयकर अधिकाऱ्याना पकडण्यास कोणतीच हरकत नव्हती. लाचेची रक्कम मोठी असल्याने ती कोणी द्यावी हा मोठा प्रश्न होता. बिनीवाल्यांची व त्यांच्या पोलीस मित्राच्या साहेबांची भेट झाली. साहेबानी बिनीवाल्याना लाचेच्या पैशाची व्यवस्था त्यांचेकडून होईल का म्हणून विचारले. मोतीवाल्यानी आपल्या धंद्यातील अडचणीचे रडगाणे गायले. त्याच्याकडून पैशाची तजवीज होणे अशक्य दिसून आल्याने सरकारी रक्कम मिळविण्याची पोलीसानी व्यवस्था केली. आयकर अधिकाऱ्याविरुद्ध सहसा तक्रारी येत नाहीत. लाच देण्याची झाल्यास असला गैरव्यवहार बहुधा आयकर

वकीलांच्या मार्फत बिनबोभाट केला जातो. जेव्हा एखादा अधिकारी व ीलास डावलून अशीलाकडे सरळ मागणी करतो व जेव्हा अशीलास याबाबतींत मर्यादे बाहेर त्रास होतो तेव्हाच एखादा अशील तक्रार करण्यास उद्युक्त होतो. अशा वेळेस काही वकीलही तक्रार करण्यास प्रोत्साहन देतात. मोतीवाल्यांच्या गंभीर तक्रारीची शहानिशा काही झाले तरी करावी असे पोलीसांनी ठरविले.

सिंग यानी पंचवीस हजार रुपये मागितले होते. इतकी मोठी रक्कम पोलीसाना सरकारकडून ताबडतोब मिळणे शक्य नव्हते. तेव्हा याबाबतीत बिनीवाले यानी आयकर अधिकाऱ्याना पुन्हा एकदा भेटून लाचेच्या रकमेत काही कमी होण्या-सारखे असल्यास पहावे असे ठरले. पोलीस दहा हजार रुपये देण्यास तयार होते. बिनीवाल्याना पैसे देण्याची निश्चित तारीख, जागा व वेळही ठरवून घेण्यास सूचना देण्यात आली.

बिनीवाले लगेच एका शनिवारी सिंग याना भेटले. साहेबानी पंधरा हजार रुपये तरी मिळाले पाहिजेत असे सांगितले. बिनीवाल्यानी प्रयत्न करून पाहतो व सोमवारी सकाळी घरी येऊन भेटतो असे सांगून ते परत आले.

पोलीस अधिकारी व बिनीवाले रविवारी रात्री मुक्कामावर पोहोचले. गावाहून चार-पाच मैल लांब असलेल्या डाक बंगल्यात सर्व मंडळीनी मुक्काम केला. दुसरे दिवशी सकाळी ८ वाजता बिनीवाले सिंग साहेबाना त्यांच्या बंगल्यावर भेटले. साहेबानीं पैसे आणले का म्हणून विचारले. आपले भागीदार ११ च्या गाडीने दहा हजार रुपये घेऊन येत असल्याचे त्यानी साहेबाना सांगितले. सिंगसाहेबानी बिनीवाल्याना पैसे घेऊन ऑफीसमध्ये येण्यास सांगितले.

बिनीवाले सिंगसाहेबाना भेटून डाक बंगल्यावर पोलीसाना भेटले. सकाळचे १० वाजले होते. पोलीस अधिकाऱ्यांनी दोघा पचाना बोलाविले. ह्या दोन्ही व्यक्ती स्थानिक असून, प्रतिष्ठीत व प्रामाणिक होत्या. गावात जाण्यासाठी पोलीसानी एक खाजगी मोटार व टॅक्सी आणण्याची व्यवस्था केली.

सिंग यांचे ऑफिस गावात हमरस्त्यावर एका खासगी इमारतीत होते त्यांची बसण्याची खोली पहिल्या मजल्यावर होती. ऑफिसच्या इमारतीभवती कंपौंडची भिंत होती. आजूबाजूस लपून बसण्यास चांगली जागा नव्हती. पोलीसांना उघडपणे जाणेही धोकादायक होते. सिंग यांच्या ऑफीससमोर एक लॉजिंग आणि बोर्डिंगचे हॉटेल होते. या हॉटेलमधे पोलीसांनीं आश्रय घेण्याचे ठरविले. पोलीसानी पचा-समक्ष बिनीवाल्यांकडे दहा हजारांच्या नोटाचे नंबर टिपून घेऊन नोटांना अन्थ्रासिन पावडर लावून त्या दिल्या. पंचाना अंथ्रासिन पावडरच्या उपयुक्ततेबद्दल प्रात्यक्षिक करून दाखविले गेले. हे सर्व होईपर्यंत १२ वाजत आले. ताबडतोब पोलीस पच व बिनीवाले मोटारीने सिंग यांच्या ऑफीसकडे रवाना झाले. बिनीवाल्यांना मोटारीतून उतरल्याबरोबर सरळ सिंग यांच्या ऑफीसकडे जाण्याबद्दल सूचना

दिली होती. त्यांचेबरोबर एक पोलीस अधिकारी जाणार होते. सदर अधिकारी ऑफिस कपौंडच्या आजूबाजूस लपून बसावयाचे होते. बिनीवाल्यानी सिंग यांना लाचेचे पैसे ऑफिसात दिल्यावर त्यांनी बाहेर ग्यालरीत येऊन खूण करण्याचे ठरले होते. व ही माहिती कंपौंडच्या आजूबाजूस असलेल्या पोलीस अधिकाऱ्यांनी ओळखून लगेच हॉटेलमध्ये बसलेल्या पोलीसांना कळवावयाचे होते. बिनीवाले मोटारीतून उतरल्याबरोबर सिंग यांच्या आफिसकडे गेले ऑफिसच्या कपौंडमधे ते शिरत असतानाच त्यांचे समोरूनच सिंग आपल्या मोटारीतून बाहेर पडले. बिनीवाल्यांनी सिंग यांच्या शिपायाकडे चौकशी केली असता साहेब दुपारच्या जेवणासाठी घरी गेल्याचे त्याना कळले. बिनीवाले पोलीस अधिकारी उतरलेल्या हॉटेलमध्ये आले व पट्टेवाल्यांकडून कळलेली हकीकत त्यानी सांगितली. पोलीसांनी हॉटेलमधील माडीवरची एक खोली घेतली होती. तिथे जेवण मागवून सर्वांनी जेवण उरकून घेतले हॉटेलमध्ये प्रवाशाची ये-जा सारखी चालू होती त्यामुळे गुप्त पोलीसांना ओळखले जाण्याची शक्यता कमी होती, तरी पोलीस अधिकाऱ्यांना आपणास कोणी ओळखेल की काय याची धागधूग होतीच.

अंदाजे एक तासाने सिंग जेवून ऑफिसला परत आले. बिनीवाल्यांच्या जवळ नोटा असल्याची खात्री करून घेऊन त्यांना पोलीसानी सिंग यांच्या ऑफिसकडे पाठविले. एक पोलीस अधिकारी आफिस कंपौंडजवळ लपून बसले व इतर मंडळी हॉटेलमध्येच बसून राहिली. दहा बारा मिनिटांनी बिनीवाले ऑफिस कपौंडमधून बाहेर पडले. त्यांनी खूण न केल्याने काम झाले नसावे अशी शंका पोलीसांना आली. बिनीवाले सरळ हॉटेलमध्ये येऊन पोलीस अधिकाऱ्यांना भेटले. ते म्हणाले, 'साहेबांची भेट झाली. साहेबांनी पैसे आणले आहेत का म्हणून विचारले. मी हो म्हणताच, त्यांनी मला "आफिसमध्ये पैसे देऊ नका. माझ्या घरी जाण्याच्या रस्त्यावर जाऊन उभे रहा. तिकडे मी आताच मोटारीने येतो" असे सांगितल्याचे कळविले. ही हकीकत ऐकून पोलीस अधिकाऱ्यांनी पुन्हा बिनीवाल्यांचेकडे १० हजार रुपयाच्या नोटा असल्याबद्दल खात्री करून घेतली व लगेच सिंग साहेबाच्या बंगल्याकडे जाणाऱ्या रस्त्यावर जाऊन उभे राहण्यास पाठविले. तत्पूर्वी एका पोलीस अधिकाऱ्यास व एका पंचास टॅक्सीमधून पुढे जाऊन रस्त्यावर जवळच असलेल्या R. T. O. आफिसच्या बाहेर उभे राहण्यास सूचना दिली होती. तपासणी अधिकारी, दुसरे पंच व पोलीस खाजगी मोटारीतून सिंग यांच्या गाडीमागून जाण्यास तयार झाले.

बिनीवाले हॉटेलमधून बाहेर पडले. साहेबांच्या बंगल्याच्या रस्त्याच्या वळणावर गेले असतील नसतील तेवढ्यात सिंग आपल्या मोटारीतून ऑफिसच्या गेटमधून बाहेर पडले. पोलीस अधिकारी आपल्या गाडीत जाऊन बसले. सिंग यांनी रस्त्याच्या वळणापुढे तीनशे यार्डवर जाऊन आपली मोटार रस्त्याच्या डाव्या




बदमाष, माझ्याशी दगलबाजी करतोस काय ?

बाजूस थांबविली. बिनीवाले पायी चालत मागाहून सिंग यांच्या मोटारीजवळ जाऊन पुढील उजव्या दरवाजाजवळ उभे राहिले. सिंग यांचेबरोबर एक-दोन मिनिटे बोलल्यावर ते मोटारीच्या डाव्या बाजूस आले. डावे दार उघडले गेले आणि बिनीवाले सिंग यांच्या शेजारी जाऊन बसले. पुढे गेलेली टॅक्सी यावेळी सिंग यांचे मोटारीपासून पाव फर्लांगावर रस्त्याच्या बाजूस उभी होती. ड्रायव्हर बॉनेट उघडून गाडीच्या इंजिनकडे पहात उभा होता. ही सर्व हकीकत सिंग यांच्या मोटारीच्या मागे थोड्या अंतरावरून मागून येणारे पोलीस अधिकारी आपल्या गाडीतून पहात होते.

सिंग यांनी समोर उभी असलेली टॅक्सी पाहून ही टॅक्सी कोणाची म्हणून बिनीवाले यांना विचारले. बिनीवाले म्हणाले R. T. O. पासींगसाठी आलेली एखादी टॅक्सी असेल. तेव्हा सिंग म्हणाले, 'चला आपण पुढे जाऊ या." बिनीवाले सिंग यांच्या मोटारीत जाऊन बसल्यावर त्यांचेकडून काही खूण केली गेली नाही. पुढे जाऊन उभ्या असलेल्या मोटारीतूनही काही सूचना मिळाली नाही व तितक्यात सिंग यांची मोटार हलली. पोलीस अधिकारी बुचकळ्यात पडले. काही झाले तरी सिंग यांच्या मोटारीचा पाठलाग करणे त्यांना प्राप्त होते. सिंग यांची मोटार पुढे धावू लागली. मागून त्यांना न दिसेल एवढ्या अंतरावरून पोलीस

अधिकारी आपल्या खासगी मोटारींतून व टॅक्सीतून पाठलाग करीत होते. सिग यांनी आपली मोटार त्यांच्या बंगल्याकडे न वळविता अजमासे मैल दीड मैल पुढे नेली. लगेच गाडी मागे फिरवून ते आपल्या बंगल्याच्या दिशेने येऊ लागले. अर्ध्या रस्त्यावर पोलीसांच्या दोन्ही गाड्या जाताना पाहून सिग बिनीवाल्यांना म्हणाले, ह्या दोन्ही गाड्या कुठे चालल्या आहेत. बिनीवाले म्हणाले, "साहेब मी काय सांगू? ह्या गाड्या माझ्या माहितीच्या नाहीत." सिग यांनी आपली मोटार जोरात हाकण्यास सुरवात केली. पोलीसांनी आपल्या गाड्या वळविल्या व पुन्हा सिग यांच्या गाडीमागून पाठलाग सुरू झाला. यावेळी टॅक्सी पुढे होती व खाजगी मोटार टॅक्सीचे मागून येत होती. सिग यांचा बंगला रस्त्याच्या डाव्या बाजूस आत होता त्यांच्या बंगल्याच्या जवळ येण्यापूर्वी एक मोठे वळण लागत होते. त्यामुळे पोलीसांना पुढे जाणारी सिग यांची गाडी दिसेनाशी झाली. त्यामुळे पोलीसांनी आपल्या गाड्यांचा वेग वाढविला. त्यांच्या गाड्यांनी वळण ओलांडले तो सिग यांची गाडी हळू जाताना समोर दिसली. तेथून जवळच डावे बाजूस सिग यांच्या बंगल्यात शिरण्याचा रस्ता होता.

सिग यांनी आपली गाडी बंगल्याजवळ येत असताना बिनीवाल्यांना पैसे देण्यास सांगितले. बिनीवाल्यानी आपल्या जवळच्या दहा हजारांच्या नोटा सिग याच्या डाव्या हातात दिल्या. सिग आता बिनीवाल्यांना आपल्या बंगल्यात जाण्याच्या रस्त्यावर सोडून आपले घरी जाण्याच्या विचारात होते. तितक्यात त्यांनी आपल्या मोटारीच्या पुढील लहान आरशात मागच्या वळणाकडून पूर्वी पाहिलेल्या दोन्ही गाड्या जोरात येताना पाहिल्या. या मोटारी पहातांच सिग यांचा नूर एकदम पालटला. ते बिनीवाल्यांना म्हणाले, ' बदमाश, माझ्याशी दगलबाजी करतोस काय " असे म्हणून त्यांनी आपल्या डाव्या हातात असलेल्या नोटा मोटार थाबवून उजव्या हातात घेतल्या व मोटारीच्या उजव्या बाजूस फेकल्या. तसेच बिनीवाल्याना शिव्या देण्यास व हाताने मारण्यास सुरुवात केली. बिनीवाले बिचारे मार खाऊ लागले. तितक्यात मोटारी समोरून येणारे एक गृहस्थ बिनीवाल्याच्या सहाय्यास आले या गृहस्थानी सिग यांना उजव्या हाताने नोटा बाहेर फेकत असताना व बिनीवाल्याना मारत असताना पाहिले. ते धावत मोटारीजवळ आले. बिनीवाल्यांना मोटारीच्या बाहेर येण्यास त्यानी मदत केली. सिग याची व नवीन आलेल्या इसमाची थोडीशी झटापट झाली. हा इसम पहिलवानी पेशाचा दिसत होता. त्याने सिग यांचे काही चालू दिले नाही टॅक्सीत बसलेल्या पचाने सिग यांना नोटा बाहेर टाकताना पाहिले होते. तपासणी अधिकारी व दुसरे पंच मागच्या मोटारीतून सिग यांच्या गाडीजवळ येऊन उतरले. त्यांनी नोटा रस्त्यावर पडलेल्या पाहिल्या. सिग यांना पोलीस अधिकाऱ्यानी आपली ओळख दिली. सिग अजून रागातच होते. ते आपल्याशी झटापट झालेल्या इसमाकडे बोट दाखवून म्हणाले,

" रस्त्यावरून येणाऱ्या या इसमाने मला मारले आहे. याचा प्रथम बंदोबस्त करा. त्याच्याविरुद्ध माझी फिर्याद घ्या."

पोलीस अधिकाऱ्यांनी सिंग यांना शांत होण्यास सांगितले. ते तक्रार करीत असलेला इसम आपला सहाय्यक असल्याचेही त्यांनी सिंग यांना कळविले. या पोलीस अधिकाऱ्यास सिंग यांच्या ऑफिस कंपौंडजवळ उभे राहण्यास सांगितले होते. गडबडीत त्याला पुढच्या सूचना देता आल्या नाहीत. त्यामुळे तो पोलीसांच्या मोटारीच्या मागोमाग चालत रस्त्यावरून येत होता व नेमका सिंग बिनीवाल्यांना मारीत असताना तेथे येऊन पोहोचला.

पोलीस अधिकाऱ्यांनी सिंग यांना जवळ असलेल्या एका बंगल्यात नेले. तेथे एका खोलीत दरवाजे बंद करून अंधारात सिंग यांचे दोन्ही हात अल्ट्राव्हॉयलेट किरणाच्या प्रकाशात पचासमक्ष तपासले. तळ हातावर व दोन्ही हाताच्या बोटावर अंथ्रासिन पावडर चकाकताना दिसून आली. सिंग यांनी घातलेल्या कोटाच्या पुढच्या भागावरही पावडरीचे काही कण चमकताना दिसले, याबद्दल पंचानी रीतसर नोंद घेतली व पंच व पोलीस रस्त्यावर पडलेल्या नोटांकडे आले. सदर नोटा पंचासमक्ष बिनीवाले याचेकडे दिलेल्या नोटाच होत्या याबद्दल खात्री करून घेऊन सर्व परिस्थितीबद्दल पचनामा तयार करण्यात आला. प्रत्येक पंचाने स्वतंत्रपणे पाहिलेली हकीकत पंचनाम्यात नमूद केली गेली.

सिंग याच्या मनात पोलीस सहाय्यकाबद्दलचा राग अजून शांत झाला नव्हता. त्यांना ह्या इसमाविरुद्ध फिर्याद नोंदवावयाची होती. त्यानी पोलीसांना सरकारी वकीलांना बोलावून घेण्यास विनंती केली. सरकारी वकिल घरी नव्हते तेव्हा त्यांनी आपल्या माहितीच्या आयकर वकीलाचा सल्ला घेण्याचे ठरविले व त्या वकीलांना निरोप पाठविला. पोलीस अधिकारी सिंग यांना घेऊन त्यांच्या ऑफिसमध्ये गेले व बिनीवाले याच्या आयकर प्रकरणाचे सर्व कागदपत्र हजर करण्यास त्यांना सांगितले. सिंग यांनी आपल्या वरिष्ठांच्या परवानगीशिवाय कागद-पत्र हजर करण्यास नकार दिला. सिंग याच्या वरिष्ठांना पोलीसांनी फोन करून विचारले. त्यानी आपण दुसरे दिवशी येऊन कागदपत्र पोलीसांना देण्याची तजवीज करतो, असे सांगितले व तोपर्यंत संबधित कागदपत्र सील करून ठेवण्यास त्यांनी सूचना दिली. कागदपत्र एका पेटीत पोलीस व सिंग याचे सील लावून ठेवण्यात आले व पेटी ठेवलेल्या खोलीसही सील लावण्यात आले. पोलीसांनी सिंग यांना बिनीवाल्याच्याकडून घेतलेल्या लाचेबद्दल खुलासा करण्यास सांगितले. सिंग यांनी उलट पोलीस अधिकाऱ्यांना अशा परिस्थितीत काय करावे म्हणून सल्ला विचारला. पोलीस अधिकाऱ्यांनी दोन मार्ग सुचविले. सत्य हकीकत सांगणे हा पहिला मार्ग होता व दुसरा मार्ग म्हणजे सध्या मन:स्थिती बरोबर नसल्याने काहीही जबाब देता येत नाही असे सांगणे, हे दोन्ही मार्ग सिंग यांना पसंत नव्हते. त्यांना पोलीस सहाय्यकाविरुद्ध

प्रयम फिर्याद दाखल करण्याची घाई होती त्यांनी निरोप पाठविलेले वकील तितक्यात येऊन पोहोचले वकीलांच्या सल्ल्याने सिंग यानी पोलीस सहाय्यकाविरुद्ध फिर्याद लिहून दिली. सदर फिर्यादीमध्ये बिनीवाले त्या दवशी दुपारी ऑफिसमध्ये आले होते हे सिंग यांनी कबूल केले होते. सिंग यांच्या म्हणण्याप्रमाणे बिनीवाले त्यांचे ऑफिसात आले व आपल्या प्रकरणाचा निकाल आपल्या बाजूने द्या असे सांगून पैसे देऊ लागले तेव्हा सिंग यांना राग येऊन त्यानी बिनीवाल्याना ऑफिसच्या बाहेर हाकलून दिले. ह्याच सुमारास सिंग यांच्या पोटात दुखू लागले ते नुकतेच घरून जेवून आले होते. त्यांना आता परत घरी जाणे जरूर होते आपल्या मोटारीने घरी जात असताना रस्त्यावर बिनीवाल्यांनी त्यांना हात करून थांबविले. सिंग यांनी मोटार थांबवून चौकशी केली तेव्हा बिनिवाले यांनी आपल्या छातीत कळ येत आहे. आपणास सिव्हिल सर्जनकडे घेऊन जा अशी विनती केली त्याचे म्हणणे खरे मानून सिंग यांनी बिनीवाल्यांना आपल्या मोटारीत घेतले व त्याना सिव्हिल सर्जनच्या बंगल्याकडे नेत असताना बिनीवाल्यानी पुन्हा पैशाची गोष्ट काढली तेव्हा सिंग यांनी मोटार फिरविली व ते आपले घराकडे निघाले. त्यावेळेस बिनीवाले यांनी सिंग यांच्या खिशात नोटा कोंबण्याचा प्रयत्न केला. ह्या गडबडीत बिनीवाल्यांच्या हातातून नोटा मोटारीच्या बाहेर पडल्या असाव्यात तितक्यात समोरून येणाऱ्या इसमाने सिंग यांना मोटारीतून बाहेर खेचले व त्यांना मारले.

आपल्या फिर्यादीच्या प्रती सिंग यानी आपल्या वरिष्ठांकडे व जिल्हाधिकाऱ्यांकडे पाठविल्या. पोलीस अधिकाऱ्यांनी सिंग यांना त्यांच्या फिर्यादीबद्दल संबधित मॅजिस्ट्रेटकडे जाण्यास सूचना दिली.

दुसरे दिवशी सिंग याचे वरिष्ठ आले. त्याचे समक्ष बिनिवाल्यांच्या आयकरासंबंधीचे कागदपत्र पोलीसांनी ताब्यात घेतले. कागदपत्रावरून सिंग यांनी आयकर किती आकाराचा लागणार याबद्दल काही निश्चित असे मत बनविलेले दिसत नव्हते. बिनीवाल्याना ७–८ वेळा जे बोलाविले होते ते निष्कारण हेलपाटे घालण्याच्या हेतूनेच असावे असा निष्कर्ष निघू शकत होता. सिंग यांच्या म्हणण्याप्रमाणे बिनीवाल्याच्या हिशेबात फार घोटाळे असल्याने त्यासंबधी माहिती विचारण्यासाठी वरचेवर मुदत देऊन बोलाविणे जरूर पडले होते.

पोलीसांनी तपास पूर्ण करून सिंग यांचे विरुद्ध जिल्ह्यातील स्पेशल न्यायाधिशाकडे खटला पाठवून दिला. सिंग यानी त्याच्यातर्फे एका नामांकित वकीलास दिले होते. सरकारी वकीलांनी पोलीसातर्फे काम चालविले. न्यायाधिशानी सिंग यांना दोषी ठरवून दोन वर्षांची शिक्षा ठोठावली. सिंग यानी हायकोर्टाकडे अपील केले. हे अपील चालविण्यास सिंग यानी एका नामांकित बॅरिस्टरना काम दिले होते पोलीसांनी आणलेला सर्व पुरावाच खोटा आहे असे बॅरिस्टरांनी आपले म्हणणे मांडले. याबाबतीत पैसे जप्त केले त्यावेळी तयार केलेल्या पचनाम्याबाबत आरोपीतर्फे

अनेक आक्षेप घेण्यात आले. सिंग यांनी जेव्हा उजव्या हाताने नोटा बाहेर फेकल्या त्यावेळेस मागून येणाऱ्या टॅक्सीत बसलेल्या पंचाने ही गोष्ट पाहिली होती, परंतु टॅक्सीमागून आलेल्या गाडीतील पंचाने ही गोष्ट पाहणे शक्य नव्हते. तपासणी अधिकारी सिंग यांना समजावून सांगत असताना पोलीस सहाय्यकानी घडलेल्या परिस्थितीबद्दल पंचनामा लिहून काढला होता त्यांनी पंचनाम्यामध्ये दोन्ही पंचानी सिंग यांनी नोटा टाकताना पाहिले असे नमूद केले होते. पंचनाम्यावर पंचांची सही घेण्याच्या पूर्वी त्यांना पंचनामा वाचून दाखविण्यात आला. त्यावेळी पोलीस तपासणी अधिकाऱ्यांनी मागच्या मोटारीतून आलेल्या पंचास त्यांनी सिंग यांना नोटा बाहेर टाकताना पाहिले का म्हणून विचारले. त्यांनी नाही म्हणून सांगितले. तेव्हा एका पोलीस सहाय्यकाने सुचविले की पंचनामा पूर्ण लिहला गेला असल्याने दुसऱ्या पंचाने आपण आरोपीला नोटा टाकताना पाहिले असेच सांगावे. नाहीतर पुरावा कमजोर होईल. तपासणी अधिकाऱ्यांना ही गोष्ट पटली नाही. त्यांनी पंचनाम्याच्या शेवटी पंच नं. १ व पंच नं. २ यांनी स्वतंत्ररीत्या पाहिलेली हकीकत नमूद करण्यास लावली व पंचाच्या सह्या घेतल्या. पोलीस सहाय्यकांना वाटले की साहेबांनी घोटाळा करून ठेवला व त्यामुळे आरोपीला कोर्टात फायदा मिळेल. परंतु हायकोर्टा-मधील सुनावणीत हीच गोष्ट खटला साबीत होण्यास उपयोगी पडली. पंचनाम्यात अखेरीस नमूद झालेल्या सत्यकथनामुळे न्यायाधिशांनी आरोपीतर्फे पंचनामा खोटा असल्याचा मुद्दा अग्राह्य मानला व पोलीसांनी सादर केलेला सगळा पुरावा खरा असल्याचा निर्वाळा दिला.

पोलीस सहाय्यकाची व सिंग यांची झटापट झाल्याबद्दलची सत्य परिस्थिती पोलीसांनी कोर्टापुढे मांडली होती. पुष्कळ वेळा पोलीस अधिकारी आपली बाजू पूर्णरीत्या निर्दोष असल्याचे दाखविण्याचा खटाटोप करीत असताना आपल्याविरुद्ध जाणाऱ्या तपासात निष्पन्न झालेल्या गोष्टी लपवून ठेवण्याचा प्रयत्न करतात किंवा साक्षीचे वेळी या गोष्टीचे अस्तित्व नाकारतात. आरोपीस अनुकूल असलेला पुरावा नजरेस आला असल्यास तो बाजूस सारून उलट तो नाशाबीत करण्याचा प्रयत्न करतात, यामुळे खऱ्या असलेल्या खटल्यातही गुन्हा शाबीत न होता खरा गुन्हेगार संशयाचा फायदा मिळून सुटतो.

सिंग यांच्या केसमध्ये हायकोर्टामध्ये त्यांना झालेली शिक्षा कायम झाली. शिक्षेची मुदत मात्र दोन वर्षाचेऐवजी एक वर्ष करण्यात आली. सिंग यांनी झालेल्या शिक्षेविरुद्ध सुप्रीम कोर्टात अपील दाखल केले. चार वर्षानंतर हे अपील सुप्रीम कोर्टात विचारात घेण्यात आले. सुप्रीम कोर्टाने सिंग यांना संशयाचा फायदा देऊन दोषमुक्त केले.

न्यायदान लहरी असे न म्हणता सिंग यांची पूर्वपुण्याईच प्रभावी ठरली असे म्हणणे सयुक्तिक ठरेल.

□ □ □

पुस्तके

सौ. पुष्पा भावे

# निवडक एकांकिका : १९६६

एखाद्या वाङ्मयप्रकाराविषयीच्या प्रेमाने प्रेरित होऊन संशोधन वृत्तीने मेहनतपूर्वक कार्य करणाऱ्या रसिकांची हौस त्या भाषेतील सर्वसामान्य वाचकाला आणि साक्षेपी अभ्यासकालाही मोलाची ठरते. प्राध्यापक श्री. र. भिडे हे गेली काही वर्षे निवडक मराठी एकांकिकांचे वार्षिक संग्रह काढत आहेत. प्रत्येक संग्रहाबरोबर त्या वर्षी नियतकालिकातून व ग्रंथरूपाने प्रसिद्ध होणाऱ्या एकांकिकांची वर्णनात्मक सूची जोडलेली असल्यामुळे या ग्रंथांचा संदर्भासाठीही उपयोग होऊ शकतो.

'निवडक एकांकिका : १९६६' या संग्रहात, १९६६ सालात प्रसिद्ध झालेल्या एकांकिकांपैकी दहा निवडक एकांकिका पुनर्मुद्रित केल्या आहेत. या दहा एकांकिकांच्या आधारे १९६६ या एका सालातील मराठी एकांकिकांचे स्वरूप न्याहाळण्याचा प्रयत्न केल्यास ते अप्रस्तुत ठरू नये.

'रायगडची भूपाळी' (ले. : प्र. ना. शेणई) ही या संग्रहातील एकमेव ऐतिहासिक एकांकिका, 'रायगडाला जेव्हा जाग येते' या नाटकातील एक नाट्यपूर्ण प्रसंग गृहीत धरून लिहिलेली आहे. परंतु संवादलेखनाच्या पलीकडचा एकांकिकेचा स्वयंपूर्ण आकार सिद्ध करणे लेखकाला साधलेले नाही. तरी विषयवैचित्र्य म्हणून बहुधा संपादकाने या एकांकिकेची निवड केलेली असावी. या संग्रहातील 'ओऽम् नेति' (ले. : ल. ग. देव), 'चक्र' (ले. : शशिकांत कुळकर्णी), 'हाक फोडी चांगुणा' (ले. : रत्नाकर मतकरी), 'डाक' (ले. : शं. ना. नवरे) या एकांकिका रहस्यकथेच्या वळणाच्या आहेत. किंबहुना या एकांकिकांतील नाट्य वाचक-

प्रेक्षकांच्या होणाऱ्या अपेक्षाभंगात साठवलेले आहे. रहस्य हा आजच्या बहुसंख्य एकांकिकांचा केंद्रबिंदु असल्यामुळे त्याचे या संग्रहात आधिक्याने प्रतिनिधित्व होणे साहजिकच आहे. परंतु एकांकिकेच्या प्रत्यक्ष रंगमचावर अवतरणाऱ्या दृश्य स्वरूपाचा विचार करता हे रहस्यतत्त्व उपरिनिर्दिष्ट एकांकिकांच्या संदर्भात नाट्य-पूर्ण ठरलेले नाही असे म्हणावे लागेल. सुप्रसिद्ध नाटक–एकांकिकाकार श्री. विजय तेंडुलकर यांची 'ब्रह्मांडाची पोकळी आणि अवकाशाच्या आकाशातील पोल' ही विक्षिप्त नावाची एकांकिका पूर्वार्धात विशेष अपेक्षा निर्माण करते; मुंबईच्या सास्कृतिक जीवनावर आधारलेल्या या उपहासप्रधान एकाकिकेचा अन्त काहीसा अनपेक्षित असा आहे : चित्राच्या अर्थाविषयी वाद घालणारा दाढीवाला हा संतप्त कलावंत नसून खिसेकापू आहे असे दाखवून तेंडुलकरांनी या एकाकिकेतील संघर्ष उथळ पातळीवर सोडवलेला आहे. परंतु नाट्यवस्तूविषयीचा हा आक्षेप वजा करता या एकांकिकेचा आकार लक्षणीय दृश्यनाट्यरूप धारण करतो हे मराठी एकांकिकांच्या सदर्भात उल्लेखनीय आहे. प्रयोगक्षमतेच्या दृष्टिकोनातून लिहिलेली या संग्रहातील आणखी एक एकांकिका आहे ती श्री. भालबा केळकर याची 'ड्रॅमॅटिक असायलम्.' कवीने एखाद्या चमकदार कल्पनेच्या धृपदासाठी सपूर्ण कविता राबवावी तसेच येथे, विविध नाटकातील पात्रे ड्रॅमॅटिक असायलमच्या स्वरूपात रंगभूमीवर आणण्याची कल्पना, अपरिपक्व स्वरूपात, एकाकिकारूपाने साकार झाली आहे. 'बिचारा डायरेक्टर' लिहिणाऱ्या श्री. भालबा केळकरांनी पुन्हा एकदा हौशी नटसचातील अभिनयाच्या ठोकताळ्यांना सुखवण्याच्या अवाङ्मयीन कल्पनेतून ही एकाकिका रचली असावी. प्रस्तुत संग्रहात या एकाकिकेला संपादक-महाशयांनी स्थान का दिले समजत नाही. सौ. वसुधा पाटील यांची 'सरहद्द' ही एकांकिका भावना विरुद्ध कर्तव्य या सनातन संघर्षावर आधारलेली असली तरी या लेखिकेला एकाकिका म्हणजे संवादरूप लघुकथा नव्हे याचे नेमके भान आहे. पूर्वकथनावर भर देण्याची गरजही लेखिकेला पडलेली नाही. सुभेदार–जमादार–लक्ष्मी या तीन पात्रांच्या आधारे, रात्रीच्या व युद्धाच्या पार्श्वभूमीवर, ही एकाकिका उभी आहे. या नाट्यवस्तूचा स्वभावच युद्धपरिस्थितीमुळे ताणलेल्या मानवी भावनाचा आहे. 'निरोप' या श्री. वसंत सबनीसांच्या एकाकिकेत, सामान्य तरुणाच्या जीवनातील निराशेला प्रसंगी आत्महत्येसारखे तीव्र आविष्कार आपलेसे वाटत असले तरी मूलत: ती निराशा सखोल नसते–फासाचा दोर तयार ठेवणाऱ्या तरुणाला नोकरीच्या आमत्रणाचे पत्र येताच जग जिंकल्याचा आनंद होतो; त्यात तो प्रेमभगाचे दु:ख लीलया पचवू शकतो–अशा नाट्यवस्तूची आपल्या नेहमीच्या खुसखुशीत संवादशैलीत मांडणी केली आहे. नायकाच्या खोलीतील लोबता फास पाहूनही अविचलित राहाणाऱ्या शेजाऱ्याच्या व्यवहारी प्रतिक्रियातून ही एकाकिका उभी राहते. मात्र मराठीमधील ठरीव सामाजिक आशयाच्या व त्याने निश्चित

केलेल्या एकांकिकेच्या आकाराबाहेर हीही एकांकिका जाऊ शकत नाही (सहज आठवण झाली Dannie Abse यांच्या अशीच सुरुवात असणाऱ्या ' Gone' या एकांकिकेची. फास टांगून आपल्या निराशेचे प्रदर्शन करणारा एक निराश नवरा आणि ' मला कोणाच्या खासगी गोष्टीत लक्ष घालायला आवडत नाही ' असे म्हणत म्हणत, फासाकडे दुर्लक्ष करून, नायकाच्या पत्नाची हकीगत खोदूनखोदून विचारणारा त्याचा एक सहकारी यांच्या संवादातून लैंगिक पछाडलेपणाचे एक वेगळेच दर्शन घडते....सबनीसांची एकांकिका मात्र चलाख मांडणीच्या पलीकडे जात नाही. असो.)

प्रा. भिडे यांनी हा संग्रह ' चक्र ' या प्रा. विद्याधर पुंडलिक यांच्या एकांकिकेला अर्पण केला आहे. पण या संग्रहात मात्र त्यांची ' चक्र ' ही एकांकिका अंतर्भूत नसून ' रंग ' ही एकांकिका समाविष्ट आहे. या एकांकिकेत, नेहमीच्या दुय्यम भूमिकातून आपली कधीतरी सुटका होईल अशी स्वप्ने पाहणाऱ्या एका नटाच्या मनाची लळिते प्रा. पुंडलिकांनी फार समर्थपणे उभी केली आहेत. प्रत्यक्ष रंगमंचावर काही घडत नसूनही या एकांकिकेला श्रुतिकेचे स्वरूप येत नाही. स्वप्नात दंग राहणारा नट, त्याचे मन दुखावले जाऊ नये म्हणून जपणारी पत्नी आणि एक नटमित्र यांच्या भावनात्मक प्रतिक्रियांचे हे नाटय आहे. मोजक्याच परंतु लक्षणीय लघुकथा लिहून मराठी वाङ्मयात स्वतःचे स्वतंत्र स्थान निर्माण करणारे प्रा. पुंडलिक उद्याच्या मराठी एकांकिकेचे आशास्थान आहेत असे मला वाटते.

१९६६ सालातील निवडक एकांकिकांचे स्वरूप हे असे आहे. या सालातील एकांकिकांच्या स्वरूपात, त्यामागील काही सालांच्या एकांकिकांच्या स्वरूपाहून



फारसा लक्षणीय बदल झालेला नाही. रचनेमध्ये सफाई आली आहे परंतु एकांकि-केच्या दृश्यश्राव्य रूपाचा स्वतंत्र घाट लेखकाना क्वचितच गवसलेला आढळतो. १९५८–६० सालांमध्ये विशेषत: श्री. विजय तेंडुलकर याच्या एकाकिका–लेखना-मधून नवनाटयाच्या खुणा नाटकापेक्षाही एकाकिकामधून अधिक जाणवत होत्या.

□

# एकांकिका वाटचाल

'एकांकिका वाटचाल' या प्रा. श्री. र. भिडे, प्रा. व. दि. कुळकर्णी आणि प्रा. भालबा केळकर या संपादकत्रयीने सपादित केलेल्या पुस्तकाचे स्वरूप वर उल्लेखिलेल्या एकांकिका-संग्रहापेक्षा काहीसे वेगळे आहे. ग्रंथनामातून सूचित केल्या-प्रमाणे, मराठी एकाकिकेच्या विकासक्रमाचे दर्शन घडावे अशा हेतूने या सग्रहात तंजावरी एकाकिकेपासून महेश एलकुंचवारी एकाकिकेपर्यंतच्या एकाकिकाची निवड करून दीर्घकालिक परिमाण देण्याचा यत्न केला आहे. याशिवाय 'एकाकिका : उद्गम आणि विकास' 'एकाकिका : स्वरूप आणि सामर्थ्य' 'एकाकिका : काही अपेक्षा' असे तीन विवेचनात्मक प्रास्ताविक लेख लिहून संपादकानी एकाकिकेचा वाङ्मयीन, ऐतिहासिक विचार सामग्र्याने करण्याची योजकता दाखवली आहे.

प्रथम या तीन प्रास्ताविक लेखांची चिकित्सा करून मग एकाकिकांच्या निवडीचा विचार करता येईल. 'एकाकिका : उद्गम आणि विकास' या पहिल्या लेखात संस्कृत एकांकी रचनेपासून आजच्या मराठी एकाकी रचनेपर्यंतचा ऐतिहासिक आढावा सपादकांनी घेतला आहे. सस्कृत साहित्यशास्त्रामधील 'रूपकां'च्या पाच प्रकारांचा विचार करताना भास हा नाटककार महत्त्वाचा होता. परंतु सपादकानी " ऊरुभंग, मध्यमव्यायोग आणि कर्णभार या रचनातील नाटयमय प्रसंग, अखेर-पर्यंत औत्सुक्य टिकवून धरण्याचे त्याचे सामर्थ्य आणि शैली मनोहारी आहे." (पृष्ठ बारा) अशा वर्णनात्मक वाक्यापलीकडे भासाच्या एकाकी रचनेचे रचनात्मक व ऐतिहासिक महत्त्व काय, याचा विचार केलेला नाही. सस्कृत एकाकी रचनेविष-यीच्या लेखनात, 'साहित्यदर्पणा'तील उपरूपकाच्या लक्षणातून एकाकिकेची गतिमा-नता सूचित होते, हा एकच महत्त्वाचा मुद्दा संपादकानी माडला आहे...सस्कृत एकाकी रचनेनतर, कालानुक्रमे, तजावरी नाटकाचा विचार केला आहे. हा काला-नुक्रम, वाङ्मयीन इतिहासाच्या दृष्टीने, शंकनीय मानता येईल. एखाद्या भाषेतील वाङ्मयपरंपरेचा विचार करताना वेगवेगळे कालखंड वाङ्मयेतर कारणांनी एक-

मेकापासून दुरावलेले असल्यास कवळ लेखनकालाचा संदर्भ गृहीत धरून जिवंत परपरेचे दर्शन घडवता येत नाही. उदाहरणार्थ : तजावरी एकाकी रचनाचा अभ्यास गेल्या दहा वर्षात चालू झाला आहे. आणि मराठ्याचा इतिहास लक्षात घेता सरस्वतीमहाल ग्रथालयातील समृद्ध साहित्यनिर्मिती सपूर्ण मराठी वाङ्मयपरंपरेचा अविभाज्य भाग होती, असे विधान वस्तुस्थितिदर्शक मानता येणार नाही. हेच थोड्याफार फरकाने भासाच्या एकाकी रचनेविषयी म्हणावे लागेल. सस्कृत एकाकी रचनाचे अनुवाद हे संस्कृत व इग्रजी नाटकाच्या अनुवादाच्या नतरच्या काळातील आहेत. असे असता, 'परतु आंग्ल वाङ्मयाशी आपला परिचय होण्यापूर्वीपासून एकाकी रचना, तिचे दीर्घ नाटकाहून असणारे वेगळेपण, तिची प्रयोगक्षमता याची जाणीव आपणास होती, हे संस्कृत एकाकी रचनाचे अनुवाद व तंजावरी नाटके यावरून सिद्ध होते.' (पृ.: तेरा) असे विधान सपादकानी कसे केले ? 'आपणास जाणीव होती' म्हणजे काय ? संस्कृत एकाकी रचनाचे मराठेशाहीत प्रयोग होत असत असा पुरावा तर सपादकांना सापडला नाही ना ? मराठी वाङ्मयाभिरुचीच्या इतिहासात आजवर असे सकारण मानले जाते की रामायण–महाभारत–पंचमहाकाव्ये याच्यावर पोसलेल्या मराठी कवीनी–लेखकांनी संस्कृत नाटकाविषयी स्वारस्य व्यक्त केलेले नाही. ही नाटके आंग्लपूर्वकाळात रंगमचावर आलेली नाहीत. सस्कृत व तजावरी ग्रंथसपत्तीचा कोणाही मराठी भाषिकाला अभिमान वाटणे साहजिक आहे; परतु वाङ्मयचर्चेमध्ये या अभिमानाला अभिनिवेशाचे स्वरूप येऊ नये.

ऐतिहासिक क्रमाने विचार करताना, सस्कृत एकाकी रचना – तंजावरी रचना – फार्स या क्रमामध्ये मराठेशाहीतील वगाचा विचार सपादकांना करावासा का वाटला नाही ? पेशवाईतील वग आजच्या वगाइतका एकाकी रचनेला जवळचा नसला तरी रचनात्मक विकासक्रमात त्याचा विचार आवश्यक होता. फार्सच्या संदर्भात सामाजिक हेतूमुळे निर्माण झालेली सवादप्रधान रचना आणि प्रतिपक्षाची टर उडवण्याच्या वृत्तीतून निर्माण झालेले दृश्य विनोदात्मक अंग यातील अंतर्विरोधाचा विचार सपादकानी केलेला नाही. एखाद्या फार्सचे उदाहरण घेऊन फार्सच्या रचनेच्या प्रायोगिक अगाची कल्पना दिली असती तर ते विवेचनाला उपयुक्त ठरले असते.

'मराठी एकांकिका' या उपविभागात घेतलेला मराठी एकांकिकांचा धावता आढावा वाङ्मयेतिहासातील एखाद्या उपप्रकरणाइतकाच जुजबी आहे. '१९५५ नतर' या उपविभागात, मराठी वाङ्मयातील बदलती अभिरुची, तिचे पाश्चात्य वाङ्मयातील बदलते आदर्श, यांचा विचार संपादकानी साक्षेपाने घेतला आहे. विशेषतः नवकथा व नव्या एकाकिका याचा त्यानी केलेला विचार त्यांच्या सवेदनाक्षम रसिकतेची साक्ष देतो; तसेच एकाकिका रंगमंचावर आधिक्याने का येऊ लागल्या, याविषयीचे विवेचन वाचताना त्यांच्या निरीक्षणशक्तीचा प्रत्यय येतो.

...मात्र या विद्वान संपादकांनी विनाकारण अवतरणे का दिली आहेत ते उमजत नाही. 'आजच्या या एकाकिकांचे प्रयोग म्हणजे आजच्या मराठी रंगभूमीचे एक लेणे आहे.' (पृ. एकोणतीस) अथवा 'आज मराठी एकाकिका व्यक्त करत असलेली जीवननाट्याच्या प्रकृतीची समज ही बहुरंगी, व्यापक आणि अर्थगर्भ आहे; त्यामुळे तिची नाट्याभिव्यक्तीदेखील विविध आकर्षक रंग धारण करत आहे.' (पृ. एकतीस) या प्रा. वा. ल. कुळकर्णी यांच्या लिखाणातून घेतलेल्या विधानातून संपादकांनी लक्षणीय असे काय सांगितले? संपादकत्रयीचे या क्षेत्रातील अधिकारित्व मान्य असताना आपल्या विचारावर वेगळे अवतरणाचे शिक्कामोर्तब करण्याची गरज त्यांना का भासावी ते कळत नाही. विवेचनाच्या ओघात श्री. चंद्रकांत देशपांडे यांच्या एकांकिकाचा नाममात्र उल्लेख आहे. वस्तुतः घाटाच्या संदर्भातील मराठी एकाकिकेविषयीच्या उद्याच्या विचारात त्यांच्या एकाकिका महत्त्वाच्या आहेत; त्यांचा विचार झाला असता तर हा ऐतिहासिक विचार परिपूर्ण होऊ शकला असता.

यापुढील लेख 'एकांकिका : स्वरूप आणि सामर्थ्य' हा आहे. एखाद्या वाङ्मयीन घाटाच्या निकषाचा विशुद्ध वाङ्मयीन विचार नेमक्या शब्दात व्यक्त करणे अत्यंत अवघड असते. संपादकांनी, या लेखात, प्रारंभीच, एकाकिका म्हणजे संक्षिप्त नाटक नव्हे; तो एक स्वतंत्र कलाबंध आहे, हा विचार स्पष्टतेने मांडला आहे. पुढे अपेक्षा अशी की तो कलाबंध म्हणजे काय, याचे स्पष्टीकरण येईल. परंतु दुसऱ्याच परिच्छेदाच्या पहिल्या वाक्यात – 'उत्कृष्ट एकाकिका म्हणजे एकांकिकेचे सर्व गुण घेऊन निर्माण झालेली एकांकिका' (पृ० : तेहतीस) अशी वर्तुळाकार व्याख्या येते, व पुढे त्याचे स्पष्टीकरण म्हणून 'ती स्वयंपूर्ण, संपूर्ण, एकरसात्मक, एकसंस्कारी, एककेंद्री, एकजिनसी अशी नाट्यकृती असणार' असे वाक्य येते. यापुढे इंग्रजीतील वाङ्मयीन संज्ञाकोशामधील एकांकिकेची लक्षणे इंग्रजीत दिलेली आहेत; त्यांचे मराठी भाषांतर देणे आवश्यक नव्हते काय? नंतर केलेल्या स्वतंत्र विवेचनात एकांकिकेतील शब्दयोजना, रचनाबंध, नि:शब्दता यांचा विचार संपादकांनी नेमकेपणाने मांडला आहे. तसेच 'एकाकिका : साधन-विचार' या उपविभागात, संपादकांची वाङ्मयीन व रंगभूमीची जाणीव परस्परपूरक झाल्याने तो विचारही मार्गदर्शक झाला आहे.

या संग्रहात सोळा एकाकिका आहेत. या एकांकिकांचे परीक्षण हा प्रस्तुत समालोचनाचा विषय नाही. मात्र या एकाकिकांच्या निवडीबद्दल काही प्रश्न मनात आले; ते व्यक्त केल्यास अप्रस्तुत ठरू नयेत. दिवाकरांच्या संवादरूप नाट्यछटेनंतर काणेकरांची एकाकिका आणि नंतर पु. ल. देशपांड्यांच्या एकांकिकेपासून आजच्या कालखंडातील एकाकिका, असा क्रम संपादकांनी लावला आहे. 'एकांकिका वाटचाल' या ग्रंथातून या वाङ्मयप्रकाराच्या विकासक्रमाचे दर्शन घडवणे

हा हेतू असल्यास मात्र रांगणेकर व मामा वरेरकर यांची एकेक तरी एकांकिका प्रस्तुत संग्रहात असणे आवश्यक होते. तसेच भाषांतरित एकांकिकेमुळे मराठी रंगभूमीवर काही वेगळे संस्कार घडले असतील तर भाषातरित एकांकिका का नाकारायच्या ? श्री विजय तेंडुलकर व श्री. रत्नाकर मतकरी यांच्या एकांकिका निवडताना, रंगमचाचे वेगळे भान व्यक्त करणाऱ्या एकांकिका निवडल्या असत्या तर मराठी एकांकिकेच्या नव्या वळणाचे दर्शन या सग्रहात घडले असते....'अबोल झाली सतार' ही संपूर्णतः दोषपूर्ण एकांकिका या सग्रहासाठी सपादकानी का निवडली ? (ही दोषास्पद असल्याची कबुलीही त्यानी दिलेली आहे.) श्री. पुरुषोत्तम दारव्हेकर नाटककार म्हणून प्रसिद्ध असले तरी 'एकांकिका वाटचाल' सारख्या ग्रंथात स्थान देण्याइतके त्याचे एकांकिकालेखन उल्लेखनीय ठरलेले नाही. हेच प्रा भालबा केळकर यांना दिलेल्या स्थानाविषयी म्हणावे लागेल. या सग्रहात महत्त्व होते प्रातिनिधिकतेला. श्री. महेश एलकुंचवार यांची 'सुलतान' ही एकांकिका निवडणाऱ्या चाणाक्ष सपादकांनी श्री. चद्रकात देशपाडे याची 'बस' किंवा दुसरी एखादी एकांकिका निवडली असती तर द्रष्टेपणाचा मान त्याना मिळू शकला असता.

एकांकिकांच्या या संग्रहाला 'विवेचक अभ्यास' हे एक परिशिष्ट जोडलेले आहे. त्यात प्रत्येक एकांकिकेचे साहित्यस्वरूप व निर्मितीकल्पना यांची चर्चा असून शेवटी पाश्चात्य एकांकिकाविषयीचा जुजबी विचार आहे. 'निर्मिति कल्पना'त विशेष कल्पक असे काहीच नाही. परंतु ही परिशिष्टे जोडल्याने या ग्रंथाला पूर्णत्व आले आहे हे खरे.

एखाद्या वाङ्मयप्रकाराच्या विकासाचे विहंगमावलोकन करणे आणि त्यातून प्रातिनिधिक संग्रह निर्माण करणे हे अत्यंत अवघड कार्य या सपादकत्रयीने परिश्रमपूर्वक केले आहे. 'सोमैया' या नव्याने प्रस्थापित होणाऱ्या प्रकाशनाने इतके आकांक्षी प्रकाशन योजावे, याबद्दल सपादकासमवेत प्रकाशकाचेही अभिनदन करणे आवश्यक आहे. साहित्याचे अभ्यासक, सामान्य रसिक, नट व दिग्दर्शक या सर्वांना उपयुक्त ठरेल असा हा ग्रथ आहे.

**निवडक एकांकिका : १९६६; : प्रा. श्री. र. भिडे : मूल्य रु. १२;**
**एकांकिका वाटचाल : श्री. र. भिडे–व. दि. कुळकर्णी–भालबा केळकर मूल्य रु. १२**
**सोमैया पब्लिकेशन्स प्रायव्हेट लिमिटेड; मुंबई**



आई
साठे
ग्लुकोज
बिस्किटें
इतकी कशी ग
चांगली ?
SATHE GLUCOSE
SATHE GLUCOSE BISCUITS
ग्लुकोज बिस्किट
चांगली असणारच, कारण साठे ग्लुकोज बिस्किटें अत्यंत शुद्ध अशा पदार्थांपासून बनवितात. प्रोटीनयुक्त गव्हाचे पीठ, सकस मलईदार दूध व उत्साहवर्धक ग्लुकोज वगैरे वापरून व सोनेरी रंग येईपर्यंत खरपूस भाजलेली असतात आणि ताजेपणा टिकविण्यासाठीं शेवटी उत्कृष्ट दर्जाच्या वेष्टनातून ती भरली जातात. मग का बरं ती चांगली व खुसखुशीत लागणार नाहीत।
साठे
बिस्किटें
साठे बिस्किटें म्हणजेच आहार व आनंद.
heros'-SBC-36

दहा वाजून छत्तीस मिनिटांनी डॉर्सेटशायरने आपल्याजवळचा शेवटचा टॉर्पेडो टाकला. या वेळी मात्र 'बिस्मार्क' कलंडली. नंतर हळूहळू ती साफ बुडाली. तिच्यावरचा जर्मन ध्वज अखेर दिसेनासा झाला.

हिटलरचे फार मोठे स्वप्न पार उध्वस्त झाले.

पुढे एका प्रसंगी त्याच्या कोण्या एका सहकाऱ्याने जपानच्या युद्धनौकांचे वारेमाप कौतुक केले. हिटलर कोरड्या स्वरात एवढेच म्हणाला, 'बिस्मार्कची याद आहे ना तुम्हाला ?"

बिस्मार्क लेखमालेतील अखेरचे प्रकरण.

---


उत्तर अटलांटिक महासागरावर सत्तावीस-मे एकोणिसशे एकेचाळीस सालचा दिवस उगवला.. महासागर मागील काही दिवसाप्रमाणे त्या दिवशीही अशांतच होता. आकाश कुंद होते. मधूनमधून पावसाच्या सरी कोसळत होत्या. वारा भणाणा वाहत होता.

महासागरावर विखुरलेल्या ब्रिटिश शिकारी नौका 'बिस्मार्क'च्या दिशेने झेपावत होत्या.

रात्री, व्हायनच्या विनाशिकांनी वेळोवेळी उडवलेल्या चंद्रज्योतींमुळे दुरून येणाऱ्या नॉरफोकला मार्गदर्शन झाले होते. आठ वाजायच्या जरा आधी वेक-वॉकरला 'बिस्मार्क' दिसण्याचा योग आला. नॉरफोक चांगली माऱ्याच्या टप्प्यात असूनही 'बिस्मार्क'ने तिच्यावर तोफा डागल्या नाहीत. अधिक धोकादायक नौकांसाठी 'बिस्मार्क' दारूगोळा राखून ठेवत असावी. 'बिस्मार्क' अवघी दहा मिनिटे दिसत राहिली; आणि नंतर धुक्या-पावसात अदृश्य झाली.

व्हायनच्या विनाशिकांनी उडवलेल्या चंद्रज्योतीमुळे दर्यासारंग टोव्हींच्या किंग जॉर्ज द फिफ्थलाही स्थल मार्गदर्शन लाभले होते. 'बिस्मार्क' अदृश्य झाल्यानंतर पंधराच मिनिटांनी वेकवॉकरला टोव्हीच्या ध्वजनौकेचे दर्शन झाले. अंतिम घटका जवळ आली हे वेकवॉकरला समजले. त्याने या विलक्षण मोहिमेचा आरंभ पाहिला होता; आता तो अंत पाहणार होता वेकवॉकरच्या स्वतःच्या आणि त्याच्या थकल्याभागलेल्या नाविकांच्या दृष्टीने ती गोष्ट मोठी कृतार्थतेची होती.

साडेआठ वाजता डॉर्सेटशायरने कोझॅकला पाहिले. कोझॅकने तिला 'बिस्मार्क'च्या ठिकाण्याची कल्पना दिली. डॉर्सेटशायर अगदी वेळेवर येऊन पोहोचली होती



# सिंक द बिस्मार्क

अनंत भावे                    आठ

'बिस्मार्क'वर हल्ला करण्यासाठी, पहाटे, आर्क रॉयलच्या विमानांनी आकाशात उड्डाण केले खरे; पण वातावरण अजूनही भयानक होते. वाऱ्यापावसाचे थैमान चालूच होते. त्यामुळे अखेर नाईलाजाने विमानहल्ल्याचा विचार रद्द करून सॉमरव्हिलने विमाने परत बोलावली. त्या तसल्या कुंद वातावरणात, सर्व बाजूंनी ब्रिटिश नौका 'बिस्मार्क'वर गर्दी करत असताना, आधल्या दिवशी शेफिल्डच्या संबंधात घडलेला प्रमाद विमानांकडून पुन्हा घडण्याची शक्यता होती.

दर्यासारंग टोव्हीदेखील वातावरणाचा अंदाज घेत होते. अखेर दिवस चांगला वर येईपर्यंत थांबणे श्रेयस्कर आहे असे त्यांना वाटले. रात्री व्हायनच्या चंद्र-ज्योतींचा प्रकाश स्पष्ट दिसण्यात पावसामुळे पुन्हा पुन्हा व्यत्यय आला होता; आणि अजूनही 'बिस्मार्क' नेमकी कोठे आहे ते त्यांना माहीत झाले नव्हते.

पुन्हा एकदा, याही वेळी, टोव्हींना नॉरफोकने मदत केली. कॅप्टन फिलिप्सला आठ मैलांवर, सरळ त्याच्याच दिशेने येणारी एक युद्धनौका दिसली होती. अर्धवट प्रकाशात आणि पावसात ती रॉडनेच आहे अशी त्याची समजूत झाली. तरी त्याने

लगेच तिला आवाहन करून आपली ओळख पटवण्याची मागणी केली. पण तिच्या-कडून कसलेही उत्तर मिळाले नाही. मात्र ती नॉरफोकच्या रोखाने यतच राहिली.

कॅप्टन फिलिप्सने अधिक बारकाईने निरीक्षण केले. आणि त्याच्या लक्ष्यात आले की त्याच्या रोखाने वेगात येणारी युद्धनौका दुसरीतिसरी कोणतीही नसून खुद्द 'बिस्मार्क'च होती. फिलिप्सने तत्परतेने नॉरफोक वळवली आणि तो 'बिस्मार्क'च्या मार्गातून दूर झाला. या मोहिमेत, जीवावरील संकटातून बचावण्याची नॉरफोकची ही पहिलीच वेळ नव्हती.

'बिस्मार्क'ला चुकवण्यासाठी नॉरफोक वळली आणि काही अंतरावर 'बिस्मार्क'चा शोध करणाऱ्या रॉडने आणि किंग जॉर्ज द फिफ्थ यांचे दर्शन तिला झाले. तिने ताबडतोब त्यांना 'बिस्मार्क'च्या नेमक्या ठिकाण्याची कल्पना दिली. प्रथमपासून मोठ्या चतुराईने केलेल्या कामगिरीची अशी यथोचित सांगता नॉर-फोकने केली होती. यानंतर पुढे, 'बिस्मार्क' आणि ब्रिटिश नौका यांच्यातील दुवा होऊन, 'बिस्मार्क'शी त्याचा संपर्क तुटणार नाही अशी खबरदारी नॉर-फोकने घेतली.

नऊ वाजायला सतरा मिनिटे कमी असताना अखेर 'बिस्मार्क' दर्यासारंग टोव्हीच्या नजरेस पडली. असे काही घडेल याची आशा एकदा दोनदा तरी टोव्हींनी साफ सोडून दिली होती. त्यांच्या दृष्टीने 'बिस्मार्क' एखाद्या पिशाच्चासारखी वावरत होती. तिच्या अमानुष सामर्थ्याची आणि गूढ हालचालींची माहिती त्यांना वेळोवेळी मिळाली होती. तिच्या पाठलागाच्या मोहिमेचे नियंत्रण दुरून त्यांनीच केले होते. परंतु आतापर्यंत तिला प्रत्यक्ष पाहण्याची संधी मात्र त्यांना मिळाली नव्हती.

सहा दिवसांपूर्वी एका एकाकी स्पिटफायर वैमानिकाने नॉर्वेजियन फियोर्डमध्ये असलेल्या 'बिस्मार्क'ला टिपले होते. धुक्याचा फायदा घेऊन तेथून ती निघाली होती आणि बर्फाळ डेन्मार्क-सामुद्रधुनीमधून बाहेर पडली होती. आर्क्टिक समुद्राच्या काळ्या पाण्यात तिच्या पाठलागाला सुरुवात झाल्यानंतर अनेक वेळा अदृश्य होऊन पाठलाग करणाऱ्यांच्या काळजाचा थरकाप तिने उडवला होता. चोवीस तारखेच्या सकाळी तिला युद्धात खेचली हाती खरी; पण तिनेच हूडसारख्या मातबर नौकेचा पाहता पाहता बळी घेतला होता. तिचा पाठलाग करता करता काही ब्रिटिश नौकांचा तेलसाठा संपून गेला होता. कितीतरी वेळा आता तिची कोंडी करता येईल असे वाटले होते; आणि प्रत्येक वेळी दुर्दैवाने आणि ॲडमिरल लट्येन्सने ते डाव उधळून लावले होते–दर्यासारंग टोव्ही थकून गेले होते. नाउमेद झाले होते.

पण त्या साऱ्याची भरपाई आता होत होती. हिटलरचा अभिमानविषय झालेली, अनेकांनी 'अजिंक्य' मानलेली, रसद तोडून ब्रिटनला उपासमारीने गुडघे टेकायला

फावण्याची महत्त्वाकांक्षा बाळगणारी बलाढ्य युद्धनौका अखेर जखमी अवस्थेत निर्णायक युद्धात खेचली जाणार होती.

इतक्या भयंकर शत्रूचा असामान्य चिकाटीने पाठलाग करून अखेर त्याला कोंडीत पकडल्याबद्दल कोणाही अधिकाऱ्याला अतीव समाधान वाटणे स्वाभाविकच होते. मात्र दर्यासारंग टोव्हीचे समाधान वैयक्तिक वा खासगी नव्हते. त्या विपरीत काळात, या विजयाने ब्रिटन राष्ट्राला मिळणाऱ्या दिलाशाचा विचार टोव्हीच्या मनात होता. त्यांच्या व्यक्तिमत्त्वाला, पेशाला आणि अधिकाराला साजेसेच होते ते. म्हणूनच 'बिस्मार्क'वरील अखेरच्या हल्ल्याला सज्ज होताना आपल्या अधिकाऱ्यांना आणि नाविकांना दिलेल्या संदेशात त्यांनी म्हटले होते : "प्रतिपक्षाच्या एका युद्धनौकेचा नाश एवढाच मर्यादित अर्थ 'बिस्मार्क'च्या शिकारीला नाही. या मोहिमेचा एकंदर युद्धाच्या निर्णयावर होणारा दूरगामी परिणाम आपण विचारात घ्यायला हवा....परमेश्वर तुमच्या पाठीशी राहून तुम्हाला विजयी करो"

जवळच जुनाट रॉडनेही युद्धाला सज्ज झाली होती. तिची इंजिने कार्यक्षम ठेवण्यासाठी इंजिन-कक्षामध्ये इंजिनीयर कमांडर बर्जे यंत्रविद्येचे आणि मानवी तंत्रकौशल्याचे चमत्कार करत होता. नजीक झालेल्या स्फोटांच्या धक्क्याने बधिर होऊन निकामी झालेली कितीतरी आजारी माणसे रॉडनेवर होती. आपल्या सोळा इंची तोफा कार्यवाहीत आणताना प्रत्येक वेळी स्वतःच हादरणाऱ्या खिळखिळ्या रॉडनेवरील या आजारी लोकांची, प्रत्यक्ष युद्धाला तोंड लागल्यावर काय अवस्था होणार होती कोणास ठाऊक. त्यातच युद्धनौकेवर न शोभेसा माल तिच्यावर भरला होता. मात्र या गोष्टीमळे रॉडनेचा उत्साह आणि आवेश किंचितही कमी झाला नाही. कॅप्टन डालरिंपल-हॅमिल्टनच्या समाधानात घराण्याच्या अभिमानाची भावनाही मिसळलेली होती : त्याचा एकुलता एक मुलगा दर्यासारंग टोव्हीच्या ध्वजनौकेवरून लढणार होता !

सुकाणू-व्यवस्था अर्धवट निकामी झाली असली तरी 'बिस्मार्क'च्या अत्याधुनिक, तरबेज तोफा अजून पूर्ण शाबूत होत्या. अचूक माऱ्याची त्यांची क्षमता सर्वांना चांगलीच ठाऊक झाली होती. रॉडने आणि किंग जॉर्ज द फिफ्थवरील तोफा संख्येने आणि आकाराने 'बिस्मार्क'च्या तोडीच्या असल्या तरी किंग जॉर्ज द फिफ्थच्या तोफा अजूनपर्यंत प्रत्यक्ष कार्यवाहीत आल्या नव्हत्या. शिवाय तिच्या जुळ्या बहिणीप्रमाणे असलेल्या प्रिन्स ऑफ वेल्सच्या तोफांनी फार मोठे कर्तृत्व गाजवले नव्हते; त्यामुळे किंग जॉर्ज द फिफ्थवरील तोफांकडूनही असामान्य अपेक्षा करता येत नव्हती. आणि रॉडनेच्या सोळा इंची तोफा जुनाट घर्तीच्या होत्या. उलटपक्षी 'बिस्मार्क'च्या तोफांच्या कारागिरीत जर्मन यंत्रविशारदांनी आपले सारे कौशल्य पणाला लावले होते. त्यांच्या कारागिरीत साऱ्या ज्ञात अत्या-

धुनिक कल्पनांचा उपयोग करण्यात आला होता. त्यामुळे दर्यासारंग टोव्हीनीं दीर्घ काळ चालणाऱ्या, खडतर लढाईसाठी मनाची तयारी केली.

'बिस्मार्क' दिसून अवघी चारच मिनिटे झाली आणि रॉडनेने तिच्यावर प्रथम तोफा डागल्या. वृद्ध रॉडनेने हा मान स्वकर्तृत्वाने मिळवला होता. लगोलग टोव्हीच्या ध्वजनौकेनेही साथ दिली. ही सुरुवात लढाईच्या गांभीर्याला साजेशीच झाली. मात्र या गांभीर्याशी विसंगत असा हास्योत्पादक प्रसंग त्याच वेळी किंग जॉर्ज द फिफ्थवर घडला. किंग जॉर्ज द फिफ्थने रॉडनेपाठोपाठ तोफा डागल्या होत्या; आणि 'बिस्मार्क'ने ताबडतोब प्रत्युत्तर दिले. त्यावेळी टोव्हीच्या गोलंदाज-प्रमुखाने आपल्या सहकाऱ्यांना सूचना दिली की आहे त्या अंतरावरून 'बिस्मार्क'चे तोफगोळे किंग जॉर्ज द फिफ्थवर पोचायला बरोबर पंचावन्न सेकंद लागतील. दर्यासारंगांनी ही माहिती स्वत:जवळच ठेवण्याची सूचना गोलदाज-प्रमुखाला केली आणि ते हसून म्हणाले : "'बिस्मार्क'च्या पंधरा इंची तोफेचा गोळा नेमका कोणत्या क्षणी यमसदनाला पाठवणार आहे, हे समजण्याची फारशी उत्सुकता नाही मला!"

परंतु 'बिस्मार्क'ने प्रत्युत्तर दिले ते रॉडनेच्या तोफांना. तिचा पहिला तोफमारा भलतीकडेच गेला. दुसरादेखील पहिल्यासारखाच होता. तिसरा मात्र अगदी नजीक झडला. रॉडने खिळल्यासारखी झाली. तिच्याजवळ पांढऱ्या पाण्याची कारंजी उसळली. आवाजाने रॉडनेवरील माणसांच्या कानठळ्या बसल्या. एकूण आपले लक्ष टिपायला 'बिस्मार्क'ला फारसा वेळ लागला नव्हता. परतु दालरिंपल-हॅमिल्टन एवढ्याने डरणारा नव्हता. बेगुमानपणे त्याने रॉडने डाव्या अंगाला वळवली. त्यामुळे तिच्या सगळ्या तोफा आता 'बिस्मार्क'वर सरळ रोखल्या गेल्या. आणि त्याने तोफांना बत्ती दिली.

रॉडने 'बिस्मार्क'ला लढाईत गुतवत असल्यामुळे टोव्हीना सरळ 'बिस्मार्क'वर घसरता आले. लवकरात लवकर 'बिस्मार्क'ला जवळच्या टप्प्यात आणण्याचा टोव्हीचा विचार होता; आणि 'बिस्मार्क'चा अचूक मारा नागमोड चालीने चुकवण्याचा रॉडनेचा यशस्वी प्रयत्न चालू असताना टोव्हीनी तो विचार कार्यान्वितही केला. थोड्या वेळाने नॉरफोक आपल्या आठ इंची तोफानिशी लढाईत सामील झाली. या असल्या अद्‌भुत समरप्रसंगात वेक-वॉकर सामील झाला नसता तरच नवल.

'बिस्मार्क'च्या माऱ्याला रॉडनेने अधिकच प्रखर उत्तर दिले. तिच्या बारा सहा इंची तोफादेखील धडकू लागल्या. या भयकर वर्षावामुळे 'बिस्मार्क' खचते आहे, असे रॉडनेवरील टेहळ्यांना वाटले. 'बिस्मार्क'चा मारा खरेच काहीसा मंदावला होता. परंतु याच्यावरून नेमका काहीच अंदाज बांधता येत नव्हता. तिच्यापासून अजूनही धोका होताच. अजूनही हूडप्रमाणेच रॉडने वा किंग जॉर्ज द

फिफ्थ किंवा दोन्ही युद्धनौकांची दुर्दशा करायला ती समर्थ होती. त्यामुळे अधिक खल न करता, " ' बिस्मार्क 'ला जलसमधी द्या " हा चर्चिल यांचा संदेश तंतोतंत कृतीत आणणेच श्रेयस्कर होते.

दरम्यान टोव्हीनी ' बिस्मार्क ' आणि किंग जॉर्ज द फिफ्थमधील बरेच अंतर कमी केलें होते. आता ' बिस्मार्क ' अवघी सोळा हजार गजावर होती. याच क्षणाची टोव्ही वाट पाहात होते. तडकाफडकी किंग जॉर्ज द फिफ्थच्या साऱ्या तोफा ' बिस्मार्क 'वर रोखण्याचा आदेश टोव्हीनी कमांडर कॅप्टन पॅटर्सनला दिला.

' बिस्मार्क 'वर चाल करून जात असतानाच टोव्ही स्वतः थोडे दक्षिणेकडे सरकले होते, आणि रॉडनेलाही त्यांनी तसाच हुकुम सोडला होता. दारूगोळयाच्या धुराने वेढलेली किंग जॉर्ज द फिफ्थ आवेशाने ' बिस्मार्क 'वर तुटून पडली, आणि आपल्याशी खराखुरा तुल्यबल असलेला प्रतिस्पर्धी तो हाच असे जणू कळल्याप्रमाणे ॲडमिरल लटयेन्सने रॉडनेचा नाद सोडून अचानक आपला मारा आता किंग जॉर्ज द फिफ्थवर केंद्रित केला.

दर्यासारंग टोव्हीना हेच पाहिजे होते. त्याच्या ध्वजनौकेचे चिलखत चांगलेच मजबूत होते. त्यामुळे ' बिस्मार्क 'च्या तोफगोळयांनी हुडची झाली तशी, किंवा म्हाताऱ्या रॉडनेची होऊ शकली असती तशी अवस्था किंग जॉर्ज द फिफ्थची होणे शक्य नव्हते.

किंग जॉर्ज द फिफ्थने मारा आपल्यावर ओढवून घेतल्यानंतर रॉडनेला दुय्यम आणि पूरक कामगिरी करावी लागली. आता धूर वा उसळणारे पाणी कशाचाच अडथळा रॉडनेला होत नव्हता. त्यामुळे ' बिस्मार्क ' व किंग जॉर्ज द फिफ्थ या महाकायांचे तुमुल युद्ध तिला व्यवस्थित पाहता आले. आणि काय विलक्षण रोमहर्षक अनुभव होता तो ! ध्वजनौकेने आपल्या साऱ्या तोफानिशी मारा केल्यानंतर थोडयाच वेळात ' बिस्मार्क 'च्या पुढील भागीच्या तोफबुरुजावर प्रचंड आघात झाल्याचे दृश्य रॉडनेला दिसले.

तिकडे ' बिस्मार्क 'वर हलकल्लोळ उडाला होता. इतस्ततः प्रेते पडली होती. ' बिस्मार्क 'चे तोफा-नियंत्रण करणारे केंद्रस्थानच उध्वस्त झाले होते. तोफांचे परिणामकारक नियंत्रण आता अशक्य झाले होते. म्हाताऱ्या रॉडनेच्या तोफमाऱ्याची करामत होती ही ! जखमी सैनिकांना खाली नेण्यात येत होते. सर्वत्र आगी लागल्या होत्या. चौबाजूंना धूर पसरला होता. ' बिस्मार्क 'वरील पेटलेल्या, छिन्नविच्छिन्न झालेल्या वस्तू सागरात फेकल्या जात होत्या. वैद्यकीय पथक मृत आणि जखमी नाविकाचा शोध घेत होते.

ॲडमिरल लटयेन्स आणि कॅप्टन लिंडेमान तोफांवर पुन्हा नियंत्रण प्रस्थापित करून त्या कार्यक्षम करण्याच्या प्रयत्नात गुंतले होते. कारण ' बिस्मार्क ' अजूनही लढा देऊ शकत होती. किंग जॉर्ज द फिफ्थ आणि रॉडनेच्या प्रलयंकर भडिमारानेही

‘ बिस्मार्क ’चा लढत राहण्याचा निश्चय रतिमात्र क्षीण झाला नव्हता. कारण खुद्द हिटलरची ती लाडकी युद्धनौका नव्हती काय? आणि त्याने, ‘ बिस्मार्क ’-वरील प्राणसंकटात सारे जर्मन राष्ट्र तिच्या पाठीशी उभे आहे, असा संदेश पाठवला नव्हता काय?.. आणि म्हणून ‘ बिस्मार्क ’ लढतच राहिली. अपंग आणि अर्धमेली होऊनही तिचा ताठा कमी झाला नव्हता. त्यामुळे ती अखेरपर्यंत धोका-दायकच होती.

टोव्हींनी सरबत्तीला सुरुवात केल्यानंतर अवघ्या दोन मिनिटांनी डॉर्सेटशायर रणमैदानात दाखल झाली; आणि तिने लगोलग आपल्या आठ इंची तोफांनी मारा सुरू केला. ‘ बिस्मार्क ’वर आता चौबाजूंनी गोळ्यांचा वर्षाव होत होता. रॉडने आणि नॉरफोकने टॉर्पेडोसुद्धा टाकले; पण ते लक्ष्य वेधू शकले नाहीत.

ब्रिटिश नौकांवरून ‘ बिस्मार्क ’ दिसणे त्या वेळी अशक्यच झाले होते. कारण तोफांच्या मुखातून उडणाऱ्या गोळ्यांबरोबरच उसळणाऱ्या धुराने त्यांच्यात आणि ‘ बिस्मार्क ’मध्ये मातकट रंगाचे धुके दाटले होते. हे धुके विरून उघडीप झाली असतानाही पावसा-धुक्यामुळे गोळे कोठे पडत आहेत ते नेमके कळत नव्हते. एक गोष्ट मात्र उघड होती: खुरडत चालणारी ‘ बिस्मार्क ’ वायव्येकडे पळ काढू लागली होती. त्या वेळी ब्रिटिश नौकांभोवती इतका धूर झाला होता की धुरामुळे काही दिसणे अशक्य झाले होते. म्हणून टोव्हींनी तोफमारा थांबवण्याची आज्ञा केली. आणि त्यावरोबरच दोन्ही युद्धनौका पळून जाणाऱ्या ‘ बिस्मार्क ’ला पुन्हा आडवे येण्यासासाठी उत्तरेकडे वळवल्या.

‘ बिस्मार्क ’चा अंतकाळ समीप आला होता.

उत्तरेकडे वळल्यामुळे, पुन्हा एकदा, रॉडनेवर आघाडी सांभाळण्याची जबाब-


लहान मुलांसाठीं उत्कृष्ट औषध।

डोंगरे बालामृत

के. टी. डोंगरे अ‍ॅण्ड कं. प्रा. लि. मुंबई-१.

दारी पडली. 'बिस्मार्क'चा बेभान मारा आता रॉडनेवर एकवटला; आणि म्हातारी रॉडने आपल्या इभ्रतीला साजेशा हिमतीने तो झेलू लागली.

रॉडनेच्या डेकखालच्या भागातील वातावरण विलक्षणच झाले होते. रॉडने-वरील आजारी माणसे आपापल्या बर्थवर पडली होती, आणि प्रत्येक गोळा फेक-ताना हादरणाऱ्या रॉडनेचे हादरे खात होती. 'बिस्मार्क'चा एखादा गोळा नजीक पडला की कोपरखळी बसल्यासारखी रॉडने बाजूला सरके. त्यावेळी आवाजाने आणि बसणाऱ्या धक्क्याने आजाऱ्यांचे प्राण कंठाशी येत.

इंजिन-कक्षामध्ये कसाबसा उभा राहिलेला, पार थकून गेलेला इंजिनीयर कमांडर बर्ज आणि त्याचे कष्टाळू सहकारी असंख्य करामती करून रॉडने युद्ध-सज्ज ठेवण्याचा निकराचा प्रयत्न करत होते. आणि त्यांच्या डोक्यावर लढाई अखडपणे चालू होती.

नौकेच्या इतर विभागातील नाविकापेक्षा ज्यांना प्रत्यक्ष लढाई न दिसता खालच्या भागात राबावे लागते त्याना ती अधिक भीषण आणि अधिक असह्य होते. आपल्या तोफांचे केवळ आवाज त्यांना ऐकू येतात. कानोसा घेता येतो. परंतु लक्ष्यवेध झालेला पाहण्याचे भाग्य त्यांच्या नशिबी नसते. भयंकर अज्ञाताच्या छायेत त्यांना राहावे आणि काम करावे लागते. कोणत्या क्षणी एखादा चिलखत-भेदक तोफगोळा वा टॉर्पेडो नौकेच्या जलरेषेच्या खालील भागाला भगदाड पाडील, आणि सागराचे अथांग पाणी आत शिरेल त्याचा नेम नसतो.

रॉडनेच्या खालच्या भागात असलेल्या आजारी लोकांना काही काळ यम-यातनांचा प्रत्यय आला असेल यात शंका नाही.

जलरेषेच्या खाली वीस फूट असलेल्या रॉडनेच्या टॉर्पेडो-विभागातील नावि-कांनी टॉर्पेडो-मारा करण्याच्या संधीचे स्वागत केले. टॉर्पेडो-मारा करण्यात गुतल्यामुळे संभाव्य संकटाचा मनाला पोखरणारा विचार मागे पडला. इतक्यात अचानक त्यांचा विभाग हादरला. प्रचंड आवाज झाला. जणू तो विभाग ही एक प्रचंड घंटाच होती. रॉडनेच्या टॉर्पेडो-विभागाच्या अगदी जवळ 'बिस्मार्क'चा तोफगोळा पडला होता! इतका जवळ की त्यामुळे ज्या झडपेतून टॉर्पेडो फेकले जातात ती झडपच आखडून जखडल्यासारखी झाली. ती उघडता येणे आता शक्य नव्हते. त्यामुळे टॉर्पेडो-मारा थंड पडला.

रॉडने अखंडपणे स्वतःच्या तोफमाऱ्यानेदेखील हादरतच होती.

उत्तरेकडे वळताना टोव्हींनी मनाशी काही गणित केले होते. त्याच्या बिनचूक-पणाचा पडताळा त्यांना लगेच मिळाला : आता त्याच्या नौका अशा स्थितीत होत्या की त्यांच्या तोफमाऱ्याने उत्पन्न होणारा सघन धूर वाहत्या वाऱ्याबरोबर आपोआप विरून जावा. आणि ज्या वेळी वातावरण असे निवळले त्या वेळी 'बिस्मार्क' अवघी पाच किंवा सहा मैलावर होती. दुर्बिणीतून 'बिस्मार्क'ची दयनीय अवस्था सहज लक्षात येत होती. तिच्यावर जागोजागी आगी लागून

ज्वाळा उसळत होत्या. कित्येक तोफा माना मोडून पडल्या होत्या. काहींची मुखे वासून निर्जीव डोळे आकाशाकडे लागले होते. मात्र उरलेल्या तोफा अजून नियमितपणे, बेदरकारपणे धडकतच होत्या. 'बिस्मार्क' शेवटची घटका मोजते आहे हे उघड होते. अजून धडकणाऱ्या तोफा हे त्या अक्राळविक्राळ राक्षसीचे मृत्यूपूर्वीचे आचके होते.

आता 'बिस्मार्क'ची पद्धतशीर वासलात लावण्याचे अपरिहार्य, कठोर कर्म करायचे होते. तुमचा पक्ष कोणताही असो, एखाद्या महान नौकेचा अंत नेहमीच खेदजनक आणि शोकपूर्ण असतो. त्या नौकेच्या रूपाने साकार झालेला तो सारा शास्त्राभ्यास, ते यंत्रविज्ञान, ते प्रयत्न आणि परिश्रम, माणसांची आणि यंत्रांची ती कसोशीची तयारी आणि परिसीमा, तो निर्धार आणि अभिमान सारे सारे उध्वस्त होऊन कायमचे रसातळाला जात असते. त्यानंतर समुद्रवेली आणि शंखशिंपल्यांचे थरच्या थर चढून तिच्या निःशब्द कोनाकोपऱ्यातून मुक्त जलचर-संचार होणार असतो. मानवाचे-रौद्र का असेना-पण एक स्वप्न छिन्नविच्छिन्न होत असते, याची वेदना प्रत्येक अंतःकरणात उमटल्यावाचून कशी राहील.

दर्यासारंग टोव्ही आणि त्याचे आक्रमक सहकारी याच्याही अंतःकरणाला ती वेदना जाणवत होती. मात्र अशी वेदना होत असल्याचे चिन्ह त्यांच्या बाह्य घस्मर कृतीत यत्किंचित दिसत नव्हते. दिसणे शक्यही नव्हते. कारण दर्यासारंग टोव्हीच्या आधिपत्याखाली असलेल्या या युद्धनौकांच्या रूपाने साऱ्या ब्रिटनने 'बिस्मार्क'च्या रूपात आलेल्या मृत्यूशी निर्णायक संग्राम मांडला होता. या ब्रिटनच्या मनात, डंकर्कची, ब्रिटनवरील बॉम्बहल्ल्यांची, अन्नतुटवड्याची, स्थलांतराची, सागरतळाशी गेलेल्या अनेक व्यापारी गलबतांची, स्मृती अगदी ताजी होती.

असे म्हणतात की वाघाच्या सर्व रूपात, तो जखमी होऊन कोंडीत पकडला गेल्यानंतरचे त्याचे रूप अधिक तेजस्वी आणि प्रतापी दिसते. परंतु जखमी झालेला वाघ हत्येला प्रवृत्त होतो; म्हणून त्याचीच हत्या करणे आवश्यक असते. याच न्यायाने 'बिस्मार्क'चा निकाल लावण्यासाठी ब्रिटिश नौका आता पुढे सरसावल्या होत्या. 'बिस्मार्क' त्याच्या आता इतकी जवळ होती की त्यांच्या तोफमाऱ्याने 'बिस्मार्क'ची उडणारी छकले त्यांना स्पष्ट दिसत होती. गोळ्यामागून गोळे 'बिस्मार्क'वर धडकत होते. जागोजाग आगी लागल्या होत्या. धूर उसळत होता. स्फोटांसरशी 'बिस्मार्क'चा एक एक अवयव छिन्नविच्छिन्न होत होता.

तरीही ती सागरपृष्ठावर खुरडत होती. निकामी लोखंडाचा पेटलेला आणि धूर ओकणारा एखादा प्रचंड ढिगाराच पाण्यावर तरंगत होता जणू. 'बिस्मार्क'चे एकेकाळचे देखणे, लखलखीत आणि भव्य स्वरूप आता वेडेविद्रे, अजागळ आणि दीनवाणे दिसत होते.

'बिस्मार्क'ची गती अति मंद झाली होती. तिच्या दोन बाजूंना समांतर

राहण्यासाठी आपली गती तितकी कमी करणे ब्रिटिश नौकांना शक्य नव्हते. कारण त्यामुळे जर्मन पाणबुड्यांना त्यांच्यावर हल्ला करणे सुकर झाले असते. म्हणून रॉडने 'बिस्मार्क'च्या मुखासमोर आडव्या फेऱ्या मारत होती; आणि तिच्या डाव्याउजव्या बाजूवर यथासंधी भडिमार करत होती.

किंग जॉर्ज द फिफ्थवरील तोफांची अवस्था प्रिन्स ऑफ वेल्स या तिच्या जुळ्या बहिणीसारखीच झाली होती. मधूनमधून त्या बंद पडत होत्या. परंतु त्यांची स्थिती चिंताजनक होण्यापूर्वीच 'बिस्मार्क'ची नांगी मोडून पडली होती. त्यामुळे किंग जॉर्ज द फिफ्थची महाभयंकर दिव्यातून सुटका झाली.

चारी ब्रिटिश नौका न थांबता, एकाच वेळी, 'बिस्मार्क'वर तोफगोळे टाकत होत्या. एका नौकेच्या नाशासाठी त्यापूर्वी वा त्यानंतर कधीही एवढा अफाट दारूगोळा वापरला गेला नसेल. ह्या वेळपर्यंत 'बिस्मार्क'ची ओळख पटू नये अशी दुर्दशा झाली होती. आणि तरीही गोळे पडतच होते. नव्या आगी लागत होत्या. जुन्या पुन्हा चेतावल्या जात होत्या. 'बिस्मार्क' काळीठिक्कर पडली होती. तिची डोलकाठी आणि धुरांडे कोसळून पडले होते. पण अजूनही ती बुडत नव्हती.

किंग जॉर्ज द फिफ्थवरील एका अधिकाऱ्याने 'बिस्मार्क'च्या या वेळच्या अवस्थेचे वर्णन पुढील शब्दात केले आहे: 'बिस्मार्क' स्वत:च एखाद्या प्रचंड तोफगोळ्यासारखी धगधगत होती. ऊर्ध्वगामी ज्वालांच्या झगमगीत पार्श्वभूमीवर 'बिस्मार्क'वरील नाविकांच्या आकृती ठळक दिसत होत्या. ते दुर्दैवी नाविक नरकवास भोगणाऱ्या दुरात्म्यांसारखे भासत होते. 'बिस्मार्क'ची हालचाल थडावली होती. तिचे नियंत्रण करणे अशक्य झाले होते. अगतिकतेने ती स्वत:भोवती गिरक्या घेत होती. जणू देह ठेवण्यासाठी ती जागा शोधत होती. भाजून मरण्याच्या भीतीने 'बिस्मार्क'वरील नाविक आपापल्या जागा सोडून समुद्रात उड्या टाकत होते. अर्थात तिच्या भगदाडातून उसळणाऱ्या धुरामुळे सारे स्पष्ट दिसणे अवघड झाले होते. पण उघडच तिची स्थिती करुणास्पद होती. 'बिस्मार्क'वरील नाविकांना भाजून मरणे वा समुद्रात बुडून मरणे यापरते गत्यंतर नव्हते.

'बिस्मार्क' कधीही बुडणे शक्य नाही या आख्यायिकेत काही तथ्य असावे असे आता काही जणांना वाटू लागले होते. कारण 'बिस्मार्क'वर फेकलेल्या एकूण टॉर्पेडो-तोफगोळ्यांच्या अर्धवट माऱ्यानेही कोणतीही युद्धनौका गारद झाली असती. आणि वस्तुस्थिती अशी होती की शेवटपर्यंत तिच्या तोफा कार्यवाहीत आणण्याचे निकराचे प्रयत्न तिच्या झुंजार नाविकांनी चालवले होते. कारण 'बिस्मार्क' ही जर्मन नौदलाची मूर्तिमंत प्रतिष्ठाच होती. नाझी तत्त्वज्ञानाबद्दलची नव्हे तर अॅडमिरल रेडरने जोपासलेल्या नाविक परंपरेची निष्ठा तिच्या कणाकणातून भिनली होती. 'बिस्मार्क'सारखे अभिमानास्पद, दिमाखदार मरण क्वचितच कोण्या युद्धनौकेला लाभले असेल.

बिस्मार्क वरील संग्रामात बचावलेल्या, 'बिस्मार्क'च्या एका नाविकाने शेवटच्या घटकेच्या वेळी तिच्या झालेल्या अवस्थेचे वर्णन पुढीलप्रमाणे केले आहे:
"अखेर सारी 'बिस्मार्क' पेटली. काही मेलेल्या आणि जखमी माणसांचा जागच्या-जागी भाजून कोळसा झाला. डेकवर पडलेल्या भगदाडातून आगीच्या ज्वाळा आणि धूर वर उसळत होता; आणि डेकखाली, स्फोटांचा धडाका आणि अडकून पडलेल्या दुर्दैवी नाविकांचा आक्रोश एकमेकात मिसळत होता. तोफगोळे इंजिन-कक्षात आणि बॉयलर-कक्षात घुसले होते. तेथील माणसे भाजून निघाली होती. शुश्रूषागृहात जखमी नाविकांचा खच पडला होता आणि वैद्यकीय पथक त्यांच्यावर शर्थीने उपचार करत होते—इतक्यात तेथे एक तोफगोळा नेमका येऊन धडकला आणि साऱ्यांचा निमिषात संहार झाला. रक्तामांसाचे पुंजके जागजागी पडले होते. स्फोटांच्या दणक्या सरशी दारे आणि झडपा जखडून गेल्या होत्या; आणि त्यांच्या पलीकडे अडकलेल्या नाविकानी आकांत मांडला होता. सागराचे पाणी जागोजाग आत घुसत होते, त्यासरशी 'बिस्मार्क'चे छिन्नविच्छिन्न भाग आणि जखमी व मेलेली माणसे वाहून जात होती. जिवंत माणसांना भडकत्या आगीचे चटके बसत होते. दु:ख असह्य होऊन ते आक्रोशत होते. आगीपेक्षा समुद्र बरा मानून समुद्रात उड्या टाकत होते."

—आणि तरीही 'बिस्मार्क'वरील ध्वजा फडकत होती!

लटजेन्स आणि लिंडेमान कधी मृत्युमुखी पडले ते समजू शकले नाही. मात्र एक गोष्ट निश्चित की दोघांपैकी एकानेही ध्वजा खाली उतरवण्याचा वा शरणागती पत्करण्याचा आदेश कधीही दिला नाही.

'बिस्मार्क' अधिक त्वरेने बुडाली असती तर आणखी कितीतरी नाविक वाचू शकले असते यात शंका नाही. कारण तिच्या चिवटपणाचा तिटकारा वाटूनच ब्रिटिश नौका तिच्यावर निर्घृणपणे प्रहारावर प्रहार करत राहिल्या. इतक्या भीषण माऱ्यानंतरही शाबूत राहणारी युद्धनौका त्यांच्यापैकी कोणी कधीही पाहिली नव्हती. आणि म्हणूनच 'बिस्मार्क'चा शेवट अटळ असला तरी तो लवकरात लवकर करण्याची घाई ब्रिटिश नौकांना झाली होती. आणि ती तर वाकुल्या दाखवत अजून तरंगत होती. त्यामुळे चिडलेल्या ब्रिटिश नौकांना, न बुडणारी नौका असू शकत नाही, हे सिद्ध करण्याची उताविळी झाली होती.

"जवळ जा. आणखी जवळ जा" दर्यासारंग टोव्ही उतावीळ होऊन आदेश देत होते.

किंग जॉर्ज द फिफ्थ आणि रॉडने या दोघींचा तेलसाठा पार संपत आला होता. खरे म्हणजे त्यांनी केव्हाच या लढाईतून काढता पाय घ्यायला हवा होता.

अखेर रॉडनेने 'बिस्मार्क'च्या जास्तीत जास्त जवळ जाऊन आपल्या सोळा इंची तोफांनी 'बिस्मार्क'ची चाळण उडवली. मध्येच एक टॉर्पेडोदेखील टाकला.

आणि तो अचूक लागला. नौदलाच्या इतिहासात प्रथमच एका युद्धनौकेने दुसरीवर यशस्वी टॉर्पेडोमारा केला होता ! 'बिस्मार्क'वर नव्याने आगी लागल्या. धुराचे लोटच्या लोट येऊ लागले.

आणि तरीही ती सागरपृष्ठाखाली जायला तयार नव्हती.

या सुमारास आर्क रॉयलवरील सोर्डफिश विमाने 'बिस्मार्क'वर अंत्यविधीतील आपला वाटा उचलण्याच्या तयारीने तेथे आली. परंतु 'बिस्मार्क'वर ब्रिटिश नौकांकडून होत असलेला तोफमारा इतका विलक्षण होता की त्यामुळे सर्वत्र गडद धुराचे लोटचे लोट उसळत होते. हल्ला करताना विमानांना अपरिहार्यपणे या धुरात वावरावे लागणार होते. परिणामतः ती आपल्याच नौकांचे बळी होण्याचा गंभीर धोका होता. म्हणून, आपण 'बिस्मार्क'चा निकाल सहज लावू, मात्र त्यासाठी युद्धनौकांनी आपला तोफमारा आवरला पाहिजे, हे सांगण्यासाठी ती किंग जॉर्ज द फिफ्थच्या माथ्यावर भिरभिरली. परंतु ध्वजनौकेवरील बहुतेक नाविक 'बिस्मार्क'वर मारा करण्यात इतके दंग होते की त्यांचे या विमानांकडे लक्षच गेले नाही. त्यांच्याकडे लक्ष गेले ते फक्त विमानवेधी तोफांच्या गोलंदाजांचे. त्यांनी ती जर्मन विमाने आहेत असे समजून फैरी झाडल्या. मात्र थोड्याच वेळात आपली चूक त्यांना उमगली. ज्या विमानांनी आपल्या विलक्षण धाडसामुळे आणि कौशल्यामुळे 'बिस्मार्क'च्या सुकाणू-व्यवस्थेवर निर्णायक प्रहार केला होता त्या विमानांना या महत्त्वाच्या वेळी मात्र निराश होऊन परतावे लागले.

इतका मार खाऊनही एखादी नौका तग धरील यावर दर्यासारंग आणि त्यांचे सहकारी अधिकारी यांचा विश्वास बसता बसत नव्हता; परंतु अपंग झालेली, देहाची चाळण झालेली, वेदनांनी ठणकणारी 'बिस्मार्क' अजून तरंगत होती हे सत्य होते.

तिची ध्वजा अजून फडकत होती.

अखेर तेलसाठ्याच्या गंभीर परिस्थितीला शरण येऊन 'बिस्मार्क'च्या औपचारिक अंत्यसंस्कारांसाठी न थांबता टोव्हीनी रॉडनेसह काढता पाय घेतला... 'बिस्मार्क'चे विषदंत उपटले गेले होते. ती बुडणे आता अपरिहार्यच होते. टोव्हीनी निघताना, उरलेल्या नौकांना 'बिस्मार्क'वर टॉर्पेडोमारा करण्याचा आदेश दिला होता. त्याप्रमाणे नॉरफोकने आपले उरलेले टॉर्पेडो टाकले. त्यातील एक 'बिस्मार्क'वर जाऊन धडकला. आपल्यावर सोपवलेली अवघड कामगिरी पार पाडल्याची सुवार्ता चर्चिल साहेबांना आणि नौदलाच्या मध्यवर्ती कार्यालयाला प्रत्यक्ष कळवण्यासाठी कृतार्थ दर्यासारंग टोव्हींची स्वारी मायदेशी परत निघाली.

डॉर्सेटशायर या एकाच नौकेकडे आता काही टॉर्पेडो शिल्लक उरले होते; आणि कॅप्टन मार्टिनने टोव्हींचे मनोगत न सांगताच जाणले होते. दहा वाजून वीस मिनिटांनी त्याने 'बिस्मार्क'च्या आघाडीला उजव्या अंगावर दोन टॉर्पेडो अचूक मारले. प्रचंड स्फोट झाले. पधरा मिनिटे 'बिस्मार्क' बुडण्याची वाट पाहात

डॉर्सेटशायर तिच्याभोवती घिरट्या घालत होती. परंतु 'बिस्मार्क'वर आगी उसळल्या असल्या, तिच्या देहातून धुराचे लोटचे लोट उठत असले, स्फोटांनी ती खिळखिळी झाला असलो, तोल सुटून ती भेलकाडत असला तरा कसल्या तरी अद्भुत अतर्क्य चिवटपणामुळे ती बुडत मात्र नव्हती. ध्वजा फडकावीत अजूनही ती तरंगत होती. एकूण न बुडण्याबद्दलची तिची ख्याती शब्दशः खरी होती की काय ?

दहा वाजून छत्तीस मिनिटांनी डॉर्सेटशायरने आपल्या जवळचा शेवटचा टॉर्पेडो टाकला. या वेळी मात्र 'बिस्मार्क' कलंडली. नंतर हळुहळू ती साफ उलटी झाली. आणि नतर शेवटपर्यंत फडकणारी तिची ध्वजा, आणि पाठोपाठ तीही सागरात गडप झाली !

डॉर्सेटशायरने लगेच बचावलेल्या नाविकांचा शोध करायला सुरुवात केली. 'बिस्मार्क' बुडाली त्या जागेवर 'बिस्मार्क'च्या अवशेषाबरोबर तिचे नाविक गटंगळ्या खात होते. आर्क रॉयलवरील एका विमानाला जर्मन पाणबुड्यावर लक्ष ठेवण्याचा आदेश देऊन, मावरीला बरोबर घेऊन कॅप्टन मार्टिन 'बिस्मार्क'च्या कबरस्थानाकडे वळला. खवळलेल्या सागरात ही देखील कामगिरी पार पाडणे अवघड जात होते. समुद्रात तरंगणाऱ्या कित्येक नाविकामध्ये, दिली जाणारी मदत स्वीकारण्या इतकीसुद्धा शक्ती नव्हती. काही नाविक अर्थात सुखरूप येऊ शकले. ते तेलाने माखले होते. भाजले होते. धडपडत होते. थरकापत होते. ओकत होते. आक्रदत होते. 'बिस्मार्क'ने आपल्याबरोबर अनेकांना कायमचे रसातळाला नेले होते. जे सुदैवाने वर आले होते त्यानी भरपूर पाणी आणि पाण्यात मिसळलेले तेल प्याले होते; त्यामुळे त्यांची शरीरयंत्रणाच दूषित झाली होती. भाजल्या भागावर आणि जखमांवर खारे पाणी लागल्यामुळे अनेक जण वेदनेने आक्रोश करत होते. लवकरच डॉर्सेटशायरच्या डेकवर 'बिस्मार्क'वरील जखमी नाविकांचा खच पडला. डॉर्सेटशायरवरील वैद्यकीय पथक तत्परतेने कामाला लागले.

युद्धात दुर्दम्य आणि विजयात दयाशील असणे ही शाही नौदलाची परंपराच होती.

परंतु डॉर्सेटशायरला आपली दयाबुद्धीप्रेरित मोहिम आवरती घ्यावी लागली. दोन मैलावर जर्मन पाणबुडीची चाहूल लागल्यासारखे वाटले. शत्रूच्या पाणबुड्या आणि विमाने कोणत्याही क्षणी येतील असा अदाज होताच; आणि त्यांच्या भीतीमुळे कॅप्टन मार्टिनला नाईलाजाने तेथून परतण्याचा कठोर निर्णय घ्यावा लागला. आपल्या नौकेचा जीव वाचवणे हे त्याचे प्रधान कर्तव्य होते; आणि म्हणून 'बिस्मार्क'च्या समुद्रात हेलकावणाऱ्या अगतिक नाविकांचा हृदयद्रावक आक्रोश कानांवर आदळून अंतःकरण विदीर्ण करत असूनही मावरी आणि डॉर्सेटशायर यानी तेथून प्रयाण केले.

'बिस्मार्क'च्या शिकारीची अखेर ही अशी झाली.

दर्यासारंग टोव्ही एकोणतीस तारखेला मायदेशी पोहोचले तेव्हा तेलटाक्या संपूर्ण रिकाम्या झाल्या होत्या. त्यांच्या आधी त्यांच्या नेत्रदीपक विजयाची वार्ता

पोचली होती. ग्रिमस्टॅड फियोर्डमध्ये असलेल्या ' बिस्मार्क 'चा एका स्पिटफायरने लावलेला शोध, कमांडर रॉदरहॅमचे जोखमीचे उड्डाण, सफोक-नॉरफोक यांनी डेन्मार्क-सामुद्रधुनीमध्ये ' बिस्मार्क 'चा केलेला जीवघेणा पाठलाग, हूडचा विस्मयकारक सर्वनाश, नवख्या प्रिन्स ऑफ वेल्सने ' बिस्मार्क 'च्या तेलटाक्यांवर केलेला निर्णायक प्रहार, भररात्री खवळलेल्या समुद्रावर व्हायनच्या विनाशिकांनी तिचा पुरवलेला पिच्छा, वृद्ध रॉडने आणि तिच्या खिळखिळ्या इंजिनांची करामत, आणि अर्थात अविचलित दर्यासारंग टोव्हीचे प्रभावी सूत्रचालन—अशा अनेक चित्तथरारक आणि सनसनाटी प्रसंगांनी भरलेली ' बिस्मार्क 'च्या शिकारीची रम्य कथा ऐकून सारे ब्रिटन हर्षभरित झाले.

उदारहृदयी टोव्हींनी या विजयाचे श्रेय आपल्या सहकाऱ्यांना देऊन टाकले. आपल्या अधिकृत खलित्यात ते लिहितात : " या दीर्घकालीन शिकारीत, माझ्या अपेक्षेप्रमाणे, सर्वांनी कमालीचे कौशल्य, दूरदृष्टी आणि सहकार्यतत्परता दाखवली. चहूकडे विखुरलेल्या नौकांच्या कर्णधारांनी माझ्या कल्पनेप्रमाणे पवित्रे घेतले. प्रसंगी माझ्या आदेशाचीदेखील वाट त्यांनी पाहिली नाही. अशा झुजार आणि शाही नौदलाच्या अभिमानास्पद परंपरेला साजेसे वर्तन करणाऱ्या माणसाचे नेतृत्व करण्याची संधी मला मिळाली हा मी माझा गौरव समजतो. "

या मोहिमेचा अधिकृत वृत्तान्त लिहिणाऱ्या अज्ञात बखरकाराने तिच्या यशाचे मूल्यमापन करताना पुढील उद्‌गार काढले आहेत : " ' बिस्मार्क 'ची शिकार ही दुसऱ्या महायुद्धातील एक महत्त्वपूर्ण घटना होती. ब्रिटनच्या नौदलाच्या इतिहासात तर या मोहिमेला क्वचितच तोड सापडेल. या मोहिमेचे कार्यक्षेत्र अफाट होते आणि दूरवर विखुरलेल्या नौकांना त्वरेने संघटित करावे लागले. पण यापेक्षाही नौदलाच्या संबंधित विभागांनी सातत्याने केलेले परस्पर सहकार्य हा या मोहिमेचा लक्षणीय विशेष होता. प्रथम क्रूझर्सनी ' बिस्मार्क 'चा पाठपुरावा केला; आणि ज्या वेळी तिने त्यांना चुकवून पळ काढला त्यावेळी किनारादलाच्या विमानानी तिचा शोध लावला. त्यानतर दुसऱ्या एका क्रूझरने तिच्याशी सपर्क साधला आणि एका प्रसंगी विमानवाहू नौकेवरील विमानाना मार्गदर्शन केले. या विमानांनी ' बिस्मार्क 'वर मर्माघात केला. ज्या वेळी क्रूझरला तिने हुलकावणी दिली त्यावेळी व्हायनच्या चिवट विनाशिकानी तिचा माग काढला आणि रात्रभर पिच्छा पुरवून सकाळी तिला युद्धनौकाच्या तोंडी दिले. शिवाय विमानवाहू नौकाची उपयुक्तता या मोहिमेत निर्णायक रीतीने सिद्ध झाली. कारण ' बिस्मार्क ' हरवली तेव्हा त्या विमानांनी तिचा शोध तर लावलाच, पण तिच्यावर परिणामकारक प्रहारदेखील केला.

" आशानिराशेचे द्वंद्व या मोहिमेत जसे प्रत्ययाला आले तसे दुसऱ्या एखाद्या मोहिमेत क्वचितच आले असेल. ' बिस्मार्क 'ने हूडचा बळी घेतला; पण त्याच चकमकीत तिच्या तेलटाक्यावर प्रहार झाला. तिने सफोक-नॉरफोकना शिताफीने

गुंगारा दिला; पण आपण होऊनच आपला अज्ञात ठिकाणा तिने शत्रूला कळवला. ' बिस्मार्क ' पुन्हा पुन्हा ब्रिटिश शिकाऱ्यांच्या जाळ्यातून सुटत होती; आणि कधी दुर्दैवानं, कधी स्वत:च्या चुकीमुळे तर कधी शिकाऱ्यांच्या कौशल्यामुळे पुन्हा जाळ्यात अडकत होती. या मोहिमेत विजय–पराजयात असलेली सीमारेषा पार अंधुक झाली होती. अंतिम पराजयापूर्वी ' बिस्मार्क 'ने झगमगत्या विजयाचा अनुभव घेतला होता; आणि अंतिम विजयापूर्वी ब्रिटिश शिकाऱ्यांना पराजयाचे काळेकुट्ट जहर पुन्हा पुन्हा पचवावे लागले होते."

दर्यासारंग टोव्ही खलित्यात आपल्या पराभूत पण तुल्यबल शत्रूचीही पाठ थोपटायला विसरले नाहीत. ते लिहितात : "अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतही ' बिस्मार्क 'ने मोठी वीरोचित झुंज देऊन आरमाराच्या वैभवशाली परंपरेची शान राखली. अखेरपर्यंत तिची अभिमानोन्नत ध्वजा डौलाने फडकतच होती."

प्रत्येक नौकेला बुडण्याचा शाप असतो. ' बिस्मार्क ' मात्र अमृताचे वरदान घेऊन आली आहे की काय असेच वाटत होते. तिच्या तोफा जशा प्रभावी होत्या तसे तिचे संरक्षक कवच मोठे मजबूत होते यात शंका नाही. हूडसारखी कणखर लढाऊ क्रूझर वर्मी लागलेल्या एका गोळ्यानेच रसातळाला गेली; तर अखेर ' बिस्मार्क 'ला जलसमाधी देईपर्यंत ब्रिटिशांना तेवीस टॉर्पेडो आणि जवळजवळ तीन हजार तोफगोळे खर्ची घालावे लागले होते.

' बिस्मार्क 'च्या शिकारीमुळे अवघे ब्रिटन उल्हसित झाले. आणि हिटलर? – प्रथम त्याला दु:ख झाले आणि त्याचे पर्यवसान आत्यंतिक क्रोधात झाले. स्कार्नहॉर्स्ट, ॲडमिरल स्कीअर आणि नायसेनॉव याच्या यशस्वी कामगिरीनंतर त्याने ' बिस्मार्क '-सारख्या महाकाय नौका बांधण्याचा दीर्घकालीन कार्यक्रम योजला होता. ' बिस्मार्क 'च्या हत्येची वार्ता आल्याबरोबर हा कार्यक्रम त्याने रद्द केला. ' बिस्मार्क 'ची जुळी बहीण शोभेल अशा बांधणीची, जर्मन गोदीमध्ये तयार होत असलेली एक युद्धनौका तातडीने निकालात काढण्यात आली. किंबहुना ' बिस्मार्क 'च्या हत्येचा हिटलरला बसलेला धक्का इतका मोठा होता की त्यानंतरच्या युद्धकाळात मोठ्या नौका जर्मन नौदलात मुळी तयारच झाल्या नाहीत.

ब्रिटिशांना याचा मोठाच फायदा झाला. ' बिस्मार्क 'च्या दु:खद हत्येमुळे हिटलरला महकाय नौका निर्माण करण्यातील व्यर्थता पटली होती. ग्रँड ॲडमिरल रेडरच्या उत्कर्षाला ग्रहण लागले होते.

तीन वर्षे उलटल्यानंतर देखील ' बिस्मार्क 'ची याद हिटलर विसरला नव्हता. एका प्रसंगी, त्याच्या कोण्या एका सहकाऱ्याने जपानच्या महाकाय युद्धनौकांचे वारेमाप कौतुक केले. हिटलर कोरड्या स्वरात एवढेच म्हणाला : " ' बिस्मार्क 'ची याद आहे ना तुम्हाला?"

# स मा प्त



# भिंतीच्या तुंबड्या

सुधाकर राजे

### ◻ मच्छराचा हृदयपालट

सोपी गोष्ट कठीण करू शकतो तो तज्ज्ञ ही व्याख्या आता सर्वमान्य झाली आहे. अर्थात् अगदी सोपी गोष्ट भलतीच कठीण करू शकेल तो फार मोठा तज्ज्ञ हे गणित ओघानेच आले. परवा अशा एका महान तज्ज्ञाची करामत वर्तमानपत्रात वाचली. डास चावू नये म्हणून तुमच्या–आमच्यासारखा अज्ञ काय करतो? डास मारतो. पण एका अमेरिकन सर्जनने डासाच्या मेंदूवर शस्त्रक्रिया करून त्याच्या चाव्याचे संभाव्य दुष्परिणाम नष्ट करण्याचा तज्ज्ञ उपद्व्याप आरंभला आहे. आता बोला! माणसाच्या रक्तपिपासू वृत्तीचे नियमन करण्यासाठी साधुसंत शांतीचा व बंधुभावाचा उपदेश करीत आले, पण मच्छराची रक्तपिपासू वृत्ती काबूत आणण्यासाठी थेट त्याचा मेंदूच बदलू पाहणाऱ्या या महाभागापुढे कुठलाही महात्मा बाद आहे. आता शस्त्रक्रियेने जर चावऱ्या डासांचा हृदयपालट करता येतो तर इतर अनेक त्रासदायक जीवजंतूंवर व प्राण्यांवर हे वैद्यकीय तंत्र वापरता यायला हरकत दिसत नाही. उदाहरणार्थ, चोरून दूध पिणाऱ्या मांजराला 'चोरी कधी करू नये' हे शिकविण्यासाठी त्याच्या मेंदूत सत्यप्रियतेची लस टोचावी. भुंकून डोके उठविणाऱ्या मोत्याला 'मौनं सर्वार्थसाधनम्' हे पटविण्यासाठी कुठल्याही राजकीय पुढाऱ्याचे भाषण कोळून काढलेला अर्क टोचावा. पुनः पुनः आमच्या नाकाच्या शेंड्यावर येऊन बसणाऱ्या हट्टी माशीला जगात इतरही बरीच नाके आहेत याची जाणीव करून देणारे इन्ट्राव्हीनस इंजेक्शन द्यावे. फक्त पुस्तके खाणाऱ्या किड्याला ग्रंथ हेच आमचे गुरू आहेत असे शिकविण्याची जरुरी नाही.

### ◻ शास्त्रशुद्ध निरुपयोगीपणा

शास्त्रज्ञांनी उपयुक्त गोष्टींचाच शोध लावला पाहिजे असे बंधन अर्थातच घालता येत नाही. पण त्यांनी शोधून काढलेली गोष्ट किती निरुपयोगी असली पाहिजे यावरही बंधन घालणे शक्य दिसत नाही. उदाहरणार्थ, काही दिवसांपूर्वी एका ब्रिटिश शास्त्रज्ञाने म्हणे त्याच्या मते जगातली सर्वात निरुपयोगी वस्तू तयार केली, व ती म्हणजे न चालवता येणारी सायकल. आता न चालवता येणारी सायकल व न चालवता येणारी मोटार यात अधिक निरुपयोगी काय हे कसे

ठरवायचे ? अन् निरुपयोगी सायकल व निरुपयोगी मोटार यात कोणती गोष्ट अधिक महत्त्वाची हे तरी कसे ओळखायचे ? आता अस्मादिकांजवळ उपयोगी सायकल आहे, तिला साधे पंक्चरदेखील होत नाही; उलट कोपऱ्यावरच्या अप्पांनी एक डबडा गाडी घेतलीय् ती सतरा वेळा बिघडते. पण शान कोणाची ? अर्थात अप्पाची. ते काही असले तरी न चालणारी सायकल तयार करायला जर उच्च कोटीचे शास्त्रीय ज्ञान लागत असेल तर हिंदुस्थानातल्या मंडळींची राष्ट्रीय बुद्धिमत्ता इंग्रजापेक्षा खूपच वरच्या दर्जाची आहे असे मी अभिमानपूर्वक म्हणू शकेन. कारण एकतर न चालणाऱ्या मोटारी तयार करण्याचे एक सोडून तीन तीन कारखाने आपल्याकडे आहेत. शिवाय बंद पडणारे पंखे, गरम करणारे रेफ्रिजरेटर, रॉंग नंबर देणारे टेलीफोन इत्यादि गोष्टीही आपण मोठ्या प्रमाणावर तयार करतो. अन् मला सांगा, हिंदुस्थानातल्या कुठल्याही जाहीर कार्यक्रमात मध्येच बंद न पडणारा मायक्रोफोन अस्तित्वात आहे काय ?

## ◻ फ्री–स्टाइल पार्लमेंट

कोणे एके काळी माणसाची ज्या विषयात विशेष गती असेल ते काम तो करायचा. साहित्याची आवड असणारा साहित्यिक व्हायचा, संपादक नव्हे; कलेची आवड असणारा कलाकार व्हायचा, टीकाकार नव्हे; अन् वक्तृत्वाची आवड असणारा वकील व्हायचा, पुढारी नव्हे. पण आता गोष्टी इतक्या सोप्या राहिलेल्या नाहीत. कपॉझिटरचा संपादक होणाऱ्या आजच्या युगात कोणते पद प्राप्त करायला कोणता गुण लागेल हे सांगणे मोठे कठीण होऊन बसले आहे. उदाहरणार्थ, पंडित नेहरूंनी एकदा सांगितले होते की परदेशात वकील म्हणून यशस्वी व्हायला एक मोठे क्वालिफिकेशन हवे, व ते म्हणजे देखणी बायको. तसाच काहीसा प्रकार पार्लमेंटमध्ये निवडून येण्याच्या बाबतीत होणार असे दिसते. कारण पार्लमेंट–सभासदांना जूडो हा जपानी कुस्तीचा प्रकार शिकविण्यात येणार आहे अशी बातमी आहे. पाहिलेत ? यशस्वी पार्लमेंट–सभासद म्हणून नाव कमवायचे असेल तर वक्तृत्वकला नको, कुस्ती खेळता आली पाहिजे. पण हिंदुस्थानातल्या पार्लमेंट–सदस्यांना जपानी कुस्तीचे शिक्षण का ? आपल्या चित्रपट कुस्तीत संसदीय गुण नाहीत काय ? अन् कुस्तीचे देखील फॉरीन नो–हाऊच हवे असेल तर फ्री–स्टाइल काय वाईट होती ? ते काही असो, यापुढे निवडणुकीला उभे राहणाऱ्या इसमाने जाहीरनामा काढण्याची गरज नाही—शड्डू ठोकला की पुरे.

◻ ◻ ◻

शरद गोखले



# अ प रा ध

पारितोषिकांचा भरपूर वर्षाव झालेलं हे चित्र आहे. एक दोन नव्हे चांगली दहा पारितोषिकं वाट्याला येण्याचं भाग्य लाभलेली ही कलाकृती पाहून आपण चक्क खूष झालो. सरकारी स्पर्धेतील पारितोषिकं आणि प्रेक्षकांची पसंती यांचे गणित सहसा जमत नाही आणि मग उगाच 'वादविवादांची वावटळ' निर्माण होते. मनोरम चित्रच्या आपराधच्या बाबतीत हे संभवत नाही. कारण चित्रपट पाहिल्यावर–चित्रपटाच्या वाट्याला आलेला पारितोषिकांचा सन्मान हक्काने मिळवलेला आहे याची खात्री पटते.

चंद्रकांत काकोडकर यांच्या 'आसावरी'ला खतपाणी घालून निर्माते शरद पिळगावकर यांनी कथाविस्तार केला आहे. विस्तारीत केलेल्या या कथेमध्येही फार मोठे सामर्थ्य आहे अशातला भाग नाही. वसुधा ही तरुण देखणी नर्स, शाम दाते नावाच्या गायकाच्या प्रेमात पडते–सर्वसाधारणपणे वसुधासाठी मरणारा कोणी तरी अफलातून खलनायक शाम–वसुधाच्या लग्नाला विरोध करणार, अथवा त्याचे अथवा तिचे आई–वडील कार्यात विघ्न आणणार-पण तसं काही नसतं–तरी गाडी पुढे जात नाही. कारण वसुधा ही सर्वसाधारण मुलगी नसतेच-लग्नाआधीच आपल्या भावी पतीजवळ–बंगला, मोटार, फ्रीज, असलाच पाहिजे अशी अपेक्षा असल्याने प्रेम असूनही शामशी विवाहबद्ध होण्याची तिची तयारी नसते. आसावरी ही हृद्‌रोगाने पीडलेली सुस्वरूप संगीतप्रेमी तरुणी, घरात गडगंज संपत्ती, काळजी घेण्यासाठी डॉक्टर परांजपे यांच्यासारखा धन्वंतरी.–सतत अंथरुणामध्ये पडून रहावे लागल्याने आसावरी जीवनाला कंटाळली आहे. आसावरीच्या आयुष्याची दोरी केव्हा तुटेल याची डॉक्टर परांजपे यांनाही शाश्वती नसते. अशा आपल्या या पेशन्टसाठी 'कम्पॅनीयन' म्हणून डॉक्टर वसुधाला घरात आणतात. आसावरीचे जीवन एकाकी असते. घरात म्हाताऱ्या आत्याखेरीज कोणी नसते. त्यामुळे वसुधाचे आगमन तिला स्वाप-

ताई वाटते. म्हातारी आत्या आणि डॉक्टर परांजपे यांचे आसावरीच्या संपत्ती-सबंधी बोलणे ऐकत असतानाच वसुधाच्या मनात एक विषारी कल्पना आकार घेते आसावरी मरणार. आज ना उद्या आसावरी मरणार. मग तिची संपत्ती. त्याचे काय ? त्यापेक्षा असं केलं तर शामचे आणि आसावरीचे लग्न लावून दिले तर ? आसावरीं मेल्यावर शाम आपलाच आहे.—कल्पना मनात घर करून बसते. आपली सर्व स्वप्ने साकार होण्याची हीच एक सुवर्णसधी आहे अशी वसुधाची खात्री होते आणि ती कार्यप्रवण होते—चित्रपटाला खऱ्या अर्थाने सुरुवात होते.

वैयक्तिक स्वार्थापायी विलक्षण खालच्या पातळीवर गेलेली वसुधा एका बाजूला, आणि वसुधा व आसावरी यांच्या प्रेमसंघर्षामध्ये सापडलेला, नीती-अनीती, माणु-सकी आदि कल्पना मानणारा शाम—दुसऱ्या बाजूला. अशा स्वरूपात कथा पुढे सरकते. आसावरीच्या संपत्तीसाठीं वसुधाने टाकलेला डाव हाच या चित्रपटाचा विषय—आणि अगदी साधेसरळ कथासूत्र हवे असले तर ' Crime does not pay.'

मराठी चित्रपटाच्या दृष्टीने तरी कथाविषय वेगळा हे मान्य करावे लागेल. अशा या वेगळ्या विषयाचे यश आहे मांडणीमध्ये. आणि या मांडणीमध्ये मोठा वाटा आहे दिग्दर्शक राजदत्त यांचा. शामच्या मनाचा थांगपत्ता लागू न देता त्यांनी प्रेक्षकांचे औत्सुक्य शेवटपर्यंत कायम ठेवले आहे. वसुधा, शाम, आसावरी या तिन्ही प्रमुख व्यक्तिरेखा त्यांनी मोठ्या कौशल्याने उभ्या केल्या आहेत. प्रारंभापासून शेवटपर्यंत चित्रपटावर त्यांची घट्ट पकड आहे. आसावरीचे आणि शामचे लग्न लावण्याची कल्पना वसुधाच्या मनात येते तिथपासून चित्रपटाला खरा प्रारंभ होत असला, तरी त्या आधीचा भागही त्यांनी कौशल्याने हाताळला आहे. भावना व्यक्त करण्यासाठी वापरलेला फिरत्या झुंबराचा, तसेच आसावरीच्या मृत्यूची वार्ता कळताच वसुधाने फुलांचा ताटवा तुडवण्याचा सिंबॉल परिणामकारक आहे. राजाभाऊ परांजपे यांचा हा शिष्योत्तम मराठी चित्रपटक्षेत्रात भरीव कामगिरी बजावू शकेल असा विश्वास त्यांचा हा चित्रपट पाहिल्यावर निर्माण होतो.

चित्रपटाची तांत्रिक बाजू उत्कृष्ट आहे. मराठी चित्रपट आणि मराठी नाटक, याच्यामध्ये फारसा फरक आढळत नाही. त्याला हा चित्रपट अपवाद आहे. दत्ता गोर्ले यांनी कॅमेरा भरपूर वापरला आहे. सहसा मराठी चित्रपटात न आढळणारे अँगल्स त्यांनी वापरले आहेत. ट्रॉली, क्रेनचाही लक्षात येण्याइतका वापर त्यांनी केला आहे. छायाचित्रणाचा दर्जाही समाधानकारक आहे. काही वेळा हिन्दी चित्रप-टाची नक्कल होत असल्याचे जाणवले, तरी सर्वसाधारणपणे ' कॅमेरा मुव्हमेन्ट ' समाधानकारक आहे. निर्मितीची बाजू उत्तम. सेटस आकर्षक व व्यवस्थित—महाबळे-श्वरचे बाह्यचित्रण सुखदायी. कलाकारांपैकी सर्वोत्तम-सोमा. (वसुधा) इंद्राणी मुखर्जी (आसावरी) ठाकठीक. संवाद अतिशय भिकार बोलते. एखाद्या नवीन नटीला संधी दिली असती तर उत्तम झाले असते. रमेश देव (शाम) Confused.




रमेश देव । कन्फ्यूज्ड

बाळ कोल्हटकर–रिलीप म्हणून ठीक. राजाभाऊ (डॉ. परांजपे) उत्कृष्ट. विवेक (कैलास) खरं सांगू, आता काम नका करू बुवा.

एन. दत्ता यांचे कर्णमधुर संगीत हे चित्रपटाचे खास आकर्षण ठरावे इतके उत्कृष्ट.

कथाविषयाची उत्तम हाताळणी व उत्कृष्ट निर्मिती यांची ही फार दिवसांनी आलेली पर्वणी–म्हणजे ‘ Must ’

□ □ □



# अंदाज

पंडित वि. म. जोशी
ज्योतिष विशारद

१६ ते २२ मे १९७०

**मेष :** या आठवडयात रवि पंचमेश असून धनस्थानात शुक्र-मंगळाबरोबर असल्यामुळे विद्येत उत्कर्ष होऊन संतती प्रगतिपथावर राहील. विशेषत: सरकारी नोकरांना हा सप्ताह अधिक अनुकूल आहे. शुक्र-मंगळाच्या युतीमुळे भागीदार व पत्नीकडून अपेक्षित सहकार्य मिळून, फॅन्सी वस्तूंच्या धंद्यात मनाजोगता धनलाभ संभवतो. विवाहेच्छू वधु–वरांना या सप्ताहात विवाहनिश्चितीचा अनुकूल निर्णय ऐकायला मिळेल. धनस्थानातील रवि-मंगळासमोर चंद्रमहाराज येत असल्यामुळे कुठूनही अनपेक्षित पण निश्चित धनलाभ होईल. १, २, ७, ८ या अंकांनी युक्त असलेले लॉटरीचे तिकिट मिळविण्याचा प्रयत्न जरूर करावा. शुभ तारखा १९।२०।२१।२२.

**वृषभ :** या सप्ताहात प्रवासाचा योग आल्यास-तो येईलच-तो चुकवू नका. कारण हाच प्रवास आपणास उपकारक ठरणार आहे; पंचमेश व धनेश बुध व्ययस्थानात असल्यामुळे विद्यार्थीच्या वाटयाला अपेक्षाभंगाचे दुःख येईल. संततीकडून सौख्याची फारशी आशा बाळगण्यात अर्थ नाही. ता. २१ ला होणारी गुरु–चंद्राची युती आपल्यामागची आपत्तीची झळ पुष्कळच कमी करतील. ता. १७ नंतर गुरु-शुक्राचा त्रिकोण लाभदायक घटना घडवून, आपले आरोग्यही उत्तम राखील. या त्रिकोणामुळेच धंदा-व्यवसायात अपेक्षित बरकत होईल. छोटया व्यावसायिकांना हा सप्ताह अधिक फायदेशीर आहे, ज्यांचे वय ४२ वयापेक्षा अधिक आहे त्यांना हा अनुभव जास्त संभवतो. प्रत्येक चांगल्या कामात व्ययातील बुध-शनि विघ्न निर्माण करणार असले तरी गुरुमहाराज आपले पाठीराखे आहेत.सर्व आठवडाच शुभ आहे.

**मिथुन :** साहित्यिकांना हा सप्ताह उत्साहजनक असून यशस्वी करणारा आहे. बौद्धिक व्यवसायात यश मिळावे असे वाटणाऱ्यांनी त्या दृष्टीने जरूर प्रयत्न करावा. हा आठवडा अशा व्यावसायिकांना अधिक अनुकूल आहे. भागीदार व पत्नी यांच्या अनपेक्षित सहकार्यामुळे धंदा प्रगतीच्या मार्गाने वाटचाल करू लागेल. आपल्या कार्यात विघ्न आणणारे विघ्नसंतोषी शत्रू या सप्ताहात आपल्याविरुद्ध काहीही करू शकणार नाहीत याची खात्री बाळगा. विद्यार्थ्यांनी केलेल्या परिश्रमांचे चीज झाल्याची गोड वार्ता त्यांना ऐकायला मिळेल. संततीकडून अपेक्षा पूर्ण होतील. ता. १६ व १७ ला आपल्या घरात एखादा शुभ समारंभ होण्याचा संभव आहे. घराबद्दलचे तांत्रिक प्रश्न सुलभ रीतीने सुटतील. शुभ तारखा १९।२०।२१।२२.

कर्क : या राशीच्या सरकारी नोकरांना या सप्ताह नोकरीत बढती दर्शविते. आपल्या उत्कर्षासाठी आपले मित्र मनापासून साहाय्य करतील. त्यांचे सहकार्य जरूर घ्यावे. कर्क राशीचे इंजिनियर्स, डॉक्टर्स व लष्करातील अधिकारी यांना हा सप्ताह विशेष लाभदायक आहे. लग्नेश व भाग्येश गुरू-चंद्र चौथ्या घरात स्थानापन्न झाल्यामुळे कौटुंबिक वातावरण आनंदी राहील. या आठवड्यात प्रवासाचा योग असल्यामुळे तो टाळू नये, कारण हा प्रवास आपल्याला लाभदायक ठरणार आहे. आपल्याला अपेक्षित असलेला पत्रव्यवहार ता. १६, १७ व १८ ला होण्याचा योग आहे. द्रव्यलाभ ता. १९ व २० ला होणार आहे. त्या दृष्टीने जरूर प्रयत्न करावा. चंद्राचे भ्रमण ३।४।५ या स्थानातून असल्यामुळे आपली सर्व बाबतीत प्रगतीच होईल.

सिंह : अत्यंत महत्त्वाकांक्षी व्यक्तीची ही रास आहे. इतरापेक्षा काहीतरी विशेष पराक्रम करून दाखविणे हा यांचा जणू स्थायीभावच ! आजवर सरकार-दरबारी आपले अपेक्षित काम झाले नाही म्हणून आपण नाराज होण्याचे कारण नाही. कारण या सप्ताहात सरकारी काम यशस्वी होण्याचा योग उत्तम आहे. नेटाने प्रयत्न मात्र व्हायला हवा. आजवर संभाळलेल्या प्रतिष्ठेत यावेळी निश्चित भर पडून आपला दबदबा वाढणार आहे. प्रवास केल्यास तोही फायदेशीर ठरणार आहे. एक महत्त्वाची सूचना: धंद्यातील भागीदारांशी मतभेद होण्याची दाट शक्यता आहे, तरी आपल्या बोलण्यावर संयम ठेवावा. तुटेपर्यंत ताणून आपलेच नुकसान होईल असे होऊ नये याची खबरदारी अवश्य घ्या. ता. १७ नंतरच विवाहा-संबंधीच्या हालचालींना वेग येईल. अनुकूल दिवस १९।२०।२१।२२.

कन्या : द्रव्य प्राप्तीच्या दृष्टीने हा सप्ताह या राशीच्या व्यक्तींना अनुकूल आहे. मात्र इतर बाबतीत जरा जपूनच राहिले पाहिजे. विद्यार्थींनी स्वतःच्या यशाबद्दल भलत्याच अपेक्षा बाळगण्यात फारसा अर्थ नाही. अपेक्षाभंगाचा धक्का बसू नये म्हणून ही सूचना. संततीकडूनही मनाविरुद्ध वर्तन घडल्यामुळे मनस्ताप होणार आहे. कदाचित आपल्या संततीमुळे आपलीच मानहानी सहन करण्याच्या कठोर प्रसंगाला तोंड द्यावे लागेल. अशा कटु प्रसंगाला धीराने व संयमाने सामना दिल्या-शिवाय मुळी गत्यंतरच नसते. धीराने व विवेकाने घेतले तर आहे त्यातूनच पुढील मार्ग निघू शकेल. प्रवासाला शक्यतो या सप्ताहात—निदान बुधवारी तरी—जाऊ नका. मामांच्या किंवा सासऱ्याच्या घरात कोणीतरी व्यक्ती आजारी पडेल. अकस्मात धनलाभाला ता. १९ व २० हे दोन दिवस फार चांगले आहेत.

तूळ : आपण आपल्या व्यवसायात कितीही निष्णात आणि अनुभवी असलात तरी ता. १६ व १७ या दोन दिवशी प्रत्येक व्यवहार जरा जपूनच करावा. जराही अनवधान झाले तरी मानस्तापाची वेळ येईल. तरीही धास्तावून जाण्याचं कारण नाही, कारण गुरु-चंद्राची युती आपल्याला सावरण्यासाठी तत्परतेने तयार आहेच. विद्यार्थ्यांना थोड्याशा अपयशाचे गालबोट लागण्याची दाट शक्यता आहे. संतती

व भावंडांसाठी त्रास घ्यावा लागला तरी त्यामुळे कावून जाऊ नये. भागीदारीचे व्यवहार करताना अधिक चाणाक्षपणे करणे आवश्यक आहे. मतभेदाचे प्रसग टाळण्याने तुमचाच फायदा आहे हे विसरू नये. इंडिकेटच्या कार्यकर्त्यांना मात्र हा सप्ताह विशेष अनुकूल आहे. संशोधकांकडून शास्त्रीय दृष्टीने नवीन शोध लागतील. ता. १९।२०।२१।२२ हे दिवस उत्तम आहेत.

**वृश्चिक** : *सर्व ग्रहांचे भ्रमण अशुभ स्थानातून असल्यामुळे या राशीच्या व्यक्तींना* हा सप्ताह थोडाफार त्रासदायक जाणार आहे. चंद्राचे भ्रमण ११।१२।१ या स्थानातून आहे ते फारसे प्रतिकूल नाही. तरीही विद्याभ्यासात यशाची अपेक्षा बाळगण्यात अर्थ नाही. आकस्मिकपणे खर्चाला फाटे फुटून प्रमाणाबाहेर पैसा जाईल. ता. १७ नंतर व्याधी निर्माण होणार आहे. खाणे-पिणे जपूनच करावे. त्यापूनही सुखस्थानावर आणि लग्नेशावर गुरु पहात असल्यामुळे शारीरिक पीडा कमी होईल. ता. १६।१७ या दोन दिवशी सार्वजनिक कार्यात भाग जरूर घ्यावा. कोणतेही काम हाती घ्या, ता. २१।२२ या दिवशी त्यात यश निश्चित मिळेल. अनपेक्षितपणे संततीसाठी खर्च करावा लागणार असल्यामुळे त्याची तरतूद आधी-पासूनच करणे श्रेयस्कर ठरेल, हा खर्च अटळ असल्यामुळे ही सूचना या राशीच्या इंडिकेटच्या कार्यकर्त्यांना प्रमाणाबाहेर यश मिळणार आहे. त्यांनी प्रयत्न जरूर करावा. शुभ तारखा १६।१७।२१ व २२.

**धन** : सहावे रवि-शुक्र-मंगळ, बुध-शनि पाचवे, गुरू अकरावा आणि राहू तिसरा असे सर्वच ग्रह शुभ फल देणारे असल्यामुळे या राशीच्या व्यक्तींना हा सर्व सप्ताह फारच प्रगतीकारक आहे. या ग्रहस्थितीच्या जोडीला गुरु-शुक्राचा त्रिकोणही आपल्या यशाची निश्चिती करून बसला आहे. त्यामुळे तर सर्वत्रच यशस्वी जीवनाचा लाभ होणार आहे. शैक्षणिक क्षेत्रातील आपले यश पुनः एकदा उजळून निघणार आहे. कलावंतानाही हा सप्ताह उत्कर्षकारक आहे विशेषतः संगीत, नाट्य आणि चित्र-कला या क्षेत्रातील कलावंताच्या कलेला मानाचा मुजरा करण्याची संधी रसिक सोडणार नाहीत. सामाजिक कार्याच्या पसंतीची पावतीही मानमरातब करून मिळेल. केलेल्या सेवेचे चीज होईल. धंदा-व्यवसाय चढत्या श्रेणीने प्रगती करेल. विशेषतः ता. १९।२० ला सहकारी मित्राकडून केवळ प्रोत्साहनच नव्हे तर सक्रिय स्वरूपा-*पातील सहकार्यही मिळणार आहे.* ता. २१ व २२ ला पैसा भरपूर मिळाला तरी खर्चही त्याच प्रमाणात होईल. एकच : आपल्या भावंडांशी क्षुल्लक कारणावरून किर-कोळ वादावादी संभवते.

**मकर** : राहूशिवाय सर्व ग्रह शुभस्थानातून भ्रमण करीत असल्यामुळे काळजीचे जराही कारण नाही. अप्रसिद्ध लिखाणाला अचानक प्रसिद्धी मिळून आपण लेखक म्हणून प्रकाशात येणार आहात. पचमातील शुक्र-मंगळामुळे विद्यार्थीवर्गाला यशाची

अपेक्षा पूर्ण करता येईल. शुक्र-मगळाची पचमातील युती अकस्मात द्रव्यप्राप्ती करतेच, शिवाय आपल्या उद्योग-धद्यातही अनपेक्षितरीत्या बरकत करते. सरकारी कामात झटून प्रयत्न केल्यास या सप्ताहात अनुकूल निर्णय लागेल. नोकरीसाठी ज्याना आजवर भ्रमती करावी लागली असेल त्याची भ्रमती थाबेल व त्याना मनाजोगती नोकरी लाभेल. प्रकाशकाना हा सप्ताह लाभदायक ठरेल. चतुर्थातील शनी-बुध मनातील सौख्यदायक घटना घडविणार आहेत. विवाहाची बोलणी ता. १६ व १७ *ला* होतील. *ता. १९ व २० ला आपली प्रतिष्ठाही वाढेल व द्रव्यलाभही* भरपूर होईल. मात्र चाचल्य कमी करायलाच हवे !

**कुभ :** या सप्ताहात लाभ आणि तोटा या दोघाचे वाटेकरी होण्याची तयारी ठेवावी हे चागले आपल्याच हातून घडलेल्या चुकीमुळे आजवरच्या आपल्या पराक्रमाला थोडाफार कमीपणा आला तर त्यामुळे धीर सोडू नका. ससारात राहायचे म्हणजे सुखाबरोबर थोडेसे दु खही सहन करायला मधून मधून शिकले पाहिजे. हा सप्ताह प्रवासाला अनुकूल नाही. नाइलाज झाला तरच प्रवासाला बाहेर पडा. प्रवासात काहीना काही नुकसान होणार म्हणून ही धोक्याची सूचना ! लग्नातील राहू व तृतीयातील शनि यानी आपले कितीही नुकसान करण्याचा विडा उचलला तरी भाग्यातील गुरू त्याच्या वाईट कृत्यावर लगाम घालील. त्यामुळे घाबरण्याचे कारण नाही. सततीकडून प्रगतीची फारशी अपेक्षा बाळगण्यात अर्थ नाही. केमिस्ट व बिल्डिग काँट्रॅक्टर याचा उद्योग—व्यवसाय उत्तम चालेल. ता. १६ व १७ ला आपले शत्रू निष्प्रभ होतील. आजवर प्रयत्न करूनही वसूल न झालेले येणे अकस्मात ता. *१९ व २० ला वसूल होईल. असमाधानी वृत्ती कमी करण्यानेच खरी मन शाती* लाभणार आहे हे सदैव स्मरणात ठेवावे: शुभ तारखा १९।२०।२१।२२

**मीन :** शनि-बुध याच्यावर गुरूची दृष्टी असल्यामुळे अपेक्षित द्रव्यप्राप्ती निश्चित होईल. आपल्या मनात कितीही सद्हेतू असला तरी आपले बोलणे समोरच्या व्यक्तीचा गैरसमज करते. म्हणून वाणी गोड ठेवायला हवी. नुसत्या गोड बोलण्यानेही आपला कार्यभाग सहजी साधता येतो हे कदापि विसरू नये. निदान या सप्ताहात तरी बोलताना जरा सभाळूनच बोलणे हितावह ठरेल. सततीकडून आनददायी घटना घडतील. मीन राशीची माणसे ही इतराच्या कल्याणासाठी राबत असतात स्वार्थापेक्षा परार्थ हा मीन राशीच्या व्यक्तीना महत्त्वाचा वाटतो, म्हणून त्याच्याहातून इतराचे कल्याण निश्चित होते. एखाद्या व्यक्तीचे कायम स्वरूपाचे कल्याण करण्याचा योग ता २०।२१ किंवा २२ ला आहे. एकदरीत हा सर्व आठवडा इतरांसाठी केलेल्या श्रमाचे सार्थक करणारा आहे हे निश्चित.

□ □ □

राजहस प्रकाशन सस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक, सस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यानी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव पेठ, पुणे ३० येथे छापून, १०२५ सदाशिव पेठ, पुणे येथील सस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. श्री. ग. माजगावकर

MANOOS (Weekly) : 40 Paise : Regd. No. M–H 649



" प्रादेशिक असमतोल नाहीसा व्हावा असं आम्हालाही वाटतं. म्हणूनच तर तुमच्या विभागासाठी नेमलेल्या विकासमंडळाच्या सभासदांची संख्या वाढवून ती पश्चिम व उत्तर विभाग विकासमंडळाएवढी करण्याचा आम्ही निर्णय घेऊन टाकला आहे ..."